# दीपमाळ



निर्मलकुमार फडकुले

# दीपमाळ

निर्मलकुमार फडकुले

सुविद्या
प्रकाशन

**दीपमाळ**

**निर्मलकुमार फडकुले**

**प्रथम आवृत्ती**
एप्रिल २००५

©
**डॉ. निर्मलकुमार फडकुले**

**प्रकाशक :**
सुविद्या प्रकाशन
'गंगा निवास',
३७४, उत्तर कसबा, सोलापूर-०७
फोन : २७२२ ५१०

**अक्षर जुळणी :**
जयंती ऑफसेट
'गंगा निवास'
३७४, उत्तर कसबा, सोलापूर-०७
फोन : २७२४ ४१५

**मुद्रक :**
विनंद ऑफसेट
टिळक चौक, सोलापूर

**मुखपृष्ठ :**
शिरीष घाटे

**मूल्य : ८० रुपये**

’ दीपमाळ’ हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक १९९८ साली ‘सुविद्या प्रकाशन’ यांनी २००५ साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# दीपमाळ

## हे पुस्तक विनामूल्य आहे
## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी-घेणे आवश्यकआहे.

# पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

माझ्या सुखदुःखांत सहभागी झालेल्या
माझ्या अनेकानेक सुहृदांना
त्यांच्यामुळं जगण्याचं बळ लाभलं.

# थोडेसे 'स्वगत'

दैनिक 'सकाळ' मधून 'दीपमाळ' या सदरात मी प्रत्येक सप्ताहाला एक असे पन्नास लघुलेख लिहिले. नानाविध विषयांवरचं माझं हे ललित लेखन वाचकांना आवडतं होतं. आपल्या प्रतिक्रिया दूरदूरचे वाचक मला पत्रानं किंवा दूरध्वनी करून कळवीत होते. आपलं लेखन आवर्जून वाचलं जातं हा आनंद लेखकाला किती उत्साहित करतो हे सांगण्याचं कारण नाही. रसिक वाचक हेच साहित्याच्या क्षेत्रातलं सर्वोच्च न्यायासन आहे.

हे लेख पुस्तकरूपानं प्रकाशित व्हावेत असं माझे मित्र श्री. बाबुराव मैंदर्गीकर यांनी आग्रहानं सांगितलं. जीवनातल्या बऱ्यावाईट प्रवृत्ती आणि घटना यांच्या संदर्भात मी प्रत्येक लेखातून काही विचार व्यक्त केले आहेत. विचारांची ही 'दीपमाळ' कितपत प्रकाश देते हे वाचकांनी ठरवायचं आहे. प्रकाशकिरण लहानखुरा असला तरी तो आपल्या परीनं अंधाराला आव्हान देऊ शकतो. लालित्याच्या अंगानं जाणारे हे विचारलेख आता रसिकांच्या हातात एकत्रितपणानं येत आहेत. सुविद्या प्रकाशनाचे संचालक श्री. बाबुराव मैंदर्गीकर आणि चित्रकार श्री. शिरीष घाटे यांचा मी आभारी आहे. 'सकाळ'च्या संपादकांनी लेख पुस्तकरूपानं प्रकाशित करायला संमती दिली याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

**– निर्मलकुमार फडकुले**

# अनुक्रम

पाखरांची गाणी / १
वाग्विलास विस्तारू / ३
श्रीमंती / ५
प्रेम आणि जीवन / ७
प्रवृत्तीचा मंत्र / ९
लोक काय म्हणतील ? / ११
सुखाची झोप / १३
प्रेमाची चंद्रभागा आटली ! / १५
कवितेचं सौंदर्य / १७
अंधश्रद्धा / १९
माणूस : असा आणि तसा ! / २१
स्त्री आणि संस्कृती / २३
गतकाळाचे ओझे / २५
सुंदर म्हातारपण ! / २७
माणूस घडवणारे शिक्षण / २९
स्वैराचार आणि संयम / ३१
हरवलेली वाट / ३३
तो येक पढतमूर्ख ! / ३५
आपलं घर / ३७
तुका म्हणे ऐशा नरा… / ३९
संवेदनशीलता हरवली ? / ४१
सत्ता आणि सत्ताधीश / ४३
किती जगावे ?/ ४५
उत्तर नसलेला प्रश्न / ४७
प्रेमाचा प्राणवायू / ४९
एकच प्याला / ५१
द्रौपदीचा प्रश्न / ५३
सारेच दीप मंदावले आता… / ५५
गुलामांचा गुलाम / ५७
तेथे कैंचा पांडुरंग ? / ५९
शब्द / ६१
माणसाचा धर्म / ६३
कलावंताचा आनंद / ६५
ध्येयवादी / ६७
माझा देश माझी माणसं ! / ६९
खायचे दात आणि दाखवायचे दात / ७१
हसायला विसरू नका / ७३
अहंगंड आणि आत्मप्रत्यय / ७५
सांगे वडिलांची कीर्ती / ७७
दैववादाचे तुणतुणे / ७९
नाटक / ८१
जीवनगाणे / ८३
शब्द जैसे कल्लोळ अमृताचे / ८५
मैत्र जीवाचे / ८७
वीणेच्या तारा / ८९
मोह / ९१
परीक्षा / ९३
निंदा आणि गुणगान / ९५
कोण ब्राह्मण, कोण शूद्र ? / ९७
कविता कुणी लिहावी ? / ९९
निरोप घेताना… / १०१

# पाखरांची गाणी

माणसांचं आणि पक्ष्यांचं काहीतरी आंतरिक नातं आहे, यात शंका नाही. बालकाला घास भरवताना आई त्याला 'हा काऊचा, हा चिऊचा' असं सांगून घास देते. ज्ञानेश्वरांच्या अभंगातली विरहिणी 'पैल तो गे काऊ कोकताहे' असं म्हणून तो शुभशकुन सांगत आहे, या कल्पनेनं आनंदित होते. नाना प्रकारच्या पक्ष्यांच्या गमतीदार कथा ऐकल्यामुळे बालपणाला रमणीयता येते. कथाकवितांतून पक्ष्यांचे कितीतरी उल्लेख येतात. निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर पंख हलवीत चाललेले पक्षी दिसले म्हणजे आकाशालाही एक आगळं देखणेपण मिळतं. आपण माणसं जमिनीला बांधलेले आहोत. आपल्याला गगन ठेंगणं कधीच होत नाही; पण भाग्यवान पक्षी मात्र आपल्या पंखांवर सारं आभाळ घेतात, स्वैर भराऱ्या मारतात. आकाशाच्या निळाईत खोल खोल जाणारे पक्षी पाहून माणसाला त्यांचा हेवा वाटतो. त्याच्या महत्त्वाकांक्षेचा उल्लेखही 'गरुडाची झेप' असा केला जातो.

पक्ष्यांना मात्र माणसांची भीती वाटते. हा माणूस कधी आपल्याला पिंजऱ्यात बंदिवान करील, या शंकेनं पाखरं माणसांपासून दूरच असतात. पक्ष्यांचं प्रेम मिळणं ही भाग्याची गोष्ट म्हणावी लागेल. कुणा शिकाऱ्याच्या बाणानं घायाळ झालेल्या एका पक्ष्याला गौतमबुद्धानं वाचवलं. तो पक्षी त्याच्या छातीला बिलगून बसला. शिकारी पक्ष्यावर हक्क सांगू लागला. तेव्हा बुद्धानं म्हटलं, ''जीव घेणाऱ्यापेक्षा जीव वाचवणाऱ्याचा अधिकार मोठा असतो. हा पक्षी तुझ्याकडे येत असेल, तर तो तू घेऊन जा; पण कुरवाळणारा हात आणि ओरबाडणारा हात, यातलं अंतर पाखरांना कळतं.'' पशुपक्ष्यांवर, आभाळावर प्रेम करायला उदार आणि रसिक मन लागतं. माणसं कित्येक वेळा पक्ष्यांशी क्रूरतेनं वागतात. त्याच्या सुखाच्या, आनंदाच्या कल्पना विकृत असतात. फूल दिसलं, की तोडून टाकायचं. झाडांची पानं ओरबाडून टाकायची. पक्ष्यांचं घरटं दिसलं की ते उद्ध्वस्त करायचं. 'केवढं हे क्रौर्य' ही रे. टिळकांची कविता या संदर्भात अनेकांना आठवेल. एका निर्दय माणसाच्या प्रहारामुळे जखमी झालेली एक पक्षिणी आपल्या पिलांचा अखेरचा निरोप घेण्यासाठी घरट्यात येते, ही त्या कवितेची मध्यवर्ती कल्पना कुणालाही अस्वस्थ करू शकेल. या सृष्टीत

साऱ्यांनाच जगायचं आहे. पण आपल्या करमणुकीसाठी किंवा स्वार्थासाठी इतरांच्या जगण्याचा हक्क हिरावून घेणं, हे मात्र हिंस्त्र मनोवृत्तीचं द्योतक आहे. एकटा माणूसच पृथ्वीतलावर असता तर त्याचं जीवन रसहीन झालं असतं. आपल्या आजुबाजूला पशुपक्षी आहेत आणि तेही आपल्या जीवनाशी निगडित आहेत. त्यांच्यामुळे आपलं जीवन रसमय झालं याचं भान ठेवलं पाहिजे.

आकाशाचं सौंदर्य त्यात आनंदानं झेपावणारे पक्षी आहेत तोपर्यंत अभंग आहे. जोपर्यंत सरोवरात हंस विहार करतात तोपर्यंत ते शोभिवंत दिसतं. पक्षी राहतात म्हणून झाडंझुडपं आनंदानं बहरून येतात. जिथं आनंदी पक्ष्यांचा कलरव कानावर येत नाही, जिथं त्यांच्या पंखांचा फडफडाट होत नाही, जिथं रंगीबेरंगी पाखरांनी आभाळ मोहरून येत नाही तिथं माणसाला सुखानं नांदता येणार नाही, असं मला वाटतं. तुकोबा म्हणतात -

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे
पक्षीही सुस्वरे आळविती
येणे सुखे रुचे एकांताचा वास
रमे तेथे मन क्रीडा करी

अलीकडं नगरांतून आणि महानगरांतून पक्ष्यांचं दर्शन दुर्मिळ झालं आहे. आकाश धुरानं काळवंडलेलं दिसतं. इमारतींच्या उभारणीसाठी झाडं झुडपं तोडली जातात. पक्ष्यांना प्रीतीची गाणी गात आपली घरटी बांधायला जागाच मिळत नाही. ज्या आकाशात पक्षी नाहीत असं ओकंबोकं आकाश डोक्यावर घेऊन माणसांना शहरांत राहावं लागत आहे. पक्ष्यांचा सहवास आणि त्यांचा किलबिलाट यांना मुकलेला माणूस भावशून्य होत चालला आहे. पाखरांनो, परत या. आमच्या उजाड आयुष्यात तुमची गाणी पेरा.

●●●

# वाग्विलास विस्तारू

श्रोत्यांच्या समुदायासमोर ज्ञानेश्वरी सांगितली गेली. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत रस, रूप, नाद आणि गंध हे गुणधर्म होते. श्रोत्यांचे कान आपल्या मधुर वाणीनं तृप्त करण्याची शक्ती त्यांच्या वक्तृत्वात होती. याचं श्रेय ते नम्रतेनं आपल्या श्रोत्यांना देतात. एका दृष्टांतात त्यांनी म्हटलं आहे, 'चंद्रकांत रत्न' चंद्रकिरणांत पाझरू लागतं. हे खरं आहे; पण ते सामर्थ्य चंद्राचं आहे. वक्त्याचं वक्तृत्व फुलवणं, हे श्रेय श्रोत्यांचं आहे. तुकारामांचेही शब्द वक्तृत्वाच्या रसरंगांनी फुललेले आहेत. वक्ता जन्मावा लागतो. तो घडवताही येतो. ग्रंथाध्ययनातून, जीवनाच्या निरीक्षणातून, मनातले विचार सांगण्याच्या उत्कट इच्छेतून वक्तृत्वाला आकार येतो. ज्ञानेश्वर-तुकाराम केवळ कवी नव्हते. श्रोत्यांना प्रबोधित कसं करावं याचं सदैव भान असणारे हे प्रतिभावंत वक्ते होते.

आपण काय आणि ते कुणापुढे बोलतो, याचं भान वक्त्याला असावं लागतं. शाळेच्या स्नेहसंमेलनात एक नामवंत साहित्यिक 'महानुभाव पंथानं केलेली सामाजिक क्रांती' या विषयावर गंभीर मुद्रेनं बोलू लागले. सात - आठ मिनिटांतच टाळ्यांचा कडकडाट वाढू लागला. शिस्त राखताना शिक्षकांची तारांबळ उडाली. गदारोळात वक्त्यांसमोर जी क्रांती होत होती, ती त्यांना समजत नव्हती. वक्त्यांच्या व्यासंगाबद्दल प्रश्न नव्हता; पण कुठे काय बोलावं याचं व्यवहारज्ञान त्यांना नव्हतं. उत्तम भाषणाचा आनंद हा सुरेल गायन ऐकण्याच्या आनंदाशी मिळताजुळता आहे. कित्येक चांगली व्याख्यानं दीर्घ काळ मनात रुजून बसतात. चांगल्या व्याख्यानातून श्रोत्यांची बुद्धी आणि मन:स्थिती ताजी टवटवीत होते. भाषा हे वक्तृत्वाचं बाह्यांग आहे. विचार हे मात्र अंतरंग असतं. म्हणूनच मुख्य विचारांचं सूत्र वक्त्याच्या हातून कधीही निसटू नये.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचं एक अभिनिवेशपूर्ण, ओजस्वी व्याख्यान फार पूर्वी मी ऐकलं होतं. झपाटून टाकणारे त्यांच्या व्याख्यानातले काही शब्द फुलांचे होते. बरेचसे शब्द निखाऱ्यांचेही होते. त्यांच्या शब्दांतली रग आणि धग हा त्यांच्या प्रकृतीचा भाग होता. प्रेरक आणि दाहक वक्तृत्वाचा जो सुखद चैतन्यानुभव मी

घेतला, तो आजही मला रोमांचित करतो. वक्ता होणं हा देखील दीर्घकालीन तपस्येचा भाग असतो. प्रत्येक वक्त्याची भाषा त्यानं कमावलेली असते. ती त्याच्या व्यक्तिमत्त्वाचाच अविभाज्य घटक बनते. 'नवा वाणी मुखे मुखे' असं सुभाषित आहे. प्रत्येकाच्या वाणीला नावीन्याची झळाळी असते. ती त्याला मिळवावी लागते. श्रेष्ठ वक्त्याचे शब्द केवळ शब्दकोशातले नसतात. ते त्याच्या हृदयकोशात तयार व्हावे लागतात. असेच शब्द काहीतरी घडवू शकतात. सुभाषचंद्र बोस म्हणाले होते, 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दूँगा.' या शब्दांत वक्तृत्वाची चमक आहे, तशीच नवं घडविण्याची धमक आहे. तुकोबांनी केलेला वक्त्यांचा गौरव असा आहे 'अंतरीचा निर्मळ, वाचेचा रसाळ, त्याचे गळा माळ, असो नसो.'

ज्यांच्यापाशी विचारांचं सामर्थ्य आहे त्यांच्या वाणीला सौंदर्य भेटतं. ज्ञानेश्वरांनी जगात 'आनंदाचे आवारू' मांडण्यासाठी वाग्विलास केला. त्यांचे शब्द गाणारे होते. नाचणारे होते. झऱ्यासारखे झुळझुळणारे होते. तुकारामांच्याही मनात आनंदाचा डोह होता. त्या डोहातले आनंदतरंग शब्दरूपानं त्यांनी जगाला दिले. जे आपल्याजवळ आहे ते प्रेमानं दुसऱ्याला देण्याची इच्छा जेव्हा शब्दरूप होते तेव्हा वाग्विलास विस्तारत जातो. शुभंकर शब्द कधीकधी आक्रमक होतात. भद्रता पाहून आनंदित होणारे शब्द अन्याय आणि कुरूपता पाहून विजेसारखे कडकडू लागतात. कधी हसवतात कधी रडवतात. वक्तृत्वाची अनेक रूपं असतात ती डोळांभरून पाहावीत.

●●●

# श्रीमंती

संपत्तीचं महत्त्व कुणाला माहीत नाही ? पैसा असेल तर भौतिक सुखं पायाशी लोळण घेतात, अशी समजूत आहे. काही अंशी ती खरीही आहे; पण केवळ संपत्तीच्या पाठीमागे धापा टाकीत रात्रंदिवस धावणारी माणसं पाहिली, की आश्चर्य वाटतं. हसूही येतं. पैसा हाच मुळी त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू बनलेला असतो. दोन्ही हातांनी पैसे गोळा करताना ही माणसं आयुष्यातील कित्येक सुखांना कायमची मुकतात. एकदा मी एका सुशिक्षित उद्योगपतीला दोन-तीन सुंदर पुस्तकं वाचायला दिली होती. प्रतिभावंत लेखकांनी केलेल्या विचारभावनांचा उत्तम आविष्कार करणारी ती पुस्तकं होती. चार-सहा महिन्यांनंतर उद्योगपतींची भेट झाली, ती पुस्तकं त्यांच्या खिजगणतीतही नव्हती. मी आठवण करून दिल्यावर ते म्हणाले, ''पुस्तकं पाहायलाही मला वेळ मिळाला नाही. अहो, माझा प्रत्येक क्षण मोलाचा आहे. पुस्तकं वाचण्यात वेळ घालवला तर माझं नुकसान होईल. असतील तुमचे कवी आणि लेखक चांगले ! त्यांनी लिहिलेली पानं चाळीत बसण्यापेक्षा माझा उद्योगधंदा मला महत्त्वाचा वाटतो. पैसा कमविण्याचे हेच दिवस आहेत. तुमचं साहित्य आणि संगीत हे सगळे रिकामटेकड्या मनाचे खेळ आहेत.''

'अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसी मा लिख', असं भवभूतीनं त्रिवार सांगितलं, ते बरोबरच आहे. कितीही पैसा मिळविला तरी त्यांची तहान भागत नाही. ही माणसं जीवनाचा अर्थ केवळ पैशातच मोजतात. पैसा मिळविताना तो कोणत्या मार्गानं मिळवावा याचं भान त्यांना राहत नाही. वाममार्गानं चालून झटपट श्रीमंत होण्याची एक प्रचंड लाट अलीकडे जगभर दिसते. देश, धर्म, न्याय वगैरे मूल्यांची पायमल्ली करून भरपूर द्रव्य मिळवावं, हा विचार प्रभावी ठरत आहे. जे या विचाराला विरोध करतात, ते व्यवहारशून्य आणि भोळसट ठरवले जातात. पैशाच्या मोहानं येणारी भ्रष्टता जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत पसरत चालल्याचं लाजिरवाणं दृश्य दिसत आहे. धार्मिक क्षेत्रातही पैसा मोजल्याशिवाय देवाचंही दर्शन दुर्लभ व्हावं, या घटनेवर अधिक भाष्य करण्याचं कारण नाही. वाढत्या चंगळवादाचा हा परिणाम आहे.

प्रामाणिकपणानं कष्ट करून चरितार्थापुरतं द्रव्य मिळवावं, हा विचार आता

इतिहासजमा झाला आहे. संरक्षण खात्यातल्या एका अधिकाऱ्यानं लक्षावधी रुपयांच्या मोबदल्यात शत्रुराष्ट्राला गुप्त कागदपत्रं दिली, अशा आरोपावरून त्याला अटक केल्याची बातमी नुकतीच वाचली. उच्चपदस्थ सुविद्य लोकांतही ही संस्कृतिहीनता भयानक वाटते. मातृभूमीशी दगलबाजी करून पैसा मिळविताना या अधिकाऱ्याला लाजलज्जा वाटू नये, हे मानसिक अध:पाताचं घृणास्पद दर्शन आहे. 'बुभुक्षित:किं न करोति पापम्।' असं संस्कृत वचन आहे. भुकेल्या पोटातल्या आगीत चांगली मूल्ये जळून जातात, असा या वचनाचा अर्थ आहे. पण या अधिकाऱ्याची भूक जबरदस्त होती. सत्तासंपत्तीच्या उबेत राहणाऱ्या या माणसाला आणखी संपत्तीची हाव सुटावी, हे आश्चर्यजनक आहे.

या संदर्भात टॉलस्टॉयच्या 'माणसाला केवढ्या जमिनीची जरूर आहे?' या कथेची आठवण होते. लोभ आणि मोह काही प्रमाणात प्रगतीला उपकारक असले तरी त्यांची गुलामाप्रमाणे चाकरी करणं मात्र विनाशाला कारणीभूत होतं, हा उपदेश केव्हाही कालबाह्य होणार नाही.

चारित्र्याला किंमत देणारा प्रामाणिक नागरिक हीच राष्ट्राची खरी संपत्ती असते. एका शेतकऱ्यानं कुठल्याशा कवितेत म्हटलं होतं, 'माझा घाम गाळून मी शेती करतो. सुविचारानं जमीन नांगरतो. प्रगतीची बीजं हळुवारपणे पेरतो. अन्यायाचे आणि अनीतीचे काटेकुटे बळकट हातांनी जमिनीतून उपटून टाकतो. या जमिनीचे लालनपालन करतो. उगवून येणारे पीक मला श्रीमंत करतं. या मिळणाऱ्या धनानं मी जन्मभर संतुष्ट राहतो. दुसऱ्या धनाची मला जरूर वाटत नाही.'

ही केवळ कविकल्पना नव्हे. जीवनाला श्रीमंत बनविणारा एक सुंदर विचार यात सामावला आहे.... पण लक्षात कोण घेतो ?

कंगाल मनाची श्रीमंत माणसं पुष्कळं असतात. मनाच्या श्रीमंतीचा परिणाम संपूर्ण जीवनावर होऊ शकतो. इमर्सनचं मत 'Without a rich heart, wealth is an ugly beggar' श्रीमंतीच्या संदर्भात हा सर्वात श्रीमंत विचार आहे हे श्रीमंतांनी आणि गरीबांनी लक्षात ठेवणं आवश्यक आहे.

●●●

# प्रेम आणि जीवन

आजच्या जगात हिंसेची एक महाप्रचंड लाट आलेली दिसते. एकमेकांचं रक्त सांडण्यात आणि प्राण घेण्यात कसला आसुरी आनंद माणसांना मिळतो, हे सांगता येत नाही. निरपराध मानवी रक्ताच्या अक्षरांनी आजच्या जगाचा इतिहास लिहिला जात आहे. कोवळ्या बालकांच्या छातीवर गोळ्यांचा वर्षाव करणारे राक्षस माणसांत आहेत, हे पाहिल्यावर माणूस प्रगतीची उंच शिखरं जिंकत चालला आहे, हे विधान हास्यास्पद वाटतं. प्रेम विसरलेला माणूस प्रगती कशी करू शकणार ? आणि त्यानं प्रगती केली तरी तिचा काय उपयोग होणार ? माणसा - माणसातलं प्रेम आटत चाललं तर या जीवनाला केवळ मरणाची नरककळा आल्याशिवाय राहणार नाही. प्रेमातूनच जीवन फुलतं. प्रेमातूनच त्याला सुगंध येतो. सत्तेच्या सिंहासनावर बसलेला एक राजाधिराज म्हणाला होता, ''मी फार दु:खी आहे. सगळे माझ्यासमोर गुलामासारखे वागतात. माझा जयजयकार करतात; पण माझ्यावर कोणीही मनापासून प्रेम करीत नाही. सत्तेमुळे मला भितात.'' त्या सम्राटाची खंत बरोबर होती. प्रेमच नसेल तर सम्राटदेखील भणंग ठरतो. एकमेकांशी वैर करण्यासाठी माणसानं पुष्कळ कारणं शोधून काढली आहेत. शस्त्रास्त्रं निर्माण करण्याचे प्रचंड कारखाने देशोदेशी रात्रंदिवस चालू आहेत. याचा अर्थच प्रेमाला आणि निर्भयपणाला झपाट्यानं ओहोटी लागली आहे. जिथं प्रेम असतं तिथं अविश्वास आणि भीती नसते. प्रेमापेक्षाही माणसाला हातातली बंदूक अधिक विश्वसनीय वाटावी, ही 'माणुसकी' कोणत्या अर्थानं प्रगत झाली, याचा विचार केला पाहिजे.

प्रगल्भ आणि उत्कट माणुसकीचा महामंत्र जगात कधी उच्चारला गेला नाही, असं नव्हे. एका श्लोकात त्याचं सार आलं आहे. 'मला राज्य नको, वैभव नको; पण दु:खपीडित प्राण्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याची वत्सल शक्ती माझ्या हातात यावी.' हा अतिशय उन्नत आणि सुंदर विचार आहे. प्राणिमात्राला प्रेम आणि अभय देणारे हात सर्वांनाच लाभले, तर जगाचं स्वरूप आमूलाग्र बदलून जाईल. ज्या डोळ्यांतून करुणा आणि प्रेम या भावनेचे अश्रू कधीच आले नाहीत, ती दृष्टी सुंदर म्हणता येणार नाही. २५ शतकांपूर्वी महावीर आणि बुद्ध यांनी प्रेमभावनेचा उद्‌घोष

केला. साऱ्या सृष्टीशी आत्मीय भावानं बोला, असा संदेश दिला. आम्ही फक्त त्यांच्या मूर्ती जपून ठेवल्या. संदेश विसरून गेलो. प्रेम करताना मन नि:स्वार्थी आणि हळुवार व्हावं लागतं; पण माणूस अहंगंड, द्वेष, इतरांविषयीची तुच्छताबुद्धी, यामुळे केवळ स्वत:वरच प्रेम करीत राहतो. 'मी' पणाच्या भिंतीपलीकडे पाहण्याची शक्ती हरवून बसतो. ज्ञानेश्वरांनी एका दृष्टांतातून प्रेमाचं स्वरूप सांगितलं आहे. कमळावर आपले पाय भ्रमर अतिशय हळुवारपणानं ठेवतो. कमळाचे केसर कुचंबू नयेत, ही जाणीव त्याच्या ठायी असते. इतकी उत्कट प्रेमभावना माणूस मात्र ठेवू शकत नाही. कारण तो भ्रमरापेक्षा अधिक 'ज्ञानी' आहे. ज्ञानाच्या वाढीबरोबर स्वार्थ आणि अहंकार वाढत असेल, तर ज्ञानाचा गंभीरपणानं पुनर्विचार केला पाहिजे. प्रेम करण्याची आणि करून घेण्याची माणसाची आंतरिक शक्ती वाढल्याशिवाय हिंसाचाराची जगावर आलेली संहारक लाट ओसरणं शक्य नाही. 'प्रेम लाभे प्रेमळाला' हेच खरं !

प्रेमशून्य जीवन म्हणजे मरणाची यात्रा असते. आईची वत्सलता आटली तर बालकाची जीवनयात्राचं खुंटली. आई हा शब्दच प्रेमाचा द्योतक आहे. प्रेमाची नाती संपली तर आयुष्याची वाट हरवून जाते. माणसाच्या ज्ञानाला प्रेमभावनेचं अधिष्ठान अत्यंत आवश्यक आहे. 'A good life is inspired from love and guided by knowledge.' हे रसेलचं सुभाषित जीवनसत्यावर प्रकाश टाकतं. शरीरात जे आत्म्याचे स्थान असते तेच आत्म्यात प्रेमाचे असते. प्रेम न करता विजय मिळाला तरी तो नको. प्रेम करून मी पराभूत झालो तरी खऱ्या अर्थानं यशस्वी झालो असंच म्हणेन. एका प्रेमिकाचं हे जीवन विषयक तत्त्वज्ञान आहे.

●●●

# प्रवृत्तीचा मंत्र

वयाची ऐंशी वर्षे उलटून गेलेला एक शेतकरी भर उन्हात, आपल्या शेतात काम करीत होता. हाती कुदळ, फावडे घेऊन जमीन खोदायची; तिथं रोपं लावायची, पाणी घालायचं असा त्याचा उद्योग चालू होता. हातपाय थरथरत होते, उन्हातले परिश्रम शरीराला सोसवत नव्हते, पण तरीही तो चिकाटीनं कष्ट करीत होता. त्यानं जांभळाची, पेरूची आणि बोराची झाडं लावली. या झाडांची फळं त्याला खायला मिळतील ही शक्यता नव्हती. त्यालाही ते माहीत होतं, पण फळझाडं लावण्याचं, नवी बीजं पेरण्याचं आपलं काम तो श्रद्धेनं करीत होता. कष्ट करणारे हात आहेत तोपर्यंत आपण आपली कामं करीतच राहिलं पाहिजे हा त्याचा निर्धार होता. म्हणूनच या वयातही तो शेतात आपला घाम गाळत होता. व्यवहारी दृष्टीनं पाहिलं तर हा वेडेपणा होता. ज्या वयात 'हरी हरी' करीत खाटल्यावर पडून राहायचं, शरीराला विश्रांती द्यायची, नातवंडांबरोबर खेळायचं त्या वयात काबाडकष्ट कशासाठी करायचे ? जी फळं आपल्याला कधीच खाता येणार नाहीत त्यांची रोपं लावणं हे अव्यवहारीपणाचं आहे असं कुणालाही वाटेल, पण तो शेतकरी स्वत:साठी फळांची अपेक्षा न करता आपलं कर्म अखंड करीत होता. यात एक वेगळं शहाणपण आहे. वय झालं म्हणून निवृत्तीचा विचार त्यानं केला नाही. कुणीतरी त्याला विचारलं.

"बाबा, आता हातपाय थकले, घराच्या सावलीत पडून राहायचं, आणि देवाचं नाव घ्यायचं. शेतात येण्याचं कारण नाही." शेतकरी म्हणाला, "असं कसं होईल? या मातीतच माझा देव आहे. या काळ्या आईची सेवा करत तिच्या मांडीवर अखेरची झोप घ्यायची. या काळ्या आईनं मला वाढवलं, कुटुंबाला पोसलं. तिला माझ्या शेवटच्या दिवसांत मी अंतर देणार नाही. आम्ही ज्या झाडांची फळं खाल्ली ती झाडं आमच्या वाडवडिलांनी लावली होती. आता पुढच्या पिढीसाठी आम्हालाही काही केलं पाहिजे."

जन्मभर शेती करणाऱ्या त्या शेतकऱ्यानं जीवनाचं तत्त्वज्ञान सांगितलं. हा प्रवृत्तीचा रसरशीत विचार भल्याभल्यांना कळत नाही. पण आपल्या आयुष्याच्या शाळेत तो शेतकरी शिकला होता. निष्काम कर्मयोगाचा संदेश जणू तो आपल्या

निढळाच्या घामातून देत होता. नवी पेरणी करीत राहणं हेच प्रवृत्तीचं तत्त्वज्ञान आहे. पण निवृत्त झाल्यानंतर बहुसंख्य माणसं निष्क्रिय होतात. केवळ पैलतीरावर दृष्टी लावून बसतात. एक प्रकारची विरक्ती त्यांच्या मनात दाटून येते. निवृत्तीचं आणि वैराग्याचं कौतुक आमच्या देशात आजपर्यंत पुष्कळ झालं. अर्जुनासारखा धीरवीरही निवृत्तीचा आणि संन्यासाचा विचार श्रीकृष्णाला बोलून दाखवतो. अनेक ज्ञानवंत कर्मसंन्यास घेऊन रानावनात भटकत राहिल्यांची उदाहरणं आहेत. कर्मवादी विचारापेक्षा नैष्कर्म्याला एकेकाळी प्रतिष्ठा मिळाली होती. प्रवृत्तीपेक्षा निवृत्तीचं गुणगान अधिक होत होतं. संसार करणाऱ्यांपेक्षा सोडणाऱ्यांची स्तुतिस्तोत्रं अधिकांशानं गायिली जात असत. पण प्रवृत्ती आणि पुरुषार्थ यातूनच समाज आणि राष्ट्र उभं राहतं. संस्कृतीची रचना आणि उत्कर्ष याच गुणांतून होतो. हे झडझडून सांगणारी 'गीता' जेव्हा अर्जुनानं ऐकली तेव्हा त्याचा संदेह दूर झाला. पुरुषार्थी प्रवृत्तीचा विचार लोकमनात सदैव जागा ठेवण्याचं काम विचारवंतांनी आणि नेत्यांनी करीत राहिलं पाहिजे. तेच स्वार्थप्रेरित झाले किंवा निवृत्तीचा घोष करू लागले तर राष्ट्राचं भवितव्य अंधारून जाईल. सर्वच संतांनी कर्मवादाचा पुरस्कार केला आहे. संतांच्या प्रवृत्तीवादी विचारातून स्वातंत्र्याचा इतिहास घडवणारा छत्रपती शिवाजी निर्माण झाला. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत प्रवृत्तीचा घोष जेव्हा तीव्रतेनं दुमदुमू लागेल तेव्हा राष्ट्रजीवनात अभ्युदयाची एक जोमदार लाट उचंबळून येईल. देववाद आणि दैववाद यांच्याकडं पाठ फिरवून कर्मवादाचा झेंडा हाती घेतल्याशिवाय गत्यंतर नाही.

आपल्या प्रामाणिक कष्टातून नव्या जीवनाची उभारणी करण्याऐवजी एखाद्या आडवाटेनं जाऊन स्वार्थ साधण्याकडे प्रवृत्ती होणं हा सामाजिक अध:पात आहे. अशा वेळी ज्ञानेश्वरांच्या संदेशाची आठवण होते. ते म्हणतात,

'मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे॥'

मार्गाधारे या शब्दाचा अर्थ 'मूल्याधारे' असाच करावा लागेल. उद्याच्या आमच्या राष्ट्राची प्रगती करण्यासाठी कष्ट करणारे हात आणि स्वप्न पाहणारी दृष्टी मिळाली पाहिजे. नवी बीजं पेरण्यासाठी प्रवृत्तीचा मंत्र जपला पाहिजे.

●●●

# लोक काय म्हणतील ?

'लोक काय म्हणतील ?' या प्रश्नाला उत्तर देताना बर्नार्ड शॉ म्हणाला होता, 'लोक, लोक म्हणजे कोण ? जे आपली निंदा करतात तेच ना ? मग त्यांना भ्यायचं कशासाठी ? ते काय म्हणतील ते म्हणू द्या. आपण ठरवलेल्या रस्त्यानं नीट चालत राहायचं.' या म्हणण्यात निश्चितच तथ्य आहे.

लोकमत नेहमीच चंचल असतं. जनसमूहाला खूप डोकी असतात; पण मेंदू नसतो. प्रत्येक ध्येयनिष्ठ समाजसेवकाला लोकनिंदेच्या चिखलातून प्रवास करावा लागला आहे. पण म्हणून जे आपल्या अंत:करणप्रवृत्तीला सयुक्तिक वाटतं ते लोकभयानं करायचं नाही हे शहाणपणाचं नाही. क्रांतिकारकांच्या वाटेवर विरोधी लोकांनी निंदेचे आणि अवहेलनेचे काटेकुटे पेरून ठेवलेले होते. साधुसंतांनाही या काट्यांची तीव्र शल्यं सहन करावी लागली. महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात प्रथम रोवली. त्या वेळी सुबुद्ध समजल्या जाणाऱ्या जनतेनेही त्यांचा सतत छळ केला. फुले संघर्षशील वृत्तीचे सुधारक असल्यामुळे लोकनिंदेच्या वादळातही ते छाती काढून उभे राहिले. म्हणूनच एका नव्या युगाला सुरुवात झाली. 'सुधारक'कर्त्या आगरकरांनाही प्रखर विरोधाला तोंड द्यावं लागलं. पण तेही निश्चल राहिले.

सुधारकानं, विचारवंतानं आणि नेत्यानं लोकाभिमुख असावं, पण लोकांचा अनुनय करीत त्यांनी लोकपूजक होऊ नये. आज विरोध करणारी जनता उद्या आपल्याला अनुकूल होऊ शकेल, हा आशावाद ठेवून प्रामाणिकपणे जनसेवा करावी लागते. बहुसंख्य लोक परंपरावादी असतात. पिढ्यानूपिढ्या मळलेल्या वाटेनं ते चालत असतात. नवी वाट दाखवणारा विचारवंत त्यांना प्रथमदर्शनी आवडत नाही. पण हळूहळू नव्या वाटेलाही प्रतिष्ठा प्राप्त होते. समाजप्रबोधन करायचं आहे त्याने चिवटपणानं लोकमत संघटित केलं पाहिजे. लोकमनाची मशागत केली पाहिजे.

नव्या धर्माची स्थापना करणाऱ्या एका धर्मपुरुषाच्या पहिल्या प्रवचनाला पाच-दहा लोकसुद्धा नव्हते. धर्मप्रचारकाचे शिष्य निराश झाले. दुसऱ्या सभेत काही विरोधकांनी दगडफेक केली. अपशब्दांचा वर्षाव केला. काही दिवसांनी विरोधाची

धार क्षीण झाली. हळूहळू लोक त्याचे शब्द ऐकण्यासाठी गर्दी करू लागले.

एका शिष्यानं विचारलं, ''लोकांचा विरोध कायम राहिला असता, तर काय केलं असतं ?'' तो धर्मज्ञानी हसून म्हणाला, ''लोक आपला मार्ग सोडत नाहीत म्हणून मी माझा मार्ग सोडावा काय ? जे माझ्या मनाला पवित्र आणि प्रशस्त वाटतं त्याचा अंगीकार करताना कोणतीही शक्ती विरोधात उभी राहिली तरी जे मला शुद्ध वाटतं त्याचा मी त्याग करणार नाही. मला लोकांबरोबर जायचं आहे; पण लोक म्हणतील त्या रस्त्यानं नव्हे ! लोकहिताचा जो मार्ग मला इष्ट वाटतो त्या मार्गानं मी लोकांबरोबर प्रवास करीन. अन्यथा एकाकी वाटेनं चालत राहीन.'' त्याच्या शब्दांत निश्चयी शांतपणा होता. लोकांविषयी कसलीही कटुता नव्हती. समाजासंबंधी आत्मीयता त्याच्या शब्दात आणि कृतीत प्रतिबिंबित झाली होती. 'लोक काय म्हणतील?' या प्रश्नानं, असे ध्येयवादी लोक कधीच विचलित होत नाहीत. ते लोकमत सुजाण बनवतात. संस्कारित करतात. लोकही उशिरा का होईना, त्यांच्या पाठीमागं चालत राहतात.

लोक काय म्हणतील आणि ते कसे वागतील हे निश्चितपणे सांगता येत नाही. लोकमत चंचल असतं. लहरी असतं. ते सीतेलाही दूषण देतं आणि लहर फिरली की तिला देवत्वाच्या सिंहासनावर बसवतं. लोक काहीही म्हणोत माझं अंतर्मन मला जे सांगतं ते मी करीतच राहीन असा निर्धार करणाऱ्याच्या मागे लोक भाविकतेनं चालू लागतात. 'ऐकावे जनाचे पण करावे मनाचे.' महनीय व्यक्तींच्या जीवनाचं हेच स्वरूप असतं. हृदयाची हाक ऐकणं हाच ध्येयवाद्याचा धर्म असतो.

●●●

# सुखाची झोप

भगवान बुद्धांना त्यांच्या एका शिष्यानं विचारलं, ''भंते, हे थंडीचे दिवस आहेत. आपण झाडाखाली वाळलेल्या पानांवर रात्री शयन करता. थंडगार वाऱ्यात पुरेशी वस्त्रप्रावरणं न घेता आपल्याला झोप तरी येते का ?'' बुद्ध हसले आणि म्हणाले, ''आयुष्मान, समज मृदुमृदुल शय्या आणि ऊबदार वस्त्रप्रावरणे आहेत; पण मनात विकारांची खळबळ चालू आहे. शांती नाही. शरीरातही वेदना आहे, तर अशा मनुष्याला निद्रासुख घेता येईल का ? झोपेसाठी शांत, निर्विकार, प्रसन्न मनाची आवश्यकता असते. ज्याचं मन स्थिर नाही, अशांत आहे, त्याला राजप्रासादातही स्वस्थ निद्रा मिळणं अशक्य आहे. मला वाळलेल्या पानांवरही उत्तम झोप येते. झोपेसाठी निकोप मन हेच सर्वाधिक महत्त्वाचं कारण आहे.''

भगवान बुद्धांच्या तपःपूत मनात सर्व प्राणिमात्रांविषयी करुणा आणि प्रेम होतं. अशा निर्मलहृदयी व्यक्तीला कुठेही शांत निद्रा घेता यावी यात आश्चर्य नाही. आपण अनेक प्रकारच्या लहानमोठ्या विवंचनांच्या विळख्यात स्वतःला निष्कारण गुरफटून घेत असतो. आपण कोणाशीतरी द्वेषमूलक स्पर्धा करीत असतो. कुणाचं तरी अकल्याण चिंतत असतो. क्रोधानं आणि क्षोभानं मन व्यापलेलं असतं. अशा स्थितीत झोप तर राहोच, पण जीवनातले कित्येक आनंदी क्षण आपण हरवून बसतो. सत्ता मिळत नाही या निराशेनं ग्रासलेल्या एका पुढाऱ्यानं म्हटलं होतं, ''तुम्ही मला फुलं देता, माझं शुभचिंतन करता याबद्दल आभारी आहे; पण फुलांचा सुवास मला आनंद देऊ शकत नाही. माझ्या प्रतिस्पर्ध्यानं सत्तेच्या राजकारणात मला पराभूत केलं, हे दुःख मी विसरू शकत नाही. माझी हरविलेली झोप मद्याच्या बाटलीत मी दररोज शोधतो. अजून शोध लागला नाही.'' झोपच लागत नाही अशी तक्रार करणारी बहुसंख्य माणसं वेगळ्या अर्थानं जन्मभर झोपेतच असतात. जागृतीचा स्पर्शही त्यांना होत नाही.

जन्मठेपेची शिक्षा झालेला एक कैदी सूडाच्या भावनेनं इतका पेटला होता, की रात्री अर्धवट झोपेत तो कोठडीच्या भिंतीवर आपल्या मुठीनं प्रहार करीत म्हणायचा, ''मर ! तुझ्यावर सूड उगवून तुला नाहीसा करीन तेव्हा मला शांत झोप

मिळेल.'' आपले शत्रुत्वाचे आणि सूडभावनेचे विचार त्यानं हळूहळू जिंकले असते, तर त्याला तुरुंगातदेखील चांगली झोप मिळाली असती. पण आपल्याच वासना-विकारांच्या तुरुंगात तो जन्मभर डांबला गेला होता. विवेकी मनुष्य संकटातदेखील आपलं मन संतुलित ठेवतो. तो शांतपणानं परिस्थितीचा विचार करतो. फुलं मिळाली तर आनंदानं स्वीकारतो. पदरात काटे पडले तरी क्षुब्ध न होता काटे कसे दूर करावेत याचा तो शांतपणानं विचार करतो. त्याच्या मानसिक प्रकृतीला विकृतीचा स्पर्श होत नाही. लोकमान्य टिळकांची अशी गोष्ट सांगतात की, सहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठवल्यावर पोलिस अधिकारी त्यांना आगगाडीतून कडेकोट बंदोबस्तात घेऊन जात होते. त्या सर्व अधिकाऱ्यांना रात्रभर जागावं लागलं; झोप येणं शक्यच नव्हतं, पण लोकमान्य टिळक मात्र शांत झोपी गेले होते. गीतेचं तत्त्वज्ञान आकंठ प्यायलेले टिळक आपत्तीतदेखील शांत, स्थितप्रज्ञ वृत्तीनं राहायचे. ज्याचं अंतर्मन शुद्ध आणि स्वच्छ असतं त्याला सहजपणे झोप येऊ शकते.

एका लेखकाला निद्रानाशाचा विकार जडला. झोपेची औषधे घेऊनही त्याला झोप येत नव्हती. त्यानं मला मोकळेपणानं सांगितलं. 'एका टीकाकारानं माझ्या लेखनावर मत्सरी वृत्तीनं निर्दय टीका केली आहे. ती वाचल्यापासून माझी अस्वस्थता कमी होत नाही.' मी त्याला म्हणालो, 'एका मूर्खाच्या टीकेला तू निष्कारण महत्व देतोस. असले प्रसंग विसरायचे असतात. ते टीकेचे शब्द मनातून काढून टाक. स्वत:चं मानसिक आरोग्य बिघडवून घेणं हे तुझ्यासारख्या मोठ्या लेखकाला शोभत नाही. गीतेत म्हटलं आहे. स्तुती आणि निंदा दोन्ही गोष्टींना काही किंमत नाही. आपण उगीचच त्यांचं अवडंबर माजवतो.' टीकाखोरांची टीका ऐकून करमणूक व्हावी.

●●●

# प्रेमाची चंद्रभागा आटली !

वयाची साठी उलटून गेल्यावर आत्मपरीक्षण करणाऱ्या एखाद्या माणसाला जाणीव होते की, आपण आजपर्यंत आयुष्यात काहीही करू शकलो नाही. अर्धं आयुष्य तर झोपेतच गेलं. काही वर्षे बालपणात गेली. पोटासाठी नोकरी, कुटुंबाचं पोषण आणि रोगांशी व संकटांशी झगडणे यात अनेक वर्षे गेली. एवढाच आपल्या आयुष्याचा जमाखर्च मांडता येईल. जमेच्या बाजूला शून्य आहे. कधी एखाद्या उदात्त विचारानं प्रभावित झालो नाही. एखाद्या कलेचा ध्यास घेतला नाही. कधी चांगलं साहित्य वाचलं नाही. भोवतालच्या माणसांची सुखदुःखं कधी जाणून घेतली नाहीत. आजपर्यंतचं आयुष्य वाहून गेलं. आता पाहतो तर समोर वाळवंट पसरलं आहे. केवळ शरीरानं जगलो. एखाद्याच्या डोळ्यांतले अश्रू पुसू शकलो नाही. कोणाबद्दलच्या सहानुभूतीनं मन कधी भरून आलं नाही. घरातल्या माणसांशीही प्रेमानं वागलो नाही. हा पश्चात्तापाचा विचार त्याच्या मनात घोळू लागतो. असे विचार काही थोड्या माणसांच्या मनात डोकावतात. आपलं चुकल्याची खंत त्यांना वाटत राहते. पण बहुसंख्य लोकांना ही जाणीव कधीच होत नाही. खाणं-पिणं आणि झोपी जाणं यापलीकडं जाऊन जीवनाच्या प्रयोजनाचा शोध घ्यावा असं त्यांना वाटतच नाही. ज्याला कसलंतरी ध्येय असतं त्याची सुखदुःखं संपन्न असतात. ज्याला कोणतंच भव्य स्वप्न पडत नाही, तो कूपमंडूक वृत्तीचा माणूस एका अर्थानं सुखी असतो. पण असल्या कंगाल सुखापेक्षा उदात्त दुःखाची झळ ज्यांना जन्मभर भोगावी लागते ती माणसं काहीतरी घडवू शकतात. समाजवृक्षावरची बांडगुळं होऊन जगत राहणाऱ्या लोकांनी त्या वृक्षाला कधी खतपाणी घातलं नाही. रक्षणापेक्षा शोषणाकडं त्यांचं अधिक लक्ष असतं. मात्र यालाही काही उज्ज्वल अपवाद असतात. त्यांच्यामुळं संस्कृतीच्या इतिहासाला अर्थ येतो. जीवनाला आधार मिळतो. असा आधार देणारी माणसं सत्ताधीश, श्रीमंतही नसतात. प्रकांडपंडितही नसतात. पण त्यांच्या मनात लोककल्याणाची ज्योत तेवत असते. अशी माणसं शतकं उलटली तरी जिवंत असतात.

संत नामदेव हे काही पंडित नव्हते. सामान्य परिस्थितीत ते जगत होते. पण

हा नामा शिंपी आपल्या हृदयातल्या भक्तिप्रेमाच्या धाग्यानं जनतेची फाटलेली मनं निष्ठेनं शिवीत होता. 'सुंबाचा करदोडा, रकट्याची लंगोटी । नामा वाळवंटी कथा करी ।' आपल्या कीर्तनातून 'ज्ञानदीप' लावणारा हा संत लोकजीवनाला नवा आकार देत होता. सातशे वर्षांपूर्वी प्रचाराची काय साधनं होती ? कोणत्या सुविधा होत्या ? पण चंद्रभागेच्या वाळवंटात अठरापगड जातीजमातीच्या लोकांना एकत्र आणण्याचं ऐतिहासिक काम या विठ्ठलभक्तानं केलं. चंद्रभागेच्या प्रवाहात प्रेमगंगेचा ओघ निर्माण करण्याचं कार्य या महान भक्तानं केलं. नामदेवांचा देव केवळ पंढरीत नव्हता. तो सर्वत्र होता. म्हणूनच एके दिवशी भागवतधर्माची पताका खांद्यावर घेऊन आणि डोळ्यांत मानवी एकतेचं स्वप्न घेऊन ते पंजाबपर्यंत चालत गेले. भक्तीचा आणि प्रेमाचा सुईदोरा त्यांच्या हातात होता. लोकजीवनाच्या फाटलेल्या वस्त्राला भावभक्तीनं टाके घालणारा हा महान संत म्हणजे जीवननिष्ठेचं एक सुंदर प्रतीक आहे. त्या पार्श्वभूमीवर आजच्या जगाचं चित्र किती अस्वच्छ, किती ठिकाणी भेगाळलेलं आणि भीषण आहे हे लक्षात येतं. एखाद्या ध्येयविचारानं रोमांचित होऊन सारं आयुष्य झोकून देण्याचे ते सुंदर दिवस आता उरले नाहीत काय ? फाटलेलं जोडण्यापेक्षा जोडलेलं फाडण्यात अधिक शौर्य आहे, तीच देवधर्माची आणि देशाची सेवा आहे ही विकृत विचारधारा आज वेगानं वाहत आहे. संत नामदेव 'ज्ञानदीप लावू जगी' असं म्हणत कीर्तन करीत होते. आजचे तथाकथिक धार्मिक लोक 'आग लावू जगी' अशी घोषणा देत धर्मकीर्तन करीत आहेत. नामा शिंपी बैलगाडीच्या युगात होऊन गेला. आता जेटयुगात त्याचं दर्शन कसं होणार ? प्रेमाची चंद्रभागा आटली हेच खरं !

पण इतकं निराश होण्याचं कारण नाही. आटलेली चंद्रभागा पुन्हा खळखळून वाहू लागेल असे प्रयत्न माणसानं केले पाहिजेत. सर्वांविषयी आपुलकीचा भाव आपल्या मनात जागा झाला की मग वठलेल्या झाडाला नवे अंकुर येतील, आटलेली चंद्रभागा झुळझुळु लागेल. 'हे विश्वचि माझे घर' ही विशाल उदार भावना पाहिजे.

●●●

# कवितेचं सौंदर्य

सुखदु:खांच्या अनुभवाला आलेलं उत्कट शब्दरूप म्हणजे कविता. कवितेतून कवीच्या अंत:करणाचा सजीव हुंकार जेव्हा प्रकट होतो, तेव्हा तो वाचकांच्या हृदयाला भिडतो. शब्दाच्या खेळापेक्षा भावनेचा मेळ, हेच काव्याचं खरं सामर्थ्य असतं. या दृष्टीनं पाहिलं, तर संतांच्या कवितेत त्यांच्या मनाची कित्येक स्पंदनं आणि स्फुंदनं समर्थपणानं व्यक्त झाली आहेत. साहित्य लिहिण्यासाठी साहित्यशास्त्राचा अभ्यास करण्याचं कारण नाही. कित्येकांना धड लिहिता-वाचता येत नव्हतं. अक्षरओळख नसतानाही 'अक्षर' काव्याची रचना ते करू शकले, याचं कारण ते जित्याजागत्या मनानं जीवनाचा अनुभव घेत होते. आपल्या मनाची सारी कंपनं शब्दांतून सांगण्याचा ध्यास लागला, की साहित्य फुलू लागतं. त्याला पांडित्याची गरज नाही. चोखामेळ्यासारखा सर्वार्थानं दु:खी, उपेक्षित संतकवी आपल्या वेदनेचं जे चित्र रेखाटतो, ते अत्यंत हृदयस्पर्शी आहे. त्याच्या प्रामाणिक शब्दांना साहित्याचं सौंदर्य प्राप्त होतं. चोखोबांची आणि अस्पृश्य समजल्या गेलेल्या शापित भक्तांची कविता त्यांच्या हताश जीवनाबरोबरच सामाजिक अन्यायावरही भेदक प्रकाश टाकते.

कविता नुसती गुणगुणण्यासाठी नसते. केवळ रंजनासाठीही नसते. तिच्या स्पर्शानं अंतर्मुखता आली पाहिजे. चोखामेळा, सोयराबाई, कर्मवेळा, बंका, कान्होपात्रा, भागू, जनाबाई या उपेक्षित संतांची कविता आपल्या सामाजिक इतिहासातल्या अंधारावर आणि अन्यायावर धगधगीत प्रकाश टाकते. एक साहित्यपंडित मला म्हणाले, ''अहो, हे सगळे अशिक्षित, भोळेभाबडे भक्तकवी आहेत. यांच्या काव्यात ज्ञान नाही. नवा विचार नाही. देवभक्तीचे चार शब्द कसेबसे उच्चारले, की झाली यांची कविता. हे अज्ञानयुगाचे प्रतिनिधी आहेत. त्यांचं कौतुक म्हणजे भाबड्या भक्तीचा बडिवार माजवणं आहे. यात साहित्याचं सौंदर्य नाही. विचारांचा तर पत्ताही नाही.'' त्यांनी केलेलं हे रसग्रहण त्यांच्या 'पांडित्याला' शोभण्यासारखंच होतं. ज्या पांडित्याला माणूस कळत नाही, माणसांवरचे अन्याय कळत नाहीत, दु:खवेदनांचा स्पर्श समजत नाही, ते पांडित्य कवडीकिमतीचं आहे. संत चोखोबांचा मुलगा कर्ममेळा आपल्या एका कवितेत परमेश्वराला जाब विचारतो,

आमुची केली हीन याती। तुका का न कळे श्रीपती
जन्म गेला उष्टे खाता। लाज न ये तुमचे चित्ता ॥
तुमच्या संगतीने काय सुख आम्हा। तुम्हा मेघश्यामा न कळे काही ॥
हीनत्व आम्हासी हीनत्व आम्हासी। हीनत्व आम्हासी देवराया ॥

हे एका व्यक्तीचं दु:ख नव्हे. लक्षावधी, कोट्यवधी दलित वंचितांच्या वेदनेचं दर्शन यातून घडतं. हा एक अन्यायी इतिहास आहे. ज्या समाजरचनेत माणसाचं माणूसपण काळवंडून जातं आणि गुलामगिरीच्या चक्रव्यूहात माणूस सापडतो, त्या जीवनाची ही जळती कथा आहे. दलितांनीच ती आपल्या शब्दांतून मांडली. संतकाव्यातून समाजमनाचे हे उद्‌गार बाहेर पडले, यातच त्या काव्याची थोरवी सामावली आहे. संतकविता ही देवांची असण्यापेक्षा ती माणसांच्या वेदनेची आणि चिंतनांची कविता आहे. देवाची भक्ती करणाऱ्या या भक्तांना मंदिराचे दरवाजे कायमचे बंद होते. त्यांच्यापासून देव हिरावून घेतला होता. समाजव्यवस्थेनं त्यांना पार उघडं केलं होतं. कर्ममेळ्यानं आपलं गाऱ्हाणं देवाकडे मांडलं असलं तरी ते समाज घडविणाऱ्या माणसांसाठीच प्रामुख्यानं सांगितलं आहे. देव आणि माणूस यांची भेट कधीही होऊ न देणारी व्यवस्था केवढी अन्यायी होती, हे त्या काळच्या आणि कदाचित आजच्याही तथाकथित पंडिताच्या लक्षात आलेलं नाही. पोथ्यापुराणं वाचून माणूस विद्वान झाला असता, तर अन्याय आणि शोषण हे शब्दही उरले नसते. कबीरांच्या म्हणण्याप्रमाणे 'प्रेम' ही अडीच अक्षरं ज्याला कळली, तोच खरा पंडित!

कवितेनं शब्द जुळवावेत; पण त्याहीपेक्षा माणसांची मनं जुळवणारे शब्द मिळवावेत. 'माणूस तितुका मेळवावा' हे ब्रीद साहित्यानं स्वीकारलं पाहिजे. अश्रू टिपणारे, सांत्वन करणारे, धीर देणारे, प्रेम करणारे, माणूसपण वाढवणारे शब्द म्हणजेच साहित्य. असे शब्द ज्याला लिहिता येतात, तोच खरा साहित्यिक. साहित्याचा हा धर्म अजून भल्या भल्या साहित्यिकांना कळत नाही, हे दुर्दैव आहे. संतकवितेतून मनाचा प्रेमशोध घेण्यात आला आणि ममतेवर व समतेवर श्रद्धा ठेवण्यात आली, हेच त्या कवितेचं खरं सौंदर्य !

●●●

# अंधश्रद्धा

कुठल्याशा शहरात एका लोकप्रिय सिनेनटाच्या भक्तांनी त्याचं मंदिर उभं केलं आहे. त्याच्या मूर्तीची हे भाविक लोक पूजाअर्चा करतात. ही वार्ता वाचली तेव्हा आश्चर्याचा धक्का बसला. हाडामांसाच्या माणसांचं दैवतीकरण करणं हे हास्यास्पद आहे. प्रत्येक माणसात देवत्वाचा अंश असतो, हे म्हणणं सयुक्तिक असलं तरी कोणत्याही माणसाला देवत्वाच्या मखरात बसवून त्याच्यावर भक्तिभावानं फुलं उधळणं, हे अंधश्रद्धेचं आणि आणि अज्ञानाचं द्योतक आहे. कोणत्याही दगडाला शेंदूर फासला की त्याच्यासमोर देव म्हणून नम्र होणारी अतिरेकी श्रद्धाळू प्रवृत्ती पूर्णपणे बुद्धीविरोधी आहे. माणसाला देवत्वाच्या देव्हाऱ्यात बसविण्याचा हा खटाटोप कित्येक शतकांपासून चालू आहे. देवकल्पनेला विरोध करणाऱ्या बुद्धिनिष्ठ व्यक्तींचीदेखील देव म्हणूनच समाजात स्थापना केली जाते, आणि देवांच्या संख्येत आणखी भर पडत जाते.

एकीकडे शास्त्रज्ञानाची वाढ होत असताना अंधश्रद्धेच्या अनेक लाटा समाजात वेगानं येत आहेत. शास्त्र विषयाचा प्राध्यापक जेव्हा आपला प्रबंध परीक्षेसाठी विद्यापीठाला सादर करण्याआधी एखाद्या ज्योतिष्याचा सल्ला घेऊन त्यानं सांगितलेल्या शुभ मुहूर्तावर तो सादर करतो, तेव्हा त्याच्या शास्त्रज्ञानाबद्दल काय बोलावं, हे कळत नाही. जिथं विद्यापीठीय विद्वान निरर्थक हास्यास्पद श्रद्धेच्या आहारी जातात, तिथं सर्वसाधारण माणसाच्या भ्रामक समजुतीवर आणि आचारविचारांवर टीका करण्यात काय अर्थ आहे ? काही वर्षांपूर्वी गणेशोत्सवात गणपती दूध पीत असल्याची अफवा देशात पसरली होती.

अंधश्रद्धेचं मूळ माणसाच्या वैचारिक दुबळेपणात आहे. ज्यांना तर्कशुद्ध रीतीनं कार्यकारणभाव समजून घेता येत नाही, अशी माणसं अंधश्रद्धेच्या जाळ्यात लवकर सापडतात. निवडणुकीत दोन-तीन वेळा प्रचंड मतांनी पराभूत झालेले एक सुशिक्षित उमेदवार मला म्हणाले, ''मागील खेपेस माझे ग्रह अनुकूल नव्हते. आता ते या वेळी माझ्यावर प्रसन्न आहेत. आमच्या महाराजांनी 'मी एक लाख वेळा 'राम' हा शब्द लिहावा म्हणजे मी यशस्वी होईन' असं सांगितलं आहे; तुमचं काय मत

आहे ?''

त्या प्रसिद्ध राजकारण्याचा प्रश्न ऐकून मला आश्चर्य वाटलं. मी म्हणालो, ''माझं मत ऐकून तुम्ही रागवाल. लाख वेळा 'राम' शब्द लिहून तुमचं अक्षर सुधारेल; निवडणुकीत त्यामुळे यश मिळेल असं वाटत नाही.''

वस्तुत: राम हे पुरुषार्थाचं प्रतीक आहे. सैन्य जमवून आणि सेतू उभारून त्यानं लंकेवर झेप घेतली. रावणाला पराभूत केलं. न्यायाची ध्वजा उभारली. सत्य आणि न्याय यशस्वी व्हायचे असतील तर त्यांच्यामागे सामर्थ्य उभं केलं पाहिजे, हा सुसंगत, बुद्धिवादी विचार रामचंद्रानं केला होता. त्याचा विजय सामर्थ्यामुळे व दुर्दम्य महत्त्वाकांक्षेनं झाला. तो नवससायासानं झालेला नाही.

बहुसंख्य माणसं प्रतिकूल परिस्थितीशी झगडताना थकून जातात. ती हळवी आणि दुबळी बनतात. आत्मविश्वास गमावलेले लोक साधुसंन्याशाच्या कृपाप्रसादानं आपण संकटमुक्त होऊ, असा आशाळभूतपणे विचार करतात. आश्चर्याची गोष्ट अशी, की हे साधू महाराज आजारी पडले, की रुग्णालयात अद्ययावत उपचार घेतात. यालाही भोळ्याभाबड्या भक्ताचं उत्तर ''ही महाराजांची एक लीला आहे. या ईश्वरी लीलेपुढे आपण फार सामान्य आहोत.''

आपण फार सामान्य आहोत, हेच खरं आहे, अंधश्रद्धेचे दोर तर्कशुद्ध विचारांनी कापून काढल्याशिवाय आपलं 'सामान्यपण' गळून पडणार नाही.

आईन्स्टाईननं एक प्रश्न विचारला होता. 'What is the hardest thing in the world ?' त्यानं स्वत:च उत्तर दिलं 'To think.' माणसं विचार करीत नाहीत. कारण सुसंगत विचार करणं हे बुद्धीचं कार्य आहे. चार लोक सांगतील त्याप्रमाणं माणसं सरधोपटपणे वागतात. अंधश्रद्धेचं मूळ केवळ अज्ञान हेच असतं. श्रद्धेला दृष्टी नसते म्हणूनच डोळे झाकून लोक तिच्या प्रदेशात प्रवेश करतात.

●●●

# माणूस : असा आणि तसा !

माणूस एक विलक्षण कोडं आहे. ते उलगडण्याचा आजवर कमी प्रयत्न झाला नाही ! पण म्हणून माणूस आकलनाच्या कक्षेत येईल, असं मात्र होणं कठीण आहे. माणसाच्या किती तऱ्हा सांगाव्यात ! किती त्याचे रंग. किती ढंग. माणसाच्या मानसिक घडणीत चित्रविचित्र रंगांच्या इतक्या लहरी आहेत, की त्यांची मोजदाद करणंही अशक्य आहे. एकदा एका प्रेमिकानं प्रेयसीला अनुनयाची अनेक पत्रं लिहिली. तिच्याशिवाय जीवन किती रसहीन आहे, हे आळवून-घोळवून सांगितलं. त्याच्या प्रेमातली ही आर्तता पाहून प्रेयसीनं त्याला होकार दिला. लग्न होताक्षणीच तो तिला म्हणाला, ''आता आपण विवाहबद्ध झालो. तू दूर होतीस, अप्राप्य होतीस, तेव्हा तुझं आकर्षण वाटत होतं. आता आपण एकत्र आलो तुझा तिरस्कार करायला हे कारण पुरेसं आहे.''

आता या माणसाला काय म्हणावं ? ज्यासाठी आटापिटा केला, ते पदरात पडल्याबरोबर कवडीमोलाचं वाटावं, ही मानसिक ठेवण विकृतीचा एक नमुना नव्हे काय ? विचित्र, अनाकलनीय मानवी स्वभावाचे असंख्य नमुने आपल्याला ठायी ठायी बघायला मिळतात. त्यामुळेच माणूस नेमका कसा आहे, ते ओळखता येत नाही. आपल्याबद्दलही इतर माणसं हेच म्हणू शकतील. माणसाचं मन हे एखाद्या अंधाऱ्या खोल डोहासारखं आहे. त्यातल्या पाण्यात उचंबळून येणारे परस्परविरोधी तरंग मानसशास्त्रज्ञालाही यथार्थतेनं जाणता येत नाहीत. कवींनी, नाटककारांनी हा चमत्कारिक माणूस शोधण्याचा प्रयत्न आपल्या साहित्यातून शतकानुशतकं केला आहे; पण म्हणून माणूस आपल्याला सापडला आहे, असं कोणताही लेखक म्हणू शकणार नाही. याच माणसानं, करुणा आणि प्रेम यांच्या शांतिधारा जगाला आत्मीयतेनं देणाऱ्या येशू ख्रिस्ताला क्रूसावर निर्दयतेनं बळी दिलं. त्याच्या निरपराध रक्ताचे ओघळ अद्याप सुकले नाहीत; पण हाच तो माणूस आता येशू ख्रिस्ताचा उच्च स्वरांत जयघोष करत आहे. तोडण्यासाठी घाव घालणारे हात आता वंदन करण्यासाठी तो जोडत आहे. माणूस असाही आहे आणि तसाही आहे. नेमका कसा आहे, हे मात्र कळत नाही. त्याचं मन कितीही पिंजलं तरी उमजत नाही. तो कोणत्या

वेळी काय करेल याची कल्पना येत नाही. परेमश्वरालाही माणसाच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकता येणार नाही. कदाचित परमेश्वर म्हणेल, 'माणूस ही माझी सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे. माझ्या कुंचल्यातून आकाराला आलेलं हे सर्वांत सुंदर चित्र आहे; पण विकृतीनं आणि विसंगतीनं भरलेला माणूस ही माझी निकृष्ट निर्मिती आहे. माणसापासून माझं रक्षण कसं होईल, या चिंतेनं मी व्यथित झालो आहे.' प्रत्यक्ष देवालाच 'त्राहि भगवान' करून सोडणाऱ्या माणसाच्या पराक्रमाची गाथा माणूसच लिहू शकेल. कार्लाईलच्या मते, मानवात आणि पशूत फक्त ठेवणीत फरक आहे. इतर जनावरं वाकलेली असतात; पण हे एकच जनावर ताठ चालतं. पशूंच्या वर्तनाची तार्किक मीमांसा करता येते. मानवाला मात्र तर्काच्या चौकटीत बसविता येत नाही.

तरीही सृष्टिजीवनाच्या वेलीवर उमललेलं माणूस नावाचं एक रंगीबेरंगी, सुगंधी फूल आहे. काटे वगळून ते स्वीकारता येत नाही. त्याचा गंध आगळावेगळा आहे. संपूर्ण माणूस स्वार्थपरायण, दांभिक किंवा विश्वासघातकी आहे, हा समजही चुकीचा आहे. संस्कृतीच्या इतिहासाची पानं वाचताना मानवी प्रतिभेचा, पराक्रमाचा सुवास दरवळत राहतो. राम, कृष्ण, महावीर, बुद्ध, बसवेश्वर, ज्ञानेश्वर, तुकाराम यांसारखे श्रेष्ठतम धर्मपुरुष आणि मार्गदर्शक याच माणसांतून निर्माण झाले. माणुसकीला आकार आणि सौंदर्य त्यांनीच दिलं. सिंकदरासारखा जगज्जेता पंचविशीच्या आतच आपली शौर्यपताका जगभर नाचवू शकला. छत्रपती शिवाजी राजानं संतवाणीचं पाणी पिऊन, समशेरीच्या टोकानं स्वातंत्र्याचा, स्वाभिमानाचा इतिहास लिहिला. तत्त्ववेत्ते, समाजसुधारक शास्त्रज्ञ या माणसांनी दिलेल्या प्रकाशातच माणूस चढत आणि वाढत गेला. याच माणसानं आकाश भेदलं. पृथ्वी खोदली. चंद्र-मंगळावर चढाई केली; पण जग जिंकण्याच्या नादात माणसातला माणूस हरवत चालला की काय, अशी शंका येत राहते. माणसाच्या कडवटपणात गोडीही आहे आणि गोडीत कटुताही आहे. एक माणूस म्हणून मी त्याला विनंती करेन 'तू सर्व काही व्हावंस, सर्व जिंकावंस. जिंकण्याच्या अमर्याद इच्छेलाही तू जिंकावंस, तुझ्यातला माणूस मात्र कधी हरवू नये. माणूस हाच सृष्टीचा मध्यबिंदू राहावा.'

●●●

# स्त्री आणि संस्कृती

स्त्रीत्वाचा गौरव करणारी कितीतरी सुभाषितं आपल्या साहित्यात विखुरलेली आहेत. 'माउली' म्हणून तिचा सार्थ सन्मान होतो. 'जिथं स्त्रीला वंदनीय मानलं जातं, तिथं देवतांचा निवास असतो', 'स्त्री हे पावित्र्याचं आणि शुद्धतेचं आनंदरूप आहे.' अशा आशयाची अनेक वचनं जुन्या-नव्या साहित्यातून वाचायला मिळतात. एका कवीनं म्हटलं आहे, 'आई होण्याचं सद्भाग्य निसर्गानं स्त्रीच्या ललाटी लिहिलेलं असतं. परेमश्वराची मूर्ती आणि कीर्ती मला तिच्या ठायी दिसते.' असे सुंदर विचार वाचताना मन सुखावतं. आपल्या संस्कृतीनं स्त्रीला दैवत म्हटलं याचा अभिमान वाटतो. पण या काव्यमय भाषेत अतिशयोक्ती आहे, हे उघडच आहे. देवता म्हणून स्त्रीला संबोधण्यापेक्षा 'माणूस' म्हणून तिचा उल्लेख करणं यातच वास्तवता आहे. कारण माणसाचे सारे गुणदोष तिच्यातही आहेत. स्त्रीचं शब्दांतून दैवतीकरण करणं, हा एक फसवणुकीचा प्रकार वाटतो. तिला देवता समजणाऱ्या आपल्या देशात तिच्याकडं पाहण्याचा पुरुषी दृष्टिकोन उदार आणि सुसंस्कृत आहे, असं म्हणता येणार नाही. शतकानुशतकं अशास्त्रीय रूढींच्या विळख्यात सापडलेल्या स्त्रीकडं पुरुष ज्या दृष्टीनं पाहतो, तिचा उल्लेख 'असंस्कृत' याच विशेषणानं करावा लागेल. एका उच्चविद्याविभूषित स्त्रीनं स्त्रीच्या संदर्भातल्या पुरुषी दृष्टिकोनावर केलेली टीका जितकी कडक, तितकीच वास्तविक आहे.

ती म्हणाली, ''पुरुषांच्या दृष्टीतली विकारात्मकता अनेक क्षेत्रांतून वावरताना आम्हाला दिसते. स्वच्छ मनानं आणि आदरानं स्त्रीकडं बहुधा पाहिलं जात नाही. नाटक, चित्रपटांतून, दूरदर्शनवरील अनेक मालिकांतून आणि प्रत्येक जाहिरातीतून स्त्री-देहाचं बाजारी वृत्तीनं प्रदर्शन केलं जातं. चित्रपटांतली स्त्रीविषयक अनाचाराची दृश्यं अनावश्यक विस्तारानं आणि तपशिलानं दाखवली जातात. संपूर्ण चित्रपट जणू स्त्रीशरीराभोवती फिरत राहतो. प्रेक्षकांच्या विकारवासनांवर फुंकर घालून त्या जागृत करण्याचा त्यात मुख्य हेतू असतो. अशी दृश्यं पाहण्यासाठी प्रेक्षक गर्दी करतात. 'यशस्वी' ठरणाऱ्या प्रत्येक चित्रपटात स्त्रीशरीराचं भडक दर्शन घडवलं जातं. हे पाहताना प्रेक्षक वर्गातून असभ्य चित्कार ऐकू येतात. स्त्री प्रेक्षकांच्या मनावर या

बीभत्स देखाव्यांचे तीव्र ओरखडे उमटतात. त्या लज्जित होतात. अपमानाच्या जाणिवेनं दु:खित होतात. कलास्वातंत्र्याच्या नावाखाली हे अभिरुचीशून्य नाटक-सिनेमे चालू राहतात. सेन्सॉर बोर्डाचे सदस्य खाजगी संभाषणात याबद्दल नापसंती दर्शवतात; पण अशा (अ) कलाकृतींना उघडपणे मान्यतापत्र देतात. स्त्रीविषयी कुणीही विकृत विचारांचं स्वैर प्रदर्शन केलं तरी त्याचा उघड निषेध करण्यासाठी फारच थोडे लोक पुढं येतात. समाजाच्या अभिरुचीचं आणि संस्कृतीचं हे चित्र आहे.''

त्या विदुषीच्या बोलण्यात विषण्णता, संताप आणि चीड होती. तिचे शब्द समर्थनीय होते. स्त्रीकडं पाहण्याचा पुरुषवर्गाचा दृष्टिकोन अनेकवेळा अभिरुचीहीन आणि रोगट असतो, हे खरोखरच लज्जास्पद आहे. साराच समाज अशा विकृतीनं पोखरलेला आहे, असं त्या स्त्रीला मुळीच सुचवायचं नव्हतं. पण बहुसंख्य लोकांच्या अभिरुचीनं घेतलेलं विकृत वळण तिला अनर्थकारक वाटलं, हे सयुक्तिकच आहे. हे वळण आजचंच आहे असं नव्हे. पूर्वीच्या काळातही उनाड लोकांना चघळण्यासाठी स्त्री हाच विषय महत्त्वाचा वाटायचा. भवभूतीनं म्हटलं आहे, 'कोणत्याही स्त्रीच्या शीलावर शिंतोडे उडवणारे उद्गार काढणं, ही दुर्जनांची करमणूक असते.' सीतेच्या चारित्र्याविषयीही शंका घेणारे लोक प्रत्यक्ष 'रामराज्यात' होते. आई, बहीण, पत्नी आणि कन्या या नात्यांनी पुरुषजीवन सुखमय करणाऱ्या स्त्रीच्या पदरात समाज न्याय टाकीत नाही, हे चित्र खेदजनक आहे. गेल्या कित्येक शतकांत संस्कृतीची प्रगती अनेक अंगांनी होत गेली हे खरं असलं, तरी स्त्रीविषयक पुरुषी दृष्टिकोन अजूनही ढोबळ आणि बटबटीत राहिला आहे. अजून समाजात स्त्रीला 'माणूसपण' मिळालेलं नाही. लोकजीवनात वावरताना सुशिक्षित स्त्रीलादेखील भय आणि शंका वाटावी, याचा अर्थ वैचारिकदृष्ट्या समाज अजूनही मागासलेलाच आहे. स्त्रीच्या अनेक व्यथा आणि समस्या आहेत; पण तिच्याकडं पाहण्याच्या मूलभूत दृष्टिकोनात अजूनही सकारात्मक फरक पडलेला नाही. केवळ तिची शाब्दिक स्तुतिस्तोत्रं गाण्यात स्वारस्य नाही. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वविकासाला मिळणारं स्वतंत्र वातावरण आणि तिच्यासंबंधीची समाजाची निरोगी दृष्टी हीच सांस्कृतिक प्रगतीची खूण असते.

●●●

# गतकाळाचे ओझे

वृद्धाश्रमात राहायला आलेले एक गृहस्थ भावनावेगानं बोलत होते. म्हातारपणात माणसं अधिकच हळवी बनतात. आपल्या अगतिकतेची जाणीव त्यांना तीव्रतेनं व्हावी, हे स्वाभाविकच आहे. आयुष्यातले सुखाचे आणि प्रेमाचे दिवस संपून गेले, आता एका स्नेहशून्य जगात आपण आलो आहोत. जवळचे सर्व दुरावले. आपण एकटेच उरलो, ही दु:खद जाणीव त्यांना होत होती. ते म्हणाले, ''आजपर्यंतचे आयुष्य मी माझ्या बळावर समाधानानं जगलो. पाहता पाहता ते सुखी जीवन वितळून गेलं. इथं कुणाच्या तरी दयेचा आधार घेऊन राहायचं, ही कल्पनाच सहन होत नाही. भूतकालातले ते तारुण्याचे, अधिकाराचे आणि प्रेमाचे दिवस दृष्टीसमोरून हलत नाहीत. तो काळ असा होता, की हातात माती घेतली तरी त्याचं सोनं व्हायचं. आता सोन्याची माती झाली. गतायुष्यातल्या त्या सुंदर दिवसरात्रींची आठवण मी विसरू शकत नाही.'' त्या वृद्धाच्या स्वरात कंप होता. डोळ्यांत अश्रू होते. शब्दांत कारुण्य होतं. आपण सर्वस्व हरवून बसलो आहोत, अशी खंत त्याला वाटत होती. बहुसंख्य म्हाताऱ्यांची अशीच मानसिक अवस्था असते. हरवलेल्या कालखंडातल्या अनेक आठवणींचं ओझं मस्तकावर घेऊन ही माणसं जगण्याचा प्रयत्न करतात. वर्तमानकाळाशी त्यांना समरस होता येत नाही. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेता येत नाही. त्यामुळं पुन्हा पुन्हा भूतकाळाकडं पाहत आणि त्यातल्या सुख-दु:खांच्या आठवणी हृदयाशी घट्ट कवटाळून ते चालत राहतात. पायाखालचं काटेरी वास्तव त्यांना सहन होत नाही. हीच त्यांच्या जीवनाची शोकांतिका असते. यावर उपाय काय ? मानगुटीवर बसलेला भूतकाळ तटस्थपणानं विचार करून दूर कुठेतरी फेकून दिला पाहिजे. माणसाच्या दु:खाची काही मुळं गतकालीन आठवणींत रुजलेली असतात. ती उपटून टाकायला मानसिक धैर्य लागतं. गतकाळातल्या सोन्याची किंमत मोजत बसण्यापेक्षा वर्तमानकाळातल्या मातीचा गंध स्वीकारण्याची हिंमत ठेवली पाहिजे.

'आलिया भोगासी असावे सादर' या वचनातला हाच सारार्थ आहे. संगीताच्या अनेक मैफली आपल्या अवीट गायनानं वर्षानुवर्षं गाजवलेले एक विख्यात

गायक एका आजारात आपला आवाज गमावून बसले. सोबतीला म्हातारपणही आलं होतं. बदललेल्या काळाशी आणि परिस्थितीशी त्यांनी आपली मैत्री जुळवली. आपल्या जुन्या संपन्न भूतकाळाबद्दल त्यांना जरूर अभिमान वाटत होता; पण त्या काळाचं भावविवशतेनं ते तुणतुणं वाजवीत बसले नाहीत. कोणी त्यांच्या एखाद्या गाजलेल्या मैफलीची आठवण करून दिली तर ते मनोमनी सुखावत असत; पण वर्तमानाचं भान विसरून जुन्या आठवणींच्या पाकळ्यांना हाताळण्यात ते कधीच रंगले नाहीत. ते म्हणत, 'काळ धावत असतो. माणसाच्याही जीवनात अनेक बदल होत असतात. प्रत्येक बदलाला शांतपणानं सामोरं जावं, हे मी संतांच्या जीवनातून शिकलो. गेलेल्या सुखासाठी हळहळत बसणं, हा एक प्रकारचा दुबळेपणा आहे. आज मला गाता येत नाही. कसा तरी माझ्या समाधानासाठी गुणगुणतो. पूर्वीसारखी दाणेदार तान आता या म्हाताऱ्या थकल्या गळ्यातून बाहेर पडणार नाही; पण हे वास्तव मी स्वीकारलं आहे. अनेक तरुण गायकांच्या मैफलीत बसून त्यांचे तरुण सुंदर सूर मनात भरून घेतो. गायक म्हणून मी संपलो तरी जीवनातलं आणि जगातलं गाणं संपत नाही. ते ऐकून मला जगण्याचा उत्साह वाटू लागतो. माझ्याच दु:खाचं रडगाणं मी गात बसलो, तर मला कुणाचीच साथ मिळणार नाही.आहे त्या स्थितीत या जगाबरोबर दोन पावलं टाकण्याचा प्रयत्न करण्यातच आनंद आहे. आनंदाचा डोह आपल्या मनातच असतो. तो पाहण्यासाठी दृष्टी स्वच्छ ठेवली पाहिजे. आयुष्यातली जी अवस्था संपली, तिचीच भाबडी आठवण हळवेपणानं जपून ठेवण्यात रस नसतो. अस्ताला गेलेल्या काळाकडं नजर वळवण्यापेक्षा हातात आलेल्या क्षणांचं स्वागत करणं मला आवश्यक वाटतं. 'ते हि नो दिवसा गता:।' पण येत असलेल्या दिवसांतही काही सुवर्णकिरण असू शकतात. त्याचं स्वागत हसतमुखानं करावं.'

जगण्याचं एक आनंदी आशावादी गाणं जणू त्या गायकानं आपल्या शब्दांतून गायिलं होतं. वृद्धाश्रमात भेटलेल्या त्या अगतिक वृद्धापेक्षा हा म्हातारा गायक अधिक तरुण होता, हेच खरं ! जुने सूर विरून गेले; पण नव्या सुरांशी त्याचा संवाद होत राहिला.

●●●

# सुंदर म्हातारपण !

तारुण्याला जीवनातला वसंतऋतू असं संबोधलं जातं. माणसाच्या भावभावना, कल्पना, आशाआकांक्षा यांना तारुण्यात नवनवीन धुमारे फुटतात. कर्तृत्वाला बहर येतो. आपल्या ध्येयाचा पाठलाग करण्याची आणि त्यासाठी संघर्ष करण्याची रग तरुण वयातच विशेषत्वानं असते. जीवनातला रस शोषून घेण्याची उत्साही शक्ती तारुण्यातच अधिकांशानं असते. त्यामुळे तारुण्याचा अमोल असा नैसर्गिक ठेवा जन्मभर आपल्यापाशी असावा, असं माणसाला वाटणं स्वाभाविक आहे. पण कित्येक अविचारी तरुण हे धन निर्बुद्धपणानं उधळून टाकतात. तारुण्याच्या भरतीचा कालखंड केव्हातरी संपून जातो. ओहोटी सुरू होते. म्हातारपण कानात कुजबुजू लागतं. संत तुकोबांनी याचं वर्णन 'जरा कर्णमुळी सांगो आली' असं केलं आहे. वार्धक्याची चाहूल लागल्यावर मनुष्यानं आचारविचारांत, जीवनविषयक दृष्टिकोनात योग्य तो फरक केला पाहिजे, असं साधु-संतांचं सांगणं आहे.

तारुण्याइतकंच वार्धक्यही अटळ आहे. हातातलं यौवन निसटलं, की पुन्हा ते परत येत नाही आणि एकदा म्हातारपण आलं, की काही केल्या ते परत जात नाही; पण म्हणून वार्धक्य हे कुरूप आणि दयनीय असतं, असं समजण्याचं काही कारण नाही. एक विचारवंत म्हणतो, 'चिमणीच्या तारुण्यापेक्षा गरुडाचं वार्धक्य अधिक सुंदर असतं.' सॉक्रेटिसच्या मते, वृद्धावस्थेतही एक आगळं सौंदर्य असतं. बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य या प्रत्येक अवस्थेला एक विशिष्ट रुची आणि सौंदर्य आहे. निराशावादी म्हातारा स्वत:वर आणि इतरांवर चिडतो, कुरकुर करतो; पण रसिक म्हाताऱ्याला आपलं म्हातारपणही सुसह्य होतं. जीवनाचं हे अंग तो समजूतदारपणानं स्वीकारू शकतो. कानांना नीट ऐकायला येत नसतानाही कानात यंत्र बसवून एक म्हातारा गायनाच्या प्रत्येक मैफलीत बसलेला मी पाहिला आहे. तो म्हणाला, "दोन-चार चांगले सूर कानावर पडले, की जीवनालाही सूर सापडतो. भैरवीनं गाण्याचा शेवट होतो; पण भैरवी ही सदारंजनी रागिणी आहे. माझ्या अंत:करणाची तार ती ऐकताना छेडली जाते. प्रत्येक गाण्याला त्याचे सुंदर सूर आहेत. त्याप्रमाणे माझ्या म्हातारपणालाही ताल आणि सूर आहे." त्याचं हे जीवनभाष्य

मला मनापासून आवडतं. वृद्ध होणं म्हणजे वृद्धिंगत होणं. विकासाच्या उन्नत अवस्थेकडे जाणं. वृद्ध माणसानं जीवनाच्या दीर्घ वाटचालीत कितीतरी सुख-दु:खाचे सुरूप आणि कुरूप अनुभवांचे क्षण गोळा केलेले असतात, ते त्याला प्रगल्भ करतात.

ऐंशी वर्षांचे एक वृद्ध रसिक मला कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकातली काही सौंदर्यस्थळं समजावून सांगत होते. ते म्हणाले, ''दुष्यंत-शकुंतलेच्या उन्मादी प्रेमाचं सुंदर चित्रण कवीनं केलं आहे; पण विरहानंतरच्या त्यांच्या मीलनाला पुत्रवात्सल्य कारणीभूत होतं, हे त्यानं मार्मिकपणे दाखवलं आहे. वैषयिक प्रेमापेक्षा अपत्यवात्सल्य अधिक सुख देतं, हेच यातून कालिदासाला दाखवायचं आहे. तुम्हाला माझं म्हणणं आता पटणार नाही; पण एक दिवस ते पटेल. तारुण्यात वाचलेले कित्येक ग्रंथ आता वार्धक्याला मला जीवनाचा नवा अर्थ सांगतात. मी एक सुखी म्हातारा आहे. दोन-चार रोग मला मधून मधून छळतात; पण माझी खोडकर, निरागस नातवंडं माझ्या आयुष्याला बळकटी देतात. ही हसणारी, खेळणारी, भांडण करून रडणारी, चेष्टामस्करीत रमणारी बालकं पाहून माझी जीवनश्रद्धा वाढत जाते. मला मृत्यूची भीती वाटत नाही. जुन्या मित्रांची आठवण करतो. त्यांच्याबरोबर केलेले निरर्थक वादविवाद आठवतो. कधीतरी एक-दोघे भेटतात, तेव्हा खळखळून हसतो. डोळ्यांत पाणी येतं. दु:खांकडे निरपेक्ष दृष्टीनं पाहण्याचा वेगळा आनंद म्हतारपणातच मिळतो. सर्वांनाच हे मिळेल, असं नाही; पण प्रयत्नानं ते मिळवता येईल. शरीर सुरकुतलं हे खरं; पण मनाला सुरकुत्या पडू दिल्या नाहीत. काही म्हणा, म्हातारपणही सुंदर असतं !!''

बालपण रम्य असतं. तारुण्याला उन्मादक सौंदर्य आहे. पण वार्धक्याला त्याचं असं आगळं वेगळं सुंदरपण असतंच. अनुभवाच्या पक्वतेतून विचारांना आलेली स्थिरता आणि वृत्तीतला समंजसपणा ही वार्धक्याची सुंदर लक्षणं आहेत. सॉक्रेटिसानं 'Age has its beauty' असं म्हटलं आहे. पण हे सांगायला त्याच्यासारखा तत्त्ववेत्ता कशाला पाहिजे ? प्रत्येक म्हाताऱ्याला ते कळतच असतं.

●●●

# माणूस घडवणारे शिक्षण

'माणूस घडवणारे शिक्षण' असा शब्दप्रयोग स्वामी विवेकानंदांनी केला होता. शिक्षणातून मनुष्यत्व उज्ज्वल व्हावं किंवा होतं, असा विश्वास या शब्दांतून व्यक्त होतो. पण शिक्षणातून माणसाचा विकास-बुद्धीचा, भावनांचा आणि जीवनदृष्टीचा खरोखरच होतो का, असा प्रश्न गंभीरपणानं विचारता येईल. एक पालक म्हणाले, 'माणूस घडवणारं शिक्षण कुठं मिळतं याच्या शोधात मी आहे. आजचं शिक्षण माकड घडवणारं आहे. या शिक्षणातून धूर्त कोल्हे आणि लांडगे निर्माण होत आहेत. शिक्षणातून माणुसकीला आकार मिळतो, असं मानणं हे आजच्या जगात जुनाटपणाचं लक्षण आहे.' ही जळजळीत टीका अतिशयोक्तीपूर्ण नाही. अनेक प्रकारचे पाशवी गुन्हे करणारे पदवीधर सुशिक्षित पाहिले म्हणजे या टीकेतला सत्यांश स्वीकारावा लागतो. ज्ञानाची प्रगती होऊनही हृदय आकुंचित राहू लागलं तर आपल्या शिक्षण व्यवस्थेत काही तरी भयानक विकृती शिरली आहे. असं म्हणावं काय ? एक पोट भरण्याची विद्या यापलीकडं बहुसंख्य लोक शिक्षणाच्या संदर्भात दुसरा विचार करू शकत नाहीत. शिक्षणाचं केंद्र चालवणारे अधिपती विद्यासंपन्न असतात; पण सत्ता आणि संपत्ती जोडण्याचं एक माध्यम याच दृष्टीनं ते विद्या केंद्राकडं पाहतात, हा अनेक ठिकाणी उद्वेगजनक अनुभव येतो. साध्या चपराशापासून प्राचार्यांपर्यंतची नोकरी मिळवण्यासाठी लाखो रुपये जर मोजावे लागत असतील, तर विद्याविक्रीची ही बाजारपेठ बनली आहे. या बाजारात विद्येपेक्षा पैशाला आणि अन्य घटकांना महत्त्व आहे, अशी टीका चुकीची ठरणार नाही.

विद्यापीठाच्या सर्व परीक्षांत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या एका उमेदवाराची शिक्षक म्हणून निवड करण्यात आली. त्याला संस्थेचे वरिष्ठ अधिकारी समजावून सांगत होते. 'समाजसेवेचं कार्य म्हणून आम्ही हे विद्यालय चालवतो. पण सेवेच्या भावनेनं तुम्हीही या संस्थेला त्यागपूर्वक देणगी द्यावी. प्रत्येकाच्या त्यागातूनच या संस्थेची उभारणी झाली आहे. आमचा हेडक्लार्क तुम्हाला सर्वकाही समजावून सांगेल. ध्येयवाद आणि व्यवहार यांची सांगड घालावी लागते, हे तुमच्यासारख्या हुशार पदवीधारकाला सांगण्याचं कारण नाही.' वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या टेबलावर

गांधीजींचा फोटो होता. भिंतीवर फुले-आंबेडकरांची छायाचित्रं होती. ठळक अक्षरात एका फलकावर सुभाषित लिहिलं होतं, 'विद्या हीच संपत्ती आहे.' ते वरिष्ठ अधिकारी सेवाबुद्धीनं दर सहा महिन्यांनी परदेशात जाऊन येत असत. तेथील शिक्षणव्यवस्थेचं निरीक्षण करण्याचा आणि आपल्या शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्याचा त्यांचा पवित्र हेतू असतो. माणूस घडवणारं शिक्षण आमच्या विद्यापीठांतून आणि शिक्षण व्यवस्थेतून मिळत नाही, ही त्या पालकाची टीका एका वास्तव निराशेतून उद्‌भवलेली आहे. शैक्षणिक क्षेत्रात आपली सारी जीवनशक्ती पणाला लावणारे काही महात्मे या देशात होऊन गेले. समाज शिक्षित व्हावा म्हणून आजन्म वैयक्तिक सुखापासून अलिप्त राहिलेल्या ध्येयवाद्यांच्या या देशात आता शिक्षण वाढलं, पण माणुसकी आटत चालली. शिक्षणाला गती आली आणि संस्कृती अगतिक झाली. शब्दपांडित्याला भरती आली; कृती मात्र दुर्मिळ झाली. स्वार्थी विचारांनी मेंदू भरकटत गेला. हृदय उपाशी राहिलं. कदाचित कोणाला हे वर्णन निराशावादी आणि अत्युक्तीपूर्ण वाटेल.

आजच्या शिक्षणानं आम्हाला निष्णात डॉक्टर दिले, कुशल इंजिनिअर मिळाले, कारखानदार आणि उद्योगपती, प्रशासक मिळाले; पण माणुसकीची जाण ठेवणारी माणसं या शिक्षणातून किती मिळाली, हा एक संशोधनाचा विषय ठरावा. स्वार्थ, सत्ता आणि संपत्ती यांच्या वादळवाऱ्यात विद्या आणि संस्कृती मात्र पाचोळ्यासारखी उडून जात आहे, याचं भान आम्ही हरवून बसलो आहोत. इतकी जाणीव झाली तरी शिक्षणाला आणि माणुसकीला भवितव्य आहे असं म्हणता येईल. पदव्या वाढल्या; पात्रता कमी झाली. ही विचारवंतांची तक्रार सर्वांनीच विचारात घेतली पाहिजे. निरक्षर असलेला संत कबीर म्हणाला होता, 'पोथ्या पुराणांचं आणि ग्रंथांचं चर्वितचर्वण करून पांडित्य प्राप्त होत नाही. 'प्रेम' या अक्षरांचं ज्ञान नसेल तर तो खरा निरक्षर समजावा.' शिक्षणाच्या कारखान्यांतून निरक्षर सुशिक्षितांचं प्रॉडक्शन वाढत चाललं आहे, ही टीका केवळ नकारात्मक नाही. सुशिक्षितांच्या अज्ञानापेक्षा अशिक्षितांचं ज्ञान अधिक स्वीकार्य वाटावं अशी परिस्थिती आहे. जो माणुसकी जपतो त्यालाच 'ज्ञानी' म्हणणं सयुक्तिक आहे.

●●●

# स्वैराचार आणि संयम

जीवनातल्या सुखांचा रसिकतेनं, पण संयमानं आस्वाद घेतला पाहिजे. इंद्रियांचं अतिरेकी दमन करणं अनैसर्गिकपणाचं आहे. पण त्याबरोबरच इंद्रियरूपी घोड्यांचे लगाम आपल्या हातात बळकट असले म्हणजे हे घोडे चौखूर उधळत नाहीत. पण आजच्या भोगवादी जगात संयम, विवेक, तारतम्य हे शब्दसुद्धा वासनेच्या लाटेबरोबर वाहून गेले आहेत की काय, अशी शंका येते. ज्या भोगाला मनोनिग्रहाचा बांध नाही, ते स्वैर सुटलेले भोग माणसाला विनाशाकडं खेचून नेतात.

परवा एका डॉक्टरांनी मला एक धक्कादायक सत्य सांगितलं. त्यांच्याकडं येणाऱ्या तरुण रुग्णांपैकी साठ टक्के तरुण एड्सच्या भयानक रोगानं पछाडलेले असतात. ऐन विशी तिशीतच सारं जीवन विषमय करून टाकणारा हा दुर्धर रोग त्यांना अविचारी संसर्गानं जडलेला असतो. जीवनासंबंधीची त्यांची सारी स्वप्नं, साऱ्या आशाआकांक्षा विकारांच्या स्वाधीन होण्याच्या आंधळ्या कृतीमुळं चुरगळून गेलेल्या असतात. आपल्या व्याधीचं दु:ख सांगताना एक तरुण म्हणाला, 'माझ्यासारख्या सुशिक्षिताला विकारांवर नियंत्रण ठेवता आलं नाही, ही शरमेची गोष्ट आहे. मला जडलेल्या या रोगामुळं मृत्यूचा क्षण जवळ येत आहे. त्याच्या अंधारात मी पार बुडून जाणार, हे मला स्पष्ट दिसत आहे. नैतिक आणि धार्मिक संस्कारांची व विचारांची तारुण्याच्या मस्तीत मी अनेक वेळा कुचेष्टा केली. भोगभावनेतल्या उन्मादाचं कौतुक करीत राहिलो. आता या अनिर्बंध भोगांनी माझ्या आयुष्यातल्या सुखांना आग लावली आहे. उशिरानं झालेला पश्चात्ताप जीवनाचा आनंद पुन्हा मिळवून देत नाही. आत्मघातकी विकारांवर नियंत्रण ठेवल्याशिवाय खरं सुख मिळणं शक्य नाही, हे माझे शब्द भोगलंपट तरुणांना तुम्ही जरूर सांगा. जगाला देण्यासाठी आता माझ्याजवळ एवढेच दोन शब्द उरले आहेत.'

त्याच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. मुद्रेवरची जीवनकळा संपली होती. चेहरा काळवंडला होता. त्याचा प्रवास संपत आला होता. एक तारुण्य अकालीच करपून गेलं होतं. सुकलेल्या फुलावर अश्रूबिंदू पडले म्हणून ते पुन्हा उमलू शकत नाही. या तरुणाप्रमाणंच आमच्या देशातले अनेक तरुण आणि तरुणी सर्वनाशाच्या

वाटेनं चालत राहावेत, ही त्यांची आणि देशाची एक शोकांतिका आहे. वासनाविकारांचे काही रोगट क्षण संयमाने कसे जिंकावेत, याचे संस्कार त्यांना मिळत नाहीत. ज्यांना मिळतात, तेही मोहाच्या प्रभावानं प्रवाहपतित होतात. मन आणि बुद्धी संस्कारित करणाऱ्या सामाजिक व धार्मिक शक्ती अलीकडे क्षीण होत चालल्या आहेत. तरुणांसमोरचे आदर्श आज कोणते आहेत, हे सांगण्याचंही कारणं नाही. दारूचे प्याले ढोशीत राहिलेला चित्रपटातला नायक त्यांना प्रशंसनीय आणि अनुकरणीय वाटत असेल, तर कोणत्या तरी शक्तीनं या वाट चुकलेल्या कोकरांना झडझडून सांगितलं पाहिजे, 'जीवनातल्या आनंदाला निरोगी मनानं सामोरे जा. आनंदाचा मनमुराद आस्वाद घ्या; पण त्याला विवेकबुद्धीचं अधिष्ठान असू द्या. धर्म आणि नीतीचं अवडंबर माजवण्याचं कारण नाही. पण त्यांच्यातली जीवनपोषकता लक्षात घ्या. कलंकित रोगट जीवनाचा शाप माथ्यावर घेऊ नका.' हे शब्द एखाद्या संतानं सांगितलेले असोत किंवा एखाद्या अध:पतित व्यक्तीच्या तोंडचे असोत, त्या शब्दातलं सत्य ग्रहण केलं पाहिजे.

क्युप्रिनच्या 'यामा' या वेश्याजीवनविषयक कादंबरीतला एक भावपूर्ण प्रसंग. सोळा-सतरा वर्षांचा एक कोवळा तरुण वेश्यावस्तीतल्या एका घरात प्रवेश करतो. आयुष्यात प्रथमच त्याचं पाऊल वाकडं पडत होतं. विकृत कुतूहलानं आणि मोहानं तो तिथं आला होता. त्याच्या मुद्रेवरची कोवळीक आणि टवटवी पाहून वेश्येच्या मनातलं वात्सल्य जागं झालं. तिनं त्याच्या मस्तकावरून आपुलकीनं हात फिरवीत म्हटलं, 'माझ्या भावा, इकडं या नरकात कशाला आलास ? इथल्या आगीत तुझं आयुष्य काळवंडून जाईल. चुकूनसुद्धा वाकड्या वाटेनं चालू नकोस. मला भाऊ असता तर तो तुझ्यासारखाच दिसला असता. जा माझ्या भावा, पुन्हा कधी या नरकात पाऊल टाकू नकोस. सुखासमाधानानं जग.' तिचे डोळे पाणावले होते. एका कोवळ्या नवतरुणाच्या आयुष्याचा चोळामोळा होऊ नये, या भावनेनं ती बोलत होती. पतित समजल्या जाणाऱ्या त्या स्त्रीच्या अंत:करणात माणुसकीचं, वत्सलतेचं एक तुळशीवृंदावन होतं. तुळशीच्या सुगंधानं दरवळलेल्या शब्दांनी तरुणाची धुंदी उतरली आणि तो सरळ वाटेनं चालू लागला.

●●●

# हरवलेली वाट

माणसाचा सर्वांत मोठा शत्रू कोण ? या प्रश्नाचं उत्तर अनेक पद्धतींनी देता येईल. पण त्याचं एकच उत्तर संभवतं. माणूसच माणसाचा कट्टर शत्रू असतो. बाकीची उत्तरं फारशी महत्त्वाची वाटत नाहीत. मनुष्य हाच श्रेष्ठ सृजनात्मा आहे, असं म्हटलं जातं कारण त्यानंच शतकानुशतकं खपून संस्कृतीची भव्य इमारत उभी केली. ललितकलांची निर्मिती केली. पत्थरातून सुंदर मूर्ती खोदल्या. शब्दांतून साहित्याची रचना केली. सुरातून संगीताला आकार दिला. याच माणसानं आपल्या कल्पनेतून परमेश्वराला जन्म दिला. म्हणूनच संतांनी प्रत्येक जीवमात्रात सामावलेलं ईश्वरत्व जाणून त्याच्या महतीची स्तुतिस्तोत्रं गायिली. देव कुठं आहे, तर तो प्रत्येकाच्या मनाच्या देव्हाऱ्यात अधिष्ठित आहे. प्रत्येकाचं मन हे परमेश्वराचं मंदिर आहे, असंही त्यांनी प्रतिपादन केलं. माणूस ही विलक्षण निर्मितिशील शक्ती आहे, याचा अनुभव माणसाला येऊ लागला. पण माणसाच्या मनातलं ते पवित्र मंदिर आज सर्व बाजूंनी जळत असल्याचं भयानक चित्र दिसत आहे. ते पेटवण्याचं कार्य माणसानंच केलेलं आहे. आपण उभारलेल्या सुंदर संस्कृतीचा विध्वंस करण्याचं आत्मघातकी कृत्य माणसासारखाच बुद्धिमान प्राणी करू शकातो. ज्या सौंदर्याचं जिवापाड परिश्रमानं जतन करायचं, ते सौंदर्याचं नंदनवन क्षणार्धात जाळून भस्मसात करण्याचं सामर्थ्यही केवळ माणसाच्याच बुद्धीत असू शकतं. एक माणूस दुसऱ्या माणसाच्या नरडीचा घोट घेण्यात धन्यता मानत असल्याचं दृश्य सर्वत्र दिसू लागावं, याचा अर्थ माणूस हाच माणसाचा सर्वप्रथम शत्रू आहे. परमेश्वराची निर्मिती करू शकणाऱ्या मानवाला माणूस कसं व्हायचं, हे अद्याप समजलेलं नाही. माणुसकीची वाट आता हरवलेली दिसते.

रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वीस-पंचवीस झोपड्या आगीत जळत होत्या. झोपडीतल्या माणसांचं हृदयभेदी आक्रंदन चालू होतं. हातात धारदार सुरे आणि पिस्तुलं घेऊन उभी असलेली माणसं हे दृश्य पाहून खदखदा हसत होती. धगधगणाऱ्या ज्वालांत कोवळी मुलं जळत होती. स्त्रिया आणि म्हातारी माणसं तडफडत होती. हा देखावा सुरक्षित अंतरावरून पाहणाऱ्या काही माणसांच्या हातात

रॉकेलचे डबे होते. आग भडकवण्यासाठी त्यांचा उपयोग होता. थोड्या वेळातच झोपड्यांनी आणि त्यातल्या रहिवाशांची राखरांगोळी झाली. आक्रंदन संपलं. पेटलेले जीव मरणाच्या स्पर्शानं शांत झाले. झोपड्या जाळणाऱ्या आक्रमकांनी आनंदाच्या आरोळ्या ठोकल्या. धर्माचा जयजयकार केला. विजयाच्या घोषणा देत ते लोक ट्रकमधून आणि जीपमधून निघून गेले. एक पवित्र धार्मिक कार्य त्यांच्या हातून घडलेलं होतं. ते सात्त्विक समाधान त्यांना सुखवीत होतं. माणसं जगली नाहीत तरी चालेल; पण धर्म मात्र जगला पाहिजे. माणूस हा एक क्षुद्र नगण्य जंतू असतो. त्याला धर्माच्या नावानं चाललेल्या हवनात बळी दिल्याशिवाय धर्म जगणार नाही, हा विश्वास त्यांना वाटत होता. तेच दृश्य आजच्या जगात अनेक ठिकाणी दिसत आहे.

बाँबहल्ले झाले की क्षणार्धात गाव उद्‌ध्वस्त होतं. दिवा लावायलाही माणूस उरत नाही. सत्ता हा राजकारणाचा विषय होता. आता देव आणि धर्म, जात आणि पंथ, भाषा आणि चालीरीती हेही बीभत्स राजकारणाची अंगोपांगं करण्याचं बुद्धिचातुर्य माणसानं दाखवलं आहे. माणूस कसा जगवावा हा एकेकाळी चिंतेचा विषय होता. आता माणूस कसा मारावा, त्याचं अस्तित्व कसं नष्टभ्रष्ट करावं यावर माणसाचं संशोधन चालू आहे. उजाडलेला दिवस हिंसा, रक्तपात, जाळपोळ, अत्याचार यांच्या अनेक वार्ता घेऊनच उगवतो. माणुसकी आणि माणूस यांना पूर्णविराम देण्याचं महाकार्य या एकविसाव्या शतकात उत्साहानं चालू आहे. जातीपातींच्या क्षुद्र कारणांवरून पेटलेल्या दंग्यात कुणातरी माणसानं दुसऱ्या माणसाला भोसकलं होतं. क्षीण स्वरात तो जखमी माणूस सांगत होता, 'डॉक्टर, मला जगवा. माझ्या दोन लहान मुलांसाठी मला जगायचं आहे. डॉक्टर मला मरू देऊ नका.' डॉक्टरांचे डोळे पाणावले होते. जीवनाची आणि माणुसकीची वाट प्रचंड हिंसेच्या धुक्यात हरवून गेली आहे, हे त्यांना जाणवत होतं.

माणूसच माणसाचा सर्वांत दुष्ट शत्रू आहे. तो सृजनात्मा केव्हातरी होता. आता तो संहारात्मा झाला आहे. क्षीण झालेली माणुसकीची ज्योत या रुद्र वादळात टिकाव धरू शकेल का ? बुद्धिमान माणूसच या प्रश्नाचं उत्तर देऊ शकेल.

●●●

# तो येक पढतमूर्ख !

संतांच्या साहित्यानं मराठी भाषा आणि संस्कृती समृद्ध केली, यात काहीच संदेह नाही. महाराष्ट्राच्या मन:पिंडावर संतकाव्यानं अमिट संस्कार केले आहेत. इतके, की दैनंदिन मराठी भाषेत संतांची अनेक वचनं विखुरलेली आहेत. परवा संत साहित्याविषयीच्या आपल्या व्याख्यानात एका तथाकथित विद्वानानं या साहित्यावर बरेच ताशेरे ओढले. तो म्हणाला, 'या जुनाट झालेल्या साहित्याचं किती दिवस आपण तुणतुणं वाजवणार आहोत ? जीवनाविषयी संतांचं आकलन फारच मर्यादित होतं. त्यांनी केवळ वैराग्य आणि निवृत्ती यांचीच ललकारी दिली. मी हे वाङ्मय फारसं वाचलं नाही. पण आता काळ आणि समाज फार पुढं गेला आहे. संतांच्या वाङ्मयात देवाची भक्ती आहे. आता आम्हाला माणसांची भक्ती करणारं साहित्य पाहिजे आहे. आजच्या नव्या जगात नवे विचार देणारं साहित्य आवश्यक आहे.'

त्या टीकाकारनं आपण संतकाव्य फारसं वाचलं नाही, असं स्वत:च सांगितलं होतं. मग संतांच्या वाङ्मयाविषयी बोलण्याचा त्याला काय अधिकार होता ? जिथं देवदूत प्रवेश करायला भितात तिथं मूर्ख बिनदिक्कत घुसतात, अशा आशयाचं एक इंग्रजी सुभाषित आहे. अभ्यास असो, की नसो; आपल्या नसलेल्या विद्वत्तेचं प्रदर्शन करण्याची कित्येकांना सवय असते. सभेतल्या एका श्रोत्यानं त्या वक्त्याला संतकाव्याबद्दल एक मार्मिक प्रश्न विचारला, तेव्हा हा टीकाकार गडबडून गेला. 'सध्या या प्रश्नाचं उत्तर मी वेळेच्या अभावी देऊ शकत नाही. सवडीनं घरी या. त्यावेळी चर्चा करू,' असं गुळमुळीत बोलून त्यानं वेळ मारून नेली. पण एखाद्या विषयाचा अभ्यास नसताना त्यावर स्वैर शेरेबाजी करण्याची उर्मट सवय काही जणांना लागलेली असते. संत रामदासांनी अशा महाभागांची गणना 'पढतमूर्खात' केली आहे. ते म्हणतात, 'समूळ ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण। गुण सांगता पाहे अवगुण। तो येक पढतमूर्ख।' एखाद्या ग्रंथाविषयी केवळ ऐकीव माहितीवरून टीका टिप्पणी करणारे टीकाकार असतात. कित्येकांना ग्रंथ वाचूनही त्याचं योग्य त्या संदर्भात आकलन करून घेण्याची पात्रता नसते. काही लोक पूर्वग्रह मनात ठेवून ग्रंथासंबंधी आपली मतं बनवतात. स्वच्छ दृष्टीनं आणि मनात कोणताही विकल्प न

ठेवता ग्रंथातल्या प्रतिपाद्य विषयाशी समरस होण्यासाठी जी रसवृत्ती लागते तीच अनेकांपाशी नसते. संतांची कविता समजून घेताना त्यांच्या काळाचं आणि परिस्थितीचंही समुचित भान ठेवलं पाहिजे. श्रेष्ठ साहित्य शतकं उलटली, तरी जुनं होत नाही. कारण त्यातील विचारदृष्टी दीर्घकाळ तरुण राहू शकते. त्यातलं सारंच सामर्थ्य काळाच्या ओघाबरोबर वाहून जातं, असा अपसमज करून घेण्याचं कारण नाही. काही साहित्यकृती नित्यनूतन आणि चिरतरुण असतात. ज्ञानोबा - तुकोबांचं काव्य जुनाट झालं असा आक्षेप घेणाऱ्या लोकांच्या बौद्धिक आरोग्याची तपासणी करावी लागेल. संतसाहित्याकडं भाबडेपणानं पाहू नये, हे खरं. पण त्याच्याकडं ते न वाचताच अवहेलनेच्या दृष्टीनही पाहू नये. काही निकषांवर ते जरूर तपासून घ्यावं. अन्यथा समर्थ रामदासांनी योजलेल्या विशेषणाचा धनी व्हावं लागेल. साहित्याच्या क्षेत्रात अभ्यासाशिवाय उथळ मतप्रदर्शन करणारे जसे टीकाकार आहेत, तसेच ते अन्य क्षेत्रांतही असतात. राजकारणाच्या क्षेत्रात तर अशा टीकाकारांचा सुळसुळाट झालेला दिसतो. कोणीही उठावं आणि त्यानं धर्म, शिक्षण, समाज आणि राजकारण यांच्या संदर्भात सैराटपणानं शेरे मारावेत, ही परिस्थिती चिंताजनक आहे. एस.एस.सी. च्या वर्गात पाच-सहा वर्षे बसण्याचा अनुभव घेतलेले एक 'अनुभविक शिक्षणतज्ज्ञ' म्हणाले, 'हल्लीच्या शिक्षण पद्धतीत काही अर्थ उरला नाही. सगळ्या शाळा आणि कॉलेजं बंद करावीत. शिक्षणामुळंच देशातली तरुणपिढी कुचकामी बनली आहे.' या प्रकारची मतं व्यक्त करून आपण आपल्या अज्ञानाचं दर्शन घडवीत आहोत, हेच अनेकांच्या ध्यानी येत नाही. अभ्यासकांचे विचार ऐकावेत आणि त्यावर आपण चिंतन करावं, त्याचा अभ्यास करावा, ही वास्तव भूमिका घेण्याऐवजी आपल्या अर्ध्याकच्च्या बहुतांशी ऐकीव अशा मतांची जाहिरात करण्याकडं यांचा कल असतो. काहीतरी सनसनाटी बोलून प्रसिद्धी मिळवण्याकडंही कित्येकांच लक्ष असतं. विचार तपासून घेण्याऐवजी त्यांचा बेजबाबदारपणानं उच्चार आणि प्रचार करणं हा सामाजिक दृष्ट्या एक अपराध आहे. पण हे लक्षात कोण घेतो ? पढतमूर्खांच्या गर्दीत शहाण्यांचा शोध करणं अवघड झालं आहे. 'मुलाम्याचे नाणे। तुका म्हणे नव्हे सोने।' ज्ञानाच्या व्यवहारात असली - नकली नाणी अलीकडे पुष्कळ आढळतात.

●●●

# आपलं घर

परवा एका वृद्धाश्रमात समारंभाच्या निमित्ताने जाण्याचा योग आला. अनेक म्हातारे स्त्री-पुरुष भेटले. कित्येकांच्या मुद्रेवर अगतिकतेचा भाव होता. पंचाहत्तरी ओलांडलेल्या एका वृद्धाला मी विचारले, ''आपली इथं काही गैरसोय होत नाही ना? अन्न, औषध वगैरे वेळच्या वेळी मिळतात ना ?'' तो वृद्ध हसला. त्याच्या हसण्यात एक प्रकारची आर्त खिन्नता होती, क्षीण डोळ्यांत कारुण्य होतं तो म्हणाला, ''इथं सर्वकाही ठीक आहे. गाणी ऐकायला मिळतात. पुस्तकं वाचतो. करमणुकीसाठी टीव्ही आहे. अडचण कसलीच नाही; पण नातवंडांचं हसणंखिदळणं कानावर येत नाही. 'आजोबा' अशी त्यांनी घातलेली साद ऐकू येत नाही. माझ्या घरापासून मी तोडला गेलो. इथल्या मातीत माझी मुळं कशी रुजणार ? माझा मुलगा इंजिनिअर आहे. मी त्याला माझ्या हातांनी खेळवलं, वाढवलं, त्याला शिकवलं. त्याच्या शिक्षणासाठी झिजलो. त्याची इथं कधीच भेट होत नाही. इथं समवयस्क लोक आहेत; त्यांच्यात रमण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येकाची कथा आणि व्यथा जवळजवळ सारखीच आहे. माझं म्हातारपण हाच माझा अपराध असेल, तर हे दीर्घायुष्य मला नको. दीर्घ जीवनाचा शाप माझ्या कपाळावर दैवानं का कोरला असेल ?'' त्याचा स्वर थरथरत होता. गळ्यापाशी हुंदका दाटला असावा. कृत्रिम उत्साहानं हसून तो बोलू लागला, ''हे रडगाणं मनावर घेऊ नका. इथं फार छान वेळ जातो. इथले व्यवस्थापकही चांगले आहेत. तुमच्या भेटीमुळे आनंद झाला.''

मुद्रेवरची अशरणतेची भावना त्या वृद्धाला लपविता आली नाही. त्याचा प्रयत्न फसला. वृद्धाश्रमात कितीही सुविधा असल्या तरी त्याला घरपण कसं येणार? आपल्या घरास एक प्रेमळ व्यक्तिमत्त्व असतं. घरातल्या हवेला घरगुतीपणाचा वास असतो. जिथं आपुलकीचे शब्द आहेत, जिथं बालकांच्या हसण्या-रडण्याचा आवाज ऐकू येतो, जिथं गृहिणीच्या कंकणांचा किणकिणाट कानावर पडतो, जिथं संध्याकाळी देवापुढे नंदादीप लावला जातो आणि ज्ञानेश्वरीतील ओवी किंवा तुकोबाचा अभंग कापऱ्या आवाजात गुणगुणला जातो, ते आपलं 'घर' असतं. ते कसंही असलं तरी आपल्याला वात्सल्यानं जवळ घेतं.

वृद्धाश्रमात हे वातावरण मिळेल का ? पण आजची परिस्थितीच अशी आहे, की वृद्धाश्रम ही काळाची गरज होऊन बसली आहे. कुटुंबसंस्थेला तडे जात आहेत. प्रेमापेक्षा व्यवहारबुद्धीला महत्व येत आहे. आटोपशीर संसारात म्हाताऱ्यांचा हस्तक्षेप तरुणांना जाचक होतो. दोन पिढ्यांमधील अंतर वाढत चाललं. राहणीच्या कल्पना बदलल्या. या स्थित्यंतराशी जुळवून घेणं जुन्या पिढीला जमत नाही. असं नव्या पिढीला वाटतं. माणूस म्हातारा झाला, की त्याला उचलायचं आणि वृद्धाश्रमात दाखल करायचं, ही व्यवस्था बाह्यत: ठीक वाटली तरी म्हातारी माणसं अशा वसतिगृहात मनानं खचून जातात. आपण आता नगण्य, निरुपयोगी आहोत, आपल्या पोरांच्या दयाबुद्धीवर अवलंबून राहायचं आहे, ही विदारक जाणीव त्यांना सारखी दंश करीत राहते. आपल्या म्हातारपणाचा, जीवनाचा त्यांना तिरस्कार वाटू लागतो. स्वत:चीच घृणा करणारा माणूस समाधान मिळवू शकत नाही.

वृद्धांचा प्रश्न ही कौटुंबिक आणि सामाजिक समस्या असली तरी ती प्रेमभावनेच्या पातळीवरूनच सोडवावी लागेल. कोणी 'सुपुत्र' जर असे म्हणाला, 'मी महिन्याकाठी हजार-दीड हजार रुपये माझ्या वडिलांसाठी आश्रमाला पाठवतो, कपडेलत्ते देतो, केव्हातरी सणासुदीला भेटून जातो; माझं कर्तव्य मी करतो. हा प्रश्न उगाच भावनेचा करू नये. प्रत्येकालाच स्वतंत्रपणे आणि समाधानानं जगता आलं पाहिजे; एकमेकांत गुंतून राहण्यात शहाणपणा नाही. वृद्धाश्रम ही चांगली सोय आहे. घरापेक्षाही अधिक मोकळेपणा तिथे मिळू शकतो.'

या विचारात तर्कशुद्धता असेल; पण असली भावशून्य तार्किकता माणसाच्या मनाचं समाधान करू शकत नाही. जगण्याला कुणाचातरी प्रेमळ आधार आवश्यक असतो. 'म्हातारपणात केवळ परमार्थावर लक्ष केंद्रित करावं, प्रेमाचे सारे बंध तोडून टाकावेत,' हा उपदेश ऐकायला बरा असेल, पण सर्वसामान्य माणसाला आपल्या मुलाबाळांचं प्रेम अखेरपर्यंत हवं असतं. वृद्धाश्रमात तो एकटा पडतो. ही जाणीव त्याला जीवघेणी वाटते. एका स्नेहशून्य परक्या जगात त्याला जगता येत नाही. त्याच्या मनातलं 'आपलं घर' कधीच पुसलं जात नाही.

●●●

# तुका म्हणे ऐशा नरा...

संरक्षण खात्यातील एका बड्या अधिकाऱ्याला शत्रुराष्ट्राला गुप्त कागदपत्रं आणि माहिती पुरविल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आल्याची वार्ता नुकतीच वाचनात आली. कुणाचंही मन या वार्तेमुळे अस्वस्थ आणि संतप्त होईल यात शंका नाही. हे देशद्रोही कृत्य त्या अधिकाऱ्यानं का केलं असावं ? ते कृत्य करताना आपण आपल्या मातृभूमीशी घृणास्पद दगलबाजी करीत आहोत, असं वाटून त्याचा हात थरथरला नसेल काय ? संपत्तीच्या मोहानं त्यानं आपलं इमान स्वार्थाच्या बाजारात विकून टाकलं, असाच अर्थ यातून निघतो. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आणि स्वाभिमानासाठी बेदरकारपणे मृत्यूच्या जबड्यात शिरणारे अनेक देशभक्त आपल्या इतिहासाच्या कीर्तीत भर टाकून गेले.

आता हा कोणी उच्चपदस्थ अधिकारी काही लाख रुपयांसाठी आपल्या देशाची राख करायला सहज तयार होतो, यापेक्षा अधिक विडंबक चित्र कोणतं असू शकेल ? 'बुभुक्षित: किं न करोति पापम्।' असं एक वचन आहे. पोटातली भुकेची आग माणसाला कोणतंही पापकृत्य करायला प्रवृत्त करते; पण हा गुन्हेगार तर भरल्यापोटी आपल्या देशहिताचा बळी देत होता. अधिकाऱ्याच्या जीवनविषयक दृष्टिकोनात याचं उत्तर सापडू शकेल. शील, चारित्र्य, राष्ट्रभक्ती आणि सत्य या मूल्यांच्या श्रेष्ठतेपेक्षा त्याला द्रव्याची महती अधिक वाटत असावी. त्याच्या हिशेबी आपला देश आणि आपले देशबांधव यांना फारशी किंमत नव्हती.

संत तुकोबांनी अशा प्रवृत्तीला उद्देशूनच म्हटलं आहे, 'दया तिचे नाव, भूतांचे पालन, आणिक निर्दालन कंटकांचे।' प्राणिमात्रांचं पालनपोषण आणि संरक्षण करण्यासाठी काटेकुटे मोडून काढावे लागतात. काटे नष्ट करणं, हा समाजहिताचा मार्ग आहे. खळांची व्यंकटी नाहीशी व्हावी, हेही संतांचं एक स्वप्न आहे; पण इतिहास अशी साक्ष देतो, की महात्म्यांच्या सुंदर स्वप्नांच्या चिंधोट्या दुरात्म्यांनी केल्या आहेत. सत्याला असत्यानं, सौंदर्याला कुरूपपणानं, माणुसकीला राक्षसीपणानं जो दुष्ट विळखा घातला आहे, तो आपल्याला अजून सोडवता येत नाही, हीच आपली खरी शोकांतिका आहे. सुवास थोडा आणि दुर्गंधीच्या लाटा मात्र अधिक

वेगवान, ही परिस्थिती प्राचीन काळापासून आव्हान देत आहे. पैशांची किंमत वाढत गेली. माणूस आणि देश मात्र कंगाल आणि दरिद्री होत गेला. ही भयानक अवस्था कशी बदलायची, हे आता कळेनासं झालं आहे. माथ्यावरचं आकाश फाटत आहे. पायाखालची जमीन हादरत आहे. उच्च मूल्यांचा बाजार स्वार्थलंपटांनी उघड्यावर मांडला आहे. इच्छा एवढीच करायची, की प्रत्येकाच्या अंत:करणातली देवत्वाची झुळुक जागृत व्हावी, तसं मधून मधून घडू शकतं. कारगिलच्या रणभूमीवर २७ वर्षे वयाचा एक तरुण सैनिक शत्रूच्या हल्ल्यात जबर जखमी झाला. मरणोन्मुख डोळ्यांसमोर त्याला आपलं गाव, चार एकरांचं आपलं शेत, आपले आई-वडिल दिसत होते. क्षीण आवाजात तो म्हणत होता, ‘‘मायभूमीचं रक्षण करताना मला मरण येत आहे. मी भाग्यवान आहे. माझ्या देशाची माती माझ्या कपाळाला लावा आणि माझ्या शेतातल्या मातीत मला मिसळून जाऊ द्या. या मातीनं मला जगवलं, वाढवलं. तिच्याच कुशीत विसावू द्या.’’

एक प्रकारच्या कृतार्थ वृत्तीनं त्यानं प्राण सोडला; पण प्राण सोडताना आपल्या मायभूमीला त्यानं वंदन केलं. सामान्य शेतकरी कुटुंबातला हा तरुण देशासाठी हुतात्मा झाला. तो उच्च पदस्थ अधिकारी या पार्श्वभूमीवर आठवला, की मी तुकोबांच्या शब्दांत म्हणतो, ‘‘तुका म्हणे ऐंशा नरा। मोजूनि माराव्या पैजारा।’’ माझं म्हणणं मोजण्यात वेळ घालवू नये.

मूल्यांची प्रचंड पडझड होत असलेल्या या जगात माणुसकी मात्र दुर्मिळ होऊ लागली. जन्मभूमीवर प्रेम नाही. घरातल्या माणसांवरही प्रेम नाही. अशा अवस्थेतलं जगणं हे माणसाचं ठरेल का ? 'A man is a god in ruins' असं इमर्सनचं मत आहे. ‘मानव म्हणजे अवनत अवस्थेत असलेला देव’ हे त्याचं मत चुकीचं नाही, प्रश्न इतकाच की, अवनत असलेल्या माणसाचं देवत्वापर्यंत उन्नयन कसं आणि केव्हा होणार ? ही उत्क्रांती झाली नाही तर पशूंच्या प्रकारातच माणसाची गणना करावी लागेल.

●●●

# संवेदनशीलता हरवली ?

एका महानगरातली ही घटना. बसच्या थांब्यावर उभ्या असलेल्या एका स्त्रीच्या अंगावर रॉकेल ओतून तिला भर दिवसा कोणातरी क्रूरकर्म्याने पेटवून दिले. तिच्या करुण किंकाळ्यांनी वातावरण कोंदून गेलं; पण जळत असलेल्या स्त्रीच्या मदतीला मात्र आजूबाजूच्या शेकडो लोकांपैकी कोणीही गेलं नाही किंवा पेटविणाऱ्या नराधमाला पकडण्याचाही कोणी प्रयत्न केला नाही. त्या स्त्रीची राखरांगोळी झाली. हे भयानक आणि करुण दृश्य तटस्थपणे पाहणाऱ्या माणसांबद्दल काय बोलावं ? संवेदना हरवून बसलेला माणूस, हेच माणुसकीवरचं मोठं संकट आहे. माणसांच्या मनाची निर्जीव यंत्रं बनली आहेत काय ? वृत्तपत्रात ही वार्ता प्रसिद्ध होते आणि मग एखाददुसरा दिवस या रानटी घटनेची थोडीफार चर्चा होते. या शाब्दिक चर्चेतही एकप्रकारचा अलिप्तपणा असतो. काळजाला चटके देणाऱ्या या कृत्यामुळे कुणी संतापून उठत नाही. अन्यायावर शक्ती एकवटून तुटून पडावं असाही विचार कुणी करत नाही. जे घडतं ते त्रयस्थ वृत्तीनं पाहावं आणि आपल्या पोटापाण्याच्या उद्योगात गढून जावं, इतकाच व्यवहार घडतो. हे अपवादात्मक उदाहरण नव्हे. हिंसेच्या, जाळपोळीच्या, बलात्काराच्या अनेक घटना आजूबाजूला घडत असतात. अलीकडे अशा दुर्घटनांची संख्या वाढत चालली आहे. पण माणसांची संवेदना उत्तरोत्तर बधिर होत चाललेली दिसते. संवेदनाच हरवून बसलेला समाज नवीन निर्माण करू शकत नाही. ही संस्कृतीवरील भयाण आपत्ती आहे.

आपल्या देशाबद्दल आणि धर्मसंस्कृतीबद्दल अत्यंत हेटाळणीचे उद्गार काढणाऱ्या एका घमेंडखोर परदेशी माणसाचा दंड धरून स्वामी विवेकानंद त्याच्यावर कडाडले होते, ''माझ्या राष्ट्राला, माझ्या राष्ट्रबंधूंना आणि धर्माला शिव्या देशील तर तुला उचलून समुद्रात फेकून देईन.'' स्वामीजींच्या मनगटातली शक्ती त्या निंदकाला जाणवली. त्यांच्या स्वरातली धगही त्यानं अनुभवली. त्याच्याबरोबरच्या आठ-दहा सहकाऱ्यांनाही हे जाणवून गेलं. निंदा करणाऱ्या व्यक्तीनं स्वामीजींची क्षमा मागितली. निंदक संघटित होते, पण सामर्थ्याचे शब्द आणि कृती यांचा प्रत्यय आल्याबरोबर त्यांनी मान वाकवली. असंस्कृतपणाची चीड येण्यासाठी मन जिवंत

आणि ज्वलंत असावं लागतं. मनाचा हा गुणधर्म गमावून बसलेली मुर्दाड वृत्तीची माणसं नवा इतिहास घडवू शकत नाहीत. लव्हाळ्याप्रमाणे ठायी ठायी वाकत राहणारी माणसं लाचारीलाच जीवन समजतात. दृष्टीसमोर घडणाऱ्या मूर्तिमंत अन्यायाला शब्दानंसुद्धा प्रतिकार न करणारी षंढ वृत्ती खरोखरच लाजीरवाणी आहे. फार विचार करून कर्तव्यशून्यता येत असेल, तर त्यापेक्षा अविचारानं केलेली परिणामकारक कृती केव्हाही समर्थनीय म्हणावी लागेल. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या जीवनात कधी कधी विलक्षण अटीतटीचे प्रसंग येतात. अशा वेळी पळपुट्या तत्त्वज्ञानाचा आश्रय घेऊन कातडी वाचविण्यात कोणता शहाणपणा आहे ? आपली निष्क्रियता आणि सुजनता हेच दुर्जनांचं भांडवल असतं. धर्मराजाच्या निष्क्रिय सज्जनपणामुळे दुर्योधनी प्रवृत्ती उन्मत्त होत जाते. मदोन्मत्त वृत्तीला ठामपणानं शासन करणं, हे धर्माचंच एक अंग आहे. संत तुकोबांनी हे जीवनतत्त्व समर्पक शब्दांत सांगितलं आहे.

**देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।।**
**तेथे पैजारेचे काम । अधमासी तो अधम ।।**

हा समाजधारणेचा विचार संतांनी सांगितला आहे. विंचवांच्या नांग्या वेळेवर ठेचल्या नाहीत तर विंचवांच्या टोळ्या संघटित होतात. दंश करण्याचा आपला धर्म त्या इमानेइतबारे पाळतात. माणसाचा धर्म माणसानं निष्ठेनं पाळला पाहिजे. जे भव्य दिसेल त्यासमोर त्यानं नतमस्तक व्हावं; पण जिथं अन्याय, अत्याचार, अधर्म दिसेल तिथं त्यानं ज्वालेसारखं उफाळावं, माणूस जगायचा असेल तर हिंस्त्र वृत्तीची मुळं खणून काढावी लागतील, हा इतिहासाचा संदेश स्वीकारावा लागेल. आम्हाला आमची संवेदनशीलता हरवायची नाही. तिचं जतन आणि संवर्धन, हेच मानवतेचं उत्थापन ठरेल.

या यंत्रयुगात माणूसदेखील यंत्रासारखाच गतिमान पण संवेदनाहीन होत आहे. फुलं पाहून तो धुंद होत नाही. बालकांच्या मुखावरचं हास्य त्याला खुलवू शकत नाही. लक्ष हातातल्या घड्याळाकडं आणि चर्चगेटला जाणाऱ्या लोकलकडं. आंतरिक स्फुरणं उरलीच नाहीत. जगण्याची जाणीव हरवत चाललेला मानवी समूह मनानं आणि भावनेनं बधिर होत चालला.

●●●

# सत्ता आणि सत्ताधीश

लक्ष्मीप्रमाणेच सत्तादेखील चंचल असते. सत्तेचं आसन केव्हा डळमळीत होईल आणि ते केव्हा उन्मळून पडेल हे सांगता येत नाही. पण या सत्तेला लोचटपणाने चिकटून राहण्याची बहुतेक सत्ताधीशांची प्रवृत्ती असते. कारण अधिकाराच्या खुर्चीमुळेच ते प्रकाशवलयात राहिलेले असतात. लोक त्यांच्याभोवती जमतात आणि त्यांचं गुणसंकीर्तन करीत राहतात. शितं असली म्हणजे भुतं जमायला वेळ लागत नाही. हाती आलेल्या सत्तेचा लोककल्याणासाठी उपयोग करून घेणारे सत्ताधारी फार थोडे असतात. बहुतेक जण सत्तेच्या उन्मादाने लोकजीवनाकडे पाठ फिरवितात, असा इतिहास आहे. प्रजेच्या हितासाठी सर्वस्वाचा त्याग करणारे सत्ताधीश क्वचितच आढळतात. रामाचे उदाहरण या बाबतीत सदैव लक्षात ठेवण्यासारखे आहे.राजा रामचंद्र म्हणाला होता, 'लोकाराधन व लोककल्याण यासाठी माझ्या आयुष्यातील सर्व सुखांचा, फार काय सीतेचासुद्धा त्याग करायला मी तयार आहे. लोकांचं सुख हेच माझं ध्येय आहे.' अशा प्रकारचे उदात्त शब्द निवडणूक प्रचाराच्या भाषणात कधीतरी ऐकायला मिळतात. प्रजावत्सल राम मात्र आता विस्मरणाच्या अंधारात विलीन होऊन गेला. त्याचं मंदिर सर्वच राज्यकर्त्यांनी आपल्या हृदयात उभं केलं पाहिजे. पण हे कसं घडणार ? राम नावाचं भारतीय संस्कृतीला पडलेलं एक भव्यसुंदर स्वप्न वितळून गेलं आहे. निराश मनाला दिलासा देण्यासाठी कधीतरी त्याचं स्मरण करणं, एवढंच उरलं आहे.

बहुसंख्य सत्ताधारी आपल्या सत्ताप्रेमाच्या आणि अहंकाराच्या आकुंचित वर्तुळातून सत्ता गेली तरी बाहेर पडत नाहीत. साध्या शासकीय किंवा अशासकीय कचेऱ्यांतले सामान्य 'साहेब'सुद्धा निवृत्त झाले तरी अहंगंडाच्या खुर्चीला घट्ट धरून बसतात, याची अनेक उदाहरणे देता येतील. अधिकारपदावरून खाली उतरल्यानंतर सत्तेचे वस्त्र आपल्या अंगावरून काढून टाकलं पाहिजे. किती दिवस ते लागटपणाने धरून ठेवायचे ? कुणीतरी यावे आणि आपल्याशी त्याने अत्यंत अदबीने बोलावे, आपल्यासमोर झुकावे, 'साहेब-साहेब' म्हणून आपली प्रशस्ती करावी, असेच त्यांना वाटत राहते. स्वभावात मुरून बसलेली आढ्यता जाता जात नाही. अशी माणसे

आनंदाचे जीवन जगू शकतील का ? सर्व क्षेत्रांत याप्रकारची माणसे आढळतात. हे आपल्या सांस्कृतिक वातावरणातील एक वैगुण्य आहे, यात शंका नाही. ताक मागायला आलेल्या शेजारणीला सुनेनं सांगितलं, 'आज ताक शिल्लक नाही.' पण हे सासूबाईला आवडलं नाही. परत निघालेल्या शेजारणीला तिनं बोलावून विचारलं. 'ताक तिला का मागितलंस ? ते देण्याचा किंवा न देण्याचा अधिकार माझा आहे. ती कोण ? जा, आज ताक शिल्लक नाही.'

सत्तेला लहानसाही ओरखडा कुणी काढला तर ते माणसाला सहन होत नाही. सत्ता आणि स्वामित्व या दोन गोष्टींचा जबरदस्त प्रभाव ज्या लोकांवर पडतो, ते खरंतर दुबळे लोक असतात, असेच म्हटले पाहिजे. सत्तामदाने उन्मत्त झालेला माणूस उदात्त मूल्यांची कशी मोडतोड करू शकतो, याचे दर्शन आजच्या जगात सर्वत्र घडत आहे. त्यासाठी इतिहासाची पाने चाळण्याचे कारण नाही. लॉर्ड ॲक्टनचं प्रसिद्ध वचन याबाबतीत नेहमीच उल्लेखिले जाते. 'सत्ता माणसाला बिघडविते आणि संपूर्ण सत्ता संपूर्णपणे बिघडवून टाकते.' या विचाराला छेद देणारे थोडेतरी अपवाद आहेत, हे मानवतेचे सुदैव म्हणावे लागेल. सत्तेची नशा सत्ता गेली तरी उतरत नाही. पण काही सत्ताधाऱ्यांच्या मस्तकात ही नशा कधीच जात नाही, म्हणूनच सत्तेचा विनियोग ते सावधपणे आणि संयमाने करून सामाजिक प्रगतीला हातभार लावतात. 'राजा म्हणजे राज्याचा उपभोगशून्य स्वामी' हे गडकऱ्यांचे सुभाषित अर्थपूर्ण आहे. सत्तेच्या प्रेमापेक्षा आपल्या प्रेमाची सत्ता लोकमनात प्रस्थापित करणारा लोकनेता श्रेष्ठ असतो. त्याला राज्याभिषेकाची गरज नसते. लोकमनावर राज्य करणारे राज्यकर्ते निर्भय असतात. अवतीभोवती अंगररक्षकांची फौज उभी करण्याचे त्यांना कारण नसते. सत्ताधाऱ्यालाच लोकांपासून संरक्षण पाहिजे असेल, तर लोकपालनाची जबाबदारी त्याला कशी पेलता येईल ? लोकांपासून अलिप्त राहून आपल्या सिंहासनावर सैनिकी संरक्षणात बसलेले राजाधिराज स्वत:ला लोकराजे म्हणवून घेत आहेत. प्रशंसेच्या चवऱ्या ढाळण्यासाठी त्यांनी सेवक नियुक्त केले आहेत, असे सत्ताधीश सत्तेचा उपभोग आनंदाने घेत असतील काय ?

●●●

# किती जगावे ?

'जीवेत शरदः शतम्' किंवा 'शतायुषी भव' असा आशीर्वाद देण्याचा संकेत आहे. माणसाच्या आयुष्याचं शंभर वर्षांचं माप फार पूर्वीपासून ठरलेलं असावं. मानवी कर्तृत्वाला शंभर वर्षे पुरेशी आहेत, असं मानलं जातं; पण माणसाच्या पदरात फारतर साठ-सत्तर वर्षं कशीबशी पडतात. पूर्वी तर चाळिशी आली की आयुष्याचा पैलतीर गाठला, असं समजलं जायचं. आता आयुर्मान वाढलं आहे. काही भाग्यवान माणसं शंभर वर्षे वसूल केल्याशिवाय राहत नाहीत. हे दीर्घायुष्यसुद्धा कर्तृत्वाचा इतिहास घडवायला अगदीच अपुरं आहे, असं कित्येकांना वाटतं. बर्नार्ड शॉनं तर मनुष्याला किमान चार-पाचशे वर्षांचं जीवन लाभावं, म्हणजे तो इतिहासाला आकार देऊ शकेल, भव्य योजना आखून त्या यशस्वी करू शकेल. जीवनाचा आनंद मन:पूर्वक घेऊ शकेल, अशा आशयाचं प्रतिपादन एका नाटकात केलं आहे. त्यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. नियतीनं पराक्रमी व्यक्तींच्या पदरात आयुष्य टाकताना फार कद्रूपणा केला आहे, असं इतिहासावरून दिसतं. छत्रपती शिवाजी महाराज पन्नाशीच्या उंबरठ्यावर असताना जग सोडून गेले. आणखी दहा-वीस वर्षे त्यांच्या वाट्याला आली असती तर साऱ्या हिंदुस्थानच्या इतिहासाला त्यांनी वेगळं वळण दिलं असतं.

हेच विधान ज्ञानेश्वर-तुकारामांबाबतही करता येईल. नवनिर्मिती करणाऱ्या वीरांना, क्रांतिकारकांना, कवींना आणि संतांना जगण्याची पुरेशी संधीच मिळाली नाही. त्यांच्या कर्तृत्वाचा वृक्ष बहराला येण्यापूर्वीच त्यांना मृत्यू यावा, ही मानवी संस्कृतीची शोकांतिका आहे. महनीय व्यक्तींची गोष्ट बाजूला ठेवू. सामान्य माणसालाही साठ-सत्तर वर्षांत फारसं काही करता येत नाही. आपल्या व्यक्तिगत आणि कौटुंबिक आयुष्यालाही तो स्थैर्य देऊ शकत नाही. आयुष्याच्या लॉजिंग-बोर्डिंग हाऊसमध्ये दोन दिवस कसं तरी राहावं आणि तिसऱ्या दिवशी बेडिंग घेऊन स्टेशन गाठावं, अशी अवस्था नाही काय ? जगाच्या धर्मशाळेत सगळे टेंपररी लोक राहतात. काही कार्य करायला अवसरच राहत नाही, हे पाहिल्यावर शॉच्या नाट्यमय विचाराचं स्वागत करावंसं वाटतं.

पण माणसाला जर चार-पाच शतकांचं दीर्घ जीवन लाभलं तर काय होईल याची कल्पनाही करवत नाही. आजच जगात प्रचंड लोकसंख्येचा स्फोट झालेला आहे. जगाच्या धर्मशाळेत माणसं मेंढरासारखी राहत आहेत. मुंबईच्या लोकलमध्ये पाय ठेवायलाही जागा मिळू नये, तशी स्थिती दीर्घ जीवनाच्या वस्तुस्थितीमुळे होईल. केवळ जगत राहायचं, जीवनाला वर्षानुवर्षं चिकटून राहायचं ही अवस्था फारशी सुखावह नाही. अल्पायुष्य हा शाप आहे, त्याप्रमाणेच अति दीर्घायुष्य हादेखील शापच म्हणावा लागेल. जोपर्यंत आपल्या जगण्याला एखाद्या उत्कट आणि उदात्त इच्छेचं अधिष्ठान आहे तोपर्यंतच जगण्यात स्वारस्य आहे. रस आणि वास नसलेल्या फुलानं फार काळ जगणं त्यालाही सुखावह ठरणार नाही.

**'अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक'**

हे भव्य उद्दिष्ट मनात ठेवून अल्पकाळ जगलेले ज्ञानदेव जगाला दीर्घकाळ पुरेल इतका आपल्या प्रतिभेचा आणि माणुसकीचा सुगंध देऊन गेले. एकविसाव्या वर्षात त्यांनी जगाचा निरोप घेतला; पण कित्येक शतकांचं निरर्थक आयुष्य एखाद्याला लाभलं तरी त्याच्या हातून काय घडणार आहे ? प्रदीर्घ जगूनसुद्धा माणसं जीवनानंद निश्चितपणे घेऊ शकतील किंवा देऊ शकतील याची ग्वाही देता येत नाही. कित्येक दशकं आणि कित्येक शतकं धुरकटपणे जगत राहण्यात खरोखरच काय पराक्रम आहे ? त्यापेक्षा पाच-दहा वर्षांतच ज्याच्या शौर्याला-धैर्याला, निर्मितिशीलतेला आणि पुरुषार्थी कर्तृत्वाला बहर येतो, तोच इतिहासावर आपले संस्कार करू शकतो. दीर्घायुष्यामुळे कदाचित माणूस आजच्यापेक्षा अधिक असंस्कृत आणि विध्वंसक बनत गेला तर काय करणार ? शंभर शरद ऋतू आनंदानं जगावं आणि इथून निघून जाताना नव्या पिढीच्या पदरात आनंदाची शिदोरी टाकावी हेच श्रेयस्कर आहे. जगण्यामरण्याची सूत्रं ज्याच्या हातात आहेत, त्यानं आम्हाला अल्प जीवन दिलं तरी तक्रार नाही. अल्प जीवनालाही प्रेमाचा गंध असावा आणि कर्तृत्वाचं अधिष्ठान असावं. जीवनाची कृतार्थता त्यातच आहे.

किती जगावे यापेक्षा कसे जगावे हेच अधिक महत्त्वाचे आहे. कितीही जगावं पण त्या जगण्यात जीवन असावं. साहस असावं. दुसऱ्यावर प्रेम करण्याची उत्कटता असावी. मग हे जगणं अल्प असो की दीर्घ असो. त्याची पर्वा करू नये.

●●●

# उत्तर नसलेला प्रश्न

संतांच्या साहित्यावर रसाळ प्रवचनं देणारे एक व्यासंगी प्रवचनकार प्रवचन-कीर्तनांत समतेच्या विचारावर भरभरून बोलायचे. आपला देव आणि धर्म सर्वांकडे कसा समदृष्टीनं पाहतो, यावर ते उत्तम भाष्य करायचे. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, जातीच्या आणि संप्रदायाच्या अहंकारातून ते कधीच बाहेर पडले नाहीत. त्यामुळे इतरांविषयी असहिष्णुता आणि काहीशी तुच्छता त्यांच्या वर्तनातून व खासगी बोलण्यातून जाणवायची. ज्ञानवंत समजल्या जाणाऱ्या लोकांच्या आचारविचारात जेव्हा आकुंचितपणाचं, क्षुद्रपणाचं दर्शन होतं, तेव्हा ज्ञानातून खरोखरच परिवर्तन घडू शकतं का, हा प्रश्न मनात उभा राहतो. बुद्धिहीन कर्मकांडांवर विश्वास ठेवणारे हे बुद्धिमान लोक इतरांचा बुद्धिभेद करू शकतात. 'भेदाभेदभ्रम अमंगळ' या तुकोबांच्या वचनावर टिप्पणी करताना सदर प्रवचनकार म्हणाले, ''पारमार्थिक दृष्टीनं भेद मानू नयेत; पण व्यावहारिक दृष्टीनं मात्र भेद मानलेच पाहिजेत. सारे समान आहेत हे मान्य; पण राजा आणि रंक कधीच समान नसतात. जातीच्या पलीकडे जरूर जावं; पण जातीचीही मर्यादा सांभाळली पाहिजे.'' आता हे भाष्य किती तर्कदुष्ट आणि फसवं आहे, हे सांगायला नको.

आजच्या बुद्धिवादी जगात जातिधर्माच्या आणि संप्रदायांच्या भिंती अधिकाधिक उंच व बळकट होत चालल्या आहेत. याच भिंतींना शिड्या लावून धूर्त राजकारणी लोक सत्तेचं सिंहासन गाठू शकतात. या भिंतींमुळे त्यांचं पुढारीपण टिकू शकतं. धर्मकल्पनेची नशा इतर कुठल्याही नशेपेक्षा अधिक धुंदी आणू शकते. भेदाभेदांच्या वलयात गुरफटून गेलेल्या लोकांना आपण मानवतेविरुद्ध गुन्हा करीत आहोत, याची जाणीव होत नाही, ही एका अर्थानं मानव समाजाची शोकांतिका आहे.

पंचवीस शतकांपूर्वीची एक गोष्ट. भगवान बुद्ध रानातून गावाकडे येत होते. कडक उन्हातून चालताना त्यांना तहान लागली; पण जवळपास कुठंही पाणी मिळण्याचं चिन्ह दिसत नव्हतं. तशाच अवस्थेत ते एका झोपडीजवळ आले. कोणी स्त्री आत चूल पेटवीत होती. बुद्धांनी तिला म्हटलं, ''भद्रे, तहानेनं घसा कोरडा

झाला आहे. कृपा करून प्यायला पाणी देशील का ?'' ती स्त्री लगबगीनं उठून, हात जोडून त्यांना म्हणाली, ''भगवान, मी पाणी कसं देऊ ? मी तर हलक्या जातीची आहे.'' बुद्ध हसून म्हणाले, ''मी तुला पाणी मागितलं, जात नव्हे. जात ही कल्पना आहे. पाणी हे सत्य आहे.'' हे ऐकताक्षणीच त्या स्त्रीच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. कित्येक शतकांच्या बेड्या आपल्या पायांतून निखळून पडल्या आहेत; आपण मुक्त झालो आहोत, असं तिला वाटलं. आणि तिनं बुद्धांच्या हातात पाण्याचं पात्र दिलं, ती बुद्धांची शिष्या झाली. अडीच हजार वर्षांपूर्वीची ही गोष्ट आता फार जुनी झाली. आता धर्म सांगणाऱ्यांच्याच मनात जातीयता आणि सांप्रदायिकता असते. बुद्धाला जात ही कल्पना वाटली; पण तीच कल्पना आज एका भयानक सत्याचं रूप घेऊन आपल्यासमोर उभी आहे. माणसांची जात नव्यानव्या जाती शोधून काढण्यात निष्णात झाली आहे. बुद्ध-ज्ञानेश्वर-तुकाराम जुने झाले. गाडगेमहाराजही जुने होऊ लागले. नव्या नव्या भिंती पाडण्याचा उपदेश करणाऱ्यांच्या मनातली भिंत जोपर्यंत अभंग आहे, तोपर्यंत हे असंच चालणार आहे काय, या प्रश्नानं मन अस्वस्थ होतं. हा प्रश्नही जुना झाला आहे; पण अजून त्याला उत्तर मिळत नाही.

पंचवीस शतकांपूर्वी बुद्ध म्हणाले, जात ही केवळ कल्पना आहे. पण आज शास्त्रीय सुधारणेच्या बुद्धिवादी युगातही जात आणि संप्रदाय यांच्या कुंपणात राहिलेले लोक पाहिल्यावर सुधारणेचं युग उगवता उगवता अस्ताला गेलं असाच निष्कर्ष काढावा लागतो. सारी माणसं समान आहेत हा विचार पुस्तकातच राहिला. इथं हिंदू आहेत, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, जैन, लिंगायत आहेत. नाहीत ती फक्त माणसं ! एखाद्या बहिणाबाईनं विचारलं, 'मानसा, मानसा कवा व्हशील रं माणूस ?' या प्रश्नाला उत्तर केव्हा मिळणार हा एक प्रश्नच आहे.

●●●

# प्रेमाचा प्राणवायू

मानवी मनातून प्रेमभावनाच नष्ट झाली तर जीवन सर्वार्थानं रसशून्य आणि दुःखमय होईल, यात शंका नाही. कवी तिरुवल्लुवर यानं आपल्या 'कुरल' काव्यात म्हटलं आहे, 'प्रेम म्हणजे जीवनाचे जीवन. ज्यांच्याजवळ प्रेम नाही तो केवळ अस्थी आणि चर्म यांचा सांगाडाच म्हणावा लागेल. परस्परांवर प्रेम करणाऱ्यांच्या डोळ्यांत जमणारे अश्रू पवित्र असतात.' खरं तर प्रेमाची महती सिद्ध करण्यासाठी एखाद्या कवीच्या अवतरणाची आवश्यकता नाही. प्रेम हा व्याख्यानाचाही विषय नव्हे. तो अनुभवण्याचा विषय आहे. प्रेमाचा सूर मुखरित झाला की माणसाचं सारं जीवन संगीतमय होतं. मूर्च्छित पडलेल्या सीतेला रामस्पर्श झाल्याबरोबर ती जागृत झाली, असा उल्लेख रामायणात आहे. आज मात्र मूर्च्छा आणणारं दुःखद वातावरण साऱ्या जगात गडद होऊ लागलं आहे. प्रेमाचा सूर कुठं हरवला कुणास ठाऊक ! माणूस कमालीचा आत्मकेंद्रित झाला. क्रोधानं आणि द्वेषानं माखून निघालेलं माणसाचं मन सूडाच्या इच्छेनं धुमसत आहे. बंदुकीच्या गोळीवर किंवा हातातल्या धारदार सुऱ्यावर प्रेम करणारा माणूस माणुसकी विसरत चालला आहे. प्रेमाला लागलेली ओहोटी म्हणजे मरणाला येत असलेली भरती आहे. 'मी साऱ्या जगावर प्रेम करतो, माझ्या प्रेमाच्या पाशात मी साऱ्या सृष्टीला ओढून घेईन.' असं म्हणणारी महनीय माणसं कुठंच भेटत नाहीत. प्रेमाच्या धारा आटून गेल्या, मानवी रक्ताच्या धारा ओसंडून वाहू लागल्या, हे आजच्या जगाचं चित्र आहे.

माणूस माणसावर प्रेम करीत नाही. पती-पत्नीदेखील एकमेकांवर प्रेम करू शकत नाहीत. कारण दोघेही आपापल्या अहंकाराच्या वर्तुळात फिरत असतात. प्रेमाची भावना उत्कट होण्यासाठी मनातला क्षुद्र अहंकार निरसून गेला पाहिजे. अहंकाराबरोबरच द्वेष-मत्सराचेही फुत्कार मनात असतात. त्यामुळं प्रीतीचा, आत्मीयतेचा स्पर्श मनाला होत नाही. लिटन स्ट्रॅचे यानं लिहिलेल्या राणी व्हिक्टोरियाच्या चरित्रात एक प्रसंग आला आहे. ही राणी आपल्या सम्राज्ञीपदाच्या नशेत नेहमी चूर असायची. तिचं आपल्या पतीकडे फारसं लक्ष नव्हतं. त्याच्याशी दोन धड वाक्यंदेखील ती बोलत नसे. आपण आणि आपली सत्ता, आपल्या

भोवतालचे स्तुतिपाठक यांच्यापलीकडे तिला काही दिसत नव्हतं. एकदा तिला आपल्या पतीची आठवण झाली. त्याला भेटण्यासाठी म्हणून ती त्याच्या दालनाकडं गेली. तो आपल्या खोलीत कुठलासा ग्रंथ वाचत बसला होता. दारावर 'टकटक' ऐकू आली म्हणून त्यानं विचारलं, 'कोण आहे ?' बाहेरून उत्तर आलं, 'मी इंग्लंडची महाराणी, दार उघड.' तिच्या पतीनं-अल्बर्टनं तिकडं दुर्लक्ष केलं. दार उघडलं नाही. पुन्हा दारावर आवाज झाला. अल्बर्टनं विचारलं, 'आता कोण आहे ?' 'मी हिंदुस्थानची सम्राज्ञी, मी ब्रिटनची स्वामिनी.' तरीही दार उघडलं नाही. अल्बर्ट शांतपणानं वाचन करीत होता. दार उघडलं जात नाही असं पाहून व्याकूळ झालेल्या त्या महाराणीनं 'अल्बर्ट, मी तुझी व्हिक्टोरिया आहे. कृपा करून दार उघड.' असं म्हटलं. 'तुझी व्हिक्टोरिया' या शब्दात अहंकार नव्हता. प्रेमाची छटा होती. अल्बर्टला शब्दोच्चारातला फरक जाणवला आणि त्यानं आपल्या व्हिक्टोरियासाठी दार उघडलं. हृदयाचंही दार उघडलं.

हा प्रसंग मार्मिक आहे. अल्बर्टला आपली प्रेयसी हवी होती. इंग्लंडची सम्राज्ञी नको होती. प्रिय व्यक्तीचं प्रेम, हे जगातल्या कोणत्याही सत्तेपेक्षा प्रेमिकाला महान वाटतं. प्रेमाची दृष्टी लाभली की सभोवतालची सृष्टी 'आनंदरूपिणी' वाटू लागते. हे प्रेम देवावरचं असेल, देशावरचं असेल किंवा व्यक्तीवरचं असेल; प्रेम नेहमीच आनंद देतं. अहंकाराचं मळभ दूर करतं. प्रेमविषय झालेल्या व्यक्तीत किंवा त्या विशिष्ट विषयात स्वत:ला विलीन करावं, असं वाटतं. आपलं अस्तित्व प्रेमाशिवाय विसर्जित करता येत नाही. माणसं आपल्या व्यर्थ अहंकाराला कुरवाळीत बसतात. अहंभावना वाढत चालली की प्रेमभावना कमी कमी होत जाते. आज तर या भावनेचा दुष्काळ पडला आहे. तो उत्तरोत्तर तीव्र होत जाणार की काय, अशी शंका येते. म्हणूनच संतांनी प्रेमविकासाचं स्वप्न पाहिलं. रक्तानं न्हाऊन निघालेला येशू ख्रिस्त डोळ्यांत अश्रू आणून परमेश्वराला विनवीत होता, 'या लोकांना आपण काय करतो ते कळत नाही. देवा, यांना क्षमा कर.' आपल्या अंतिम क्षणीसुद्धा माणसांवर प्रेमाची पाखर घालणारा ख्रिस्त महान आहे. संतांनीही जगावरच्या प्रेमामुळं 'दुरिताचं तिमिर' निरसून जावं, असं 'पसायदान' मागितलं. आम्ही सामान्य माणसांनी स्वार्थाच्या वर्तुळातून बाहेर पडून प्रेमाची देवाण-घेवाण करायला सुरुवात केली तर आम्ही आणि हे जग निश्चित बदलेल. आमच्या श्वासोच्छ्वासात प्रेमाचा प्राणवायू मिसळला पाहिजे.

●●●

# एकच प्याला

अलीकडे चित्रपटांतून, दूरदर्शनवरील अनेक मालिकांतून आणि जाहिरातींतून मद्यपानाची अनेक दृश्ये दाखविली जातात. असले देखावे पाहिल्यावर नवतरुणांच्या मनावर कोणता संस्कार होत असेल, हे सांगण्याचं कारण नाही. आपल्याला काहीतरी प्रचंड दु:ख झालेलं आहे, तेव्हा ते विस्मृतीत बुडविण्यासाठी मद्यपानाशिवाय दुसरा मार्गच उरलेला नाही, अशी भ्रांतिष्ट समजूत अनेकांची झालेली असते. परीक्षेतील अपयश असो, प्रेमप्रकरणातून आलेलं वैफल्य असो, ते विसरण्यासाठी ओठाशी सिगारेट आणि हातात मदिरेचा प्याला घेतलाच पाहिजे, अशा मूर्ख कल्पनांच्या आहारी हे तरुण जातात. आयुष्यातील आपत्तींशी कणखर मनानं लढण्याची कुवत नसलेले हे सुमार डोक्याचे तरुण या व्यसनांकडे धाव घेतात. आपण सनातन संकेतांविरुद्ध बंड करीत आहोत, अशीही त्यांची खुळचट विचारसरणी असते. मॅच जिंकल्याचा आनंद साजरा करण्यासाठी किंवा ती हरल्याचं दु:ख विसरून जाण्यासाठी 'पार्टी' आयोजित केली जाते. हे बौद्धिक दारिद्र्याचं आणि मानसिक दुबळेपणाचं केविलवाणं प्रदर्शन आहे. मद्यपान हे पुढारलेपणाचं लक्षण मानून त्याकडे वळणाऱ्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत आहे. हे व्यसन शाळकरी पोरापोरींपर्यंत केव्हाच पोचलेलं आहे. तालुक्याच्या लहानशा गावातले दोन-चार-दारूचे गुत्ते (चुकलो ! बिअर बार किंवा परमिट रूम अथवा नाइट क्लब - इंग्रजी शब्द वापरले की जिभेला कसं पॉलिश केल्यासारखं वाटतं.) देखील पोरांनी भरलेले असतात. त्यात त्यांचे शिक्षक नसतीलच अशी ग्वाही देता येत नाही.

मद्यपानाचा हा सार्वत्रिक प्रभाव चिंताजनक आहे, असा विचार व्यक्त करणाऱ्या एका विचारवंताला दुसरे विचारवंत म्हणाले, 'अहो, हे नवयुगाचं एक महत्त्वाचं लक्षण आहे. तुम्ही अजून जुन्या युगातच वावरत आहात. आधुनिक जगात राहायचं तर इतके मागासलेले विचार घेऊन राहता येणार नाही. आपण 'मॉडर्न' बनलं पाहिजे. आपले आचरविचारही प्रोग्रेसिव्ह - पुरोगामी असले पाहिजेत. थोडं जगाबरोबर राहा.' ही प्रागतिक विचारसरणी त्या मागासलेल्या विचारवंताला किती रुचली असेल याची कल्पना नाही; पण मद्यपानाच्या व्यसनाचं आधुनिकतेच्या

नावाखाली झपाट्यानं पुनरुज्जीवन होत आहे, यात शंका नाही.

आजच्या सुसंस्कृत जीवनशैलीत पाश्चात्त्यांच्या अनुकरणानं म्हणा अथवा आपल्या प्रगतिवादी विचारांमुळं म्हणा, मद्याला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. फुलांच्या सुगंधापेक्षा दारूचा दर्प अधिक लोकप्रिय होत आहे, ही समाजजीवनाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

एकदा एक असामान्य प्रतिभेचा गायक म्हणाला, 'अनेक कलावंतांच्या कलेला या व्यसनामुळे उतरती कळा लागली आहे. खरंतर कोणत्याही कलावंताला त्याच्या कलेतूनच एक प्रकारची दिव्य नशा मिळाली पाहिजे. कलानिर्मितीच्या उन्मादासारखा विलक्षण आनंद मद्याच्या उन्मादातून कसा मिळू शकेल ? माझ्या वयाला सत्तर वर्षे उलटून गेली; पण तानपुरे वाजू लागले की माझ्या कंठात परमेश्वरानं ठेवलेला तो स्वरांनी भरलेला प्याला ओसंडून वाहू लागतो. त्यातून जी धुंदी येते, तिच्यामुळे माझं जीवनगाणं रंगून गेलं आहे.'

गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नाटकातलं जीवनचित्रण भडक आणि अतिरंजित स्वरूपाचं आहे, अशी टीका त्या नाटकावर केली जाते. पण आनंदानं ओसंडत असलेली कित्येक गोकुळं दारूमुळे उद्ध्वस्त होत आहेत हे प्रत्यही पाहायला मिळत असूनही त्या नाटकावर कृत्रिमेचा शिक्का मारण्याचं कारण नाही. समाज आणि राष्ट्र यांचं जीवन निरोगी ठेवायचं असेल तर दारूचा वाससुद्धा आयुष्याला लागू नये याची दक्षता घेतली पाहिजे. पण आजच्या पुढारलेल्या जगात हे मागासलेले विचार कोण ऐकणार ?

खरं तर मद्य सर्वनाशक आहे हे सांगण्यासाठी उदाहरणं घेण्याची जरूर नाही. मद्यपान हे मॉडर्न युगाचं लक्षण आहे असं म्हणणाऱ्या (अ) विचारवंताला सांगणं आवश्यक आहे की, रानटी युगातही मद्य होतं. आता वातानुकूलित बारमध्ये बसून काचपात्रातून मद्य घेतलं म्हणजे ते प्रशंसनीय आणि अनुकरणीय ठरतं काय ? गुत्त्यात बसलेला रांगडा अशिक्षित आणि बारमध्ये कोचावर रेलून बसलेला सुटाबुटातला सुशिक्षित दोघेही अडाणीच आहेत. हे कळण्याइतकं भान आलं पाहिजे.

●●●

# द्रौपदीचा प्रश्न

राजा धृतराष्ट्र उपस्थित असताना अनेक आचार्य, विचारवंत यांच्यासमोर दु:शासनानं द्रौपदीला दासी म्हणून फरपटत आणावं आणि तिला विवस्त्र करण्याचा निर्लज्ज प्रयत्न करावा, ही महाभारतातील अत्यंत धक्का देणारी दु:खद घटना आहे. तेव्हापासून स्त्रीकडे पाहण्याचा पुरुषी दृष्टिकोन काय आहे, हे स्पष्ट होतं. सत्तेमुळे उन्मत्त झालेले कौरव केवळ महाभारतातच नव्हेत, ते आधुनिक भारतातही आहेत. अधम वृत्ती आजही ओसरलेली नाही. दासी असो की सम्राज्ञी असो, द्रौपदीकडे पाहण्याची कौरवदृष्टी संस्कृतीच्या दारुण अध:पाताची कथा आहे. द्रौपदी तेजस्विनी होती. तिनं कौरवसभेतल्या महनीय आचार्यांना प्रश्न विचारला, ''स्त्रीवर होणारा हा अन्याय तुम्हाला मान्य आहे का ? सत्ता आणि संस्कृती यांचं हे विद्रूप दर्शन समर्थनीय आहे का ? ज्या सभेत वृद्ध म्हणजे, परिपक्व विचारांचे लोक नाहीत, ती सभाच नव्हे. आणि जे धर्म सांगत नाही ते वृद्ध नाहीत. या अधर्माला आणि अन्यायाला तुमची संमती आहे का ?''

द्रौपदीचा प्रश्न धारदार होता. या प्रश्नामुळे सभा स्तब्ध झाली. एकही ज्ञानी आचार्य उत्तर देऊ शकला नाही. खरं तर प्रश्नाचं उत्तर एकच होतं. 'हा अधर्म आहे, हा अन्याय आहे. या घृणास्पद वर्तनाला आमची संमती नाही. या दुष्कृत्याचा आणि ते करणाऱ्यांचा आम्ही धिक्कार करतो.' पण हे शब्द उच्चारण्याचं नैतिक धैर्य एकाही आचार्यांकडे नव्हतं. सत्तेचे आणि अर्थाचे गुलाम झालेले ज्ञानवंत आपल्या डोळ्यांवर कातडं ओढून आणि विवेकबुद्धीला खोलवर दडपून श्रेष्ठ मूल्यांचं वस्त्रहरण पाहत होते. जे ज्ञान अन्यायाच्या आणि अधर्माच्या विरुद्ध बंड करून उठत नाही, ते ज्ञान हे अन्यायाचं आणि अनीतीचं द्योतक आहे. महाभारतातला हा प्रसंग कुणालाही अत्यंत अस्वस्थ करणारा आहे. प्रत्यक्ष पाहणाऱ्या एकाच्याही रक्ताला उकळी फुटली नाही, याचं आश्चर्य वाटतं. द्रौपदीसारख्या स्त्रीरत्नाचं तेज आणि ओज अधर्मापुढे निरुपयोगी ठरावं, ही एक शोकांतिका आहे. जे भूतकाळात घडलं ते वर्तमानकाळातही घडत आहे. दु:शासन आणि दुर्योधन केवळ कालच होते असे नसून, ते आजही जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात श्रेष्ठ मूल्यांचं बिनदिक्कत वस्त्रहरण करीत आहेत. दृष्टिहीन धृतराष्ट्राप्रमाणे

विचारवंतही अशा परिस्थितीकडे पाहू शकत नाहीत. धृतराष्ट्रच जेव्हा सत्ताधीश असतो, तेव्हा दुर्योधनाचे आणि दु:शासनाचे अन्याय वाढत जातात. आचार्य मंडळींचे मौन प्रत्यक्ष अन्यायाहून अधिक अन्यायी ठरतं. पण ही परिस्थिती निमूटपणानं सहन करावी लागणं, हे माणसाच्या सभ्यतेला आणि सहनशीलतेला एक आव्हान आहे. या भयानक अंधारात कुणाचातरी तेजस्वी स्वर ज्वालेसारखा उफाळून उठावा आणि त्यानं अंधार जाळून टाकावा, असं मनात येतं. राजेशाहीचं युग संपून गेलं. लोकशाहीच्या प्रगत युगात द्रौपदीचं आक्रंदन खरं तर कानावर पडू नये. पण आजही शोषण व लाचारी यांचं दर्शन नित्य घडावं, हा ज्ञानाचा, धर्माचा आणि संस्कृतीचा पराभव आहे. कालचं युग द्रौपदीच्या प्रश्नाचं उत्तर देऊ शकलं नाही. आजच्या शास्त्रनिष्ठ जगातही तिच्या प्रश्नाला उत्तर मिळत नाही.

पण कित्येक शतकांपूर्वीची गोष्ट. अथेन्स नगरीच्या चौकात उभा राहून सॉक्रेटिस तरुणांना प्रबोधित करायचा. देशातील युवाशक्ती जागृत केल्याच्या अपराधावरून त्याला सत्ताधीशांनी देहांताची शिक्षा ठोठावली. त्याच्या हाती विषाचा प्याला देण्यात आला. तो ओठाला लावण्यापूर्वी दृढनिश्चयी स्वरात हा आचार्य गरजला. "हे विष माझा प्राण घेऊ शकेल; पण सत्याचा प्राण घेण्याची हिंमत जगातल्या कोणत्याही विषात नसते, हे लक्षात ठेवा. सत्य अमर आहे." असे ज्ञानी आचार्य द्रौपदीला अभिप्रेत होते. असे आचार्य निर्माण करण्याइतकी भारतीय समाजाची कूस जेव्हा सशक्त बनेल, तेव्हा द्रौपदीच्या त्या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर मिळू शकेल.

संपत्तीचे मिंधे झालेले आचार्य महाभारतातच होते असं नव्हे तर आज ते साऱ्याच देशात आहेत. सत्याचा शब्द उच्चारण्यापेक्षा सत्ताधीशाचा शब्द मस्तकावर धारण करणारे ओशाळे आचार्य आजही दृष्टीला पडतात. अन्यायाचं समर्थन करणारं पांडित्य आणि लांगूलचालन करणारे पंडित जोपर्यंत आहेत तोपर्यंत द्रौपदीच्या प्रश्नाला उत्तर मिळणार नाही. क्वचित एखादा रामशास्त्री भेटतो. बाकीचे सारे शेपटी हलवण्यात वाकबगार असतात हे सत्य द्रौपदीला समजलं.

●●●

# सारेच दीप मंदावले आता...

जॉर्ज बर्नार्ड शॉ या युरोपीय लेखकाची अनेक विधाने बाह्यत: चमत्कृतिपूर्ण आणि विनोदी वाटतात. त्याच्या मतामागे एक प्रकारचा विक्षिप्तपणा आहे असं वाटतं. पण त्याच्या विचारात सत्य आहे, हेही जाणवत राहतं. लोकशाहीसंबंधी तो म्हणतो, 'लोकशाहीची निवडणूक म्हणजे बहुसंख्य नालायक लोकांनी निवडून दिलेले अल्पसंख्य भ्रष्टाचारी लोक.' हे विधान विनोद निर्माण करतं. त्याबद्दल तो आणखी खोचकपणानं म्हणतो, 'विनोद करण्याची माझी पद्धत म्हणजे सत्यकथन करणे. जगात याच्यासारखा विनोदाचा श्रेष्ठ प्रकार नाही.' शॉच्या अभिव्यक्तीत वक्रता, उपरोधिकता पुष्कळ असल्यामुळे त्याची विधानं लक्षवेधक असतात. लोकशाहीच्या निवडणुकीत भ्रष्टाचारी माणसं सहजपणानं निवडून येतात आणि ती उच्चासनावर जाऊन बसतात, हे दृश्य अनेक देशांत दिसू शकतं. भ्रष्ट चारित्र्याची, गुन्हेगारी प्रवृत्तीची गुंड माणसं लोकशाहीच्या प्रक्रियेतून सत्तास्थानं काबीज करतात. हा खरं तर लोकशाहीचा आणि लोकांचा दयनीय पराभव आहे. गुंडगिरीच्या वाटेनं प्रगती करणारे हे असंस्कृत लोक बहुसंख्य लोकांच्या मतांवर कसे निवडून येतात, याचंच आश्चर्य वाटतं.

स्वातंत्र्यपूर्व काळातला ज्वलंत ध्येयवाद आणि उत्कट देशभक्ती आता केवळ इतिहासाच्या पानातच वाचायला मिळते. पण गेल्या काही वर्षांत राजकारण आणि समाजकारण यांतली आदर्श मूल्यं भराभर कोसळून पडली. ती सावरण्यासाठी समर्थ हात उत्पन्नच झाले नाहीत. सत्तेच्या राजकारणापासून सुजन वृत्तीच्या लोकांनी काढता पाय घेतला. काही विचारी लोक म्हणाले, 'तात्पुरती तडजोड म्हणून काही प्रमाणात गुंडगिरीचं सहकार्य घेऊन लोकशाहीची पताका आपण फडकवत ठेवू. हे राजकारण आहे. ते सर्वस्वी सोज्वळ असणं शक्य नाही.' पण ही तडजोड करताना तत्त्वांचा बळी घ्यावा लागला, अनेक अपप्रवृत्ती जीवनात स्थिर झाल्या; नव्हे त्या प्रतिष्ठित होऊन बसल्या. आता गांधीजींना अभिप्रेत असलेलं 'रामराज्य' त्यांच्याबरोबरच अंतर्धान पावलं. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराचं तण माजलेलं दिसत आहे.

निवडणुकीसाठी उभा असलेला एक उमेदवार अनेक वंदनीय देशभक्तांची

आणि क्रांतिकारकांची नावं गहिवरल्या आवाजात उच्चारून सभेत टाळ्या मिळवीत होता. कदाचित टाळ्या वाजविण्यासाठी त्या धूर्त उमेदवारानं शेकडो माणसं भाड्यानं घेतली असावीत. 'आम्हाला लोकांचं राज्य आणायचं आहे. सामान्य माणूस या देशाचा मालक बनला पाहिजे, हे महात्म्यांचं स्वप्न आम्ही साकार करणार आहोत.' पुन्हा टाळ्यांचा प्रचंड निनाद. उमेदवाराची गुंडगिरीची पार्श्वभूमी सर्वांना माहीत होती. पण तरीही त्याच्याच पारड्यात प्रचंड मतं पडतील अशी चोख व्यवस्था त्यानं करून ठेवली होती.

सहज मनात विचार येतो, याच लोकशाहीसाठी अनेक स्वातंत्र्यवीरांनी स्वातंत्र्याच्या पेटलेल्या होमकुंडात आपली आहुती दिली काय ? असंख्य लोकांनी यासाठीच आपलं रक्त सांडलं काय ? रक्त, अश्रू, घाम, अनिवार कष्ट, जीवनाचं बलिदान यांतून उगवलेल्या स्वातंत्र्याकडे, लोकशाहीकडे आज उघड्या डोळ्यांनी पाहवत नाही. शॉसारखा लेखक एक जळजळीत सत्य आपल्या खोचक शैलीतून सांगतो आणि आपल्या मनातला उद्वेग प्रकट करतो. निवडणुका येतात व जातात. भ्रष्टाचाराची मुळं लोकमनात खोलवर रुजतात. अनेक देशभक्तांची स्वप्नं वांझ झाली. सावरकर-कुसुमाग्रजांच्या कवितांतले धगधगीत शब्द आता विझत चालले. सारेच दीप मंदावत चालले. क्षीण झालेल्या ज्योती राष्ट्रीय अभिमानानं आणि लोकसेवेच्या वृत्तीनं केव्हा पेटणार ? याचं उत्तर देणारं समर्थ व्यक्तिमत्त्व उदयाला यावं यापलीकडे काय म्हणणार ? लोकांचीही कमाल आहे. लोक सारंच चालवून घेतात.

एकेक दिवा विझत आहे. कवी अनिलांच्या शब्दांत सांगायचं तर

**सारेच दीप मंदावले आता,**
**ज्योती विझू विझू झाल्या.**

झड घालून पतंगानं प्राण घ्यावा अशी ज्योत आता उरली नाही. काही मिणमिणणाऱ्या ज्योती विझल्यानंतर अंधार अटळ आहे. अशावेळी आपल्या अंतरीचा दिवा अटीतटीनं तेवत ठेवल्याशिवाय गत्यंतर नाही. बाहेरच्या अंधाराला हा आंतरिक प्रकाश भेदू शकेल.

●●●

# गुलामांचा गुलाम

'सत्ता, संपत्ती, तारुण्य आणि अविचार यांपैकी कोणताही एक घटक माणसाला विनाशाकडे ओढून नेऊ शकतो; पण हे चारही घटक एकत्र आल्यावर सर्वनाशाशिवाय दुसरा कोणता परिणाम होणार ?' या आशयाचं एक संस्कृत सुभाषित आहे. सुभाषितांतून जीवनाचा अनुभव संक्षेपानं पण शहाणपणानं व्यक्त केलेला असतो. अशी सुभाषितं मार्गदर्शक असतात. पण प्रत्येक सुभाषित पूर्ण सत्य सांगतं, असं मात्र नाही. सत्याचा काही अंश त्यातून निश्चितपणे प्रकट होतो. सत्ता आणि संपत्ती माणसाला पुष्कळ वेळा भ्रष्टतेकडे ओढून नेतात, हा अनुभव आहे. उपदेशाचे शब्द सत्तांध व्यक्तीला रुचत नाहीत. त्यातून तारुण्य आणि अज्ञान यांचा प्रभाव असेल तर तो सत्ताधीश किंवा धनिक उपदेश करणाऱ्या जवळच्या नि:स्वार्थ मित्रालाही म्हणेल, "मी माझ्या कर्तृत्वानं साऱ्या गोष्टी मिळविल्या आहेत. मी काय करावं आणि काय करू नये हे सांगण्याचा तुम्हाला काय अधिकार ? माझ्या बळकट पायांवर मी उभा आहे. तुमच्या आधाराची जरूर नाही. शब्दाचं शहाणपण मला शिकवू नका. हे मी जे मिळविलं ते माझ्या ज्ञानाचं आणि सामर्थ्याचं फळ आहे."

आता या निष्फळ युक्तिवादावर काय बोलणार ? सत्ता आणि संपत्तीची डोक्यात गेलेली नशा लवकर उतरत नाही. जेव्हा ती उतरते, तेव्हा त्या व्यक्तीचं संपूर्ण जीवन उद्ध्वस्त झालेलं असतं. यौवन, धनसंपदा आणि अधिकारपद या गोष्टी मूलत: त्याज्य किंवा अनैतिक नाहीत. साधुसंतांनी या घटकांविषयी कित्येक ठिकाणी प्रतिकूल उद्गार काढले आहेत; पण त्यामागे त्यांचा हेतू निंदेचा नाही. सत्तेचा काय किंवा संपत्तीचा काय अथवा तारुण्यांचा काय उन्माद चढला की विचारशक्ती बधिर होते. रोजच्या जीवनात त्याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. सत्ता आणि संपत्तीभोवती अनेक दुष्ट प्रवृत्तीचे फुत्कार टाकणारे भुजंग जमा होतात. तारुण्याचा उन्मादही माणसाची पावलं वेड्यावाकड्या दिशेला वळवायला कारण होतो. यासाठीच संयमानं आणि विचारशीलतेनं जगावं, असा संदेश सर्वच धर्मांनी दिला आहे. पण सध्याच्या भोगवादी उन्मत्त वातावरणात संयम आणि सुविचार हे दोन घटक दुर्मिळ झाले आहेत. संत तुकोबांनी कितीही उत्कट वाणीनं 'जोडोनिया धन

उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी' म्हटलं असलं तरी प्रवचन-कीर्तनातच हा अभंग सांगायला सोईचा आहे, या पलीकडे जाऊन तो जीवनात उतरविण्याचा कोण प्रयत्न करतो ? तुकोबांचा विठ्ठल त्यांच्या हृदयात होता. व्यवहारी जगाचा विठ्ठल सत्ता आणि संपत्ती यांतच सामावलेला आहे. उत्तम व्यवहार करून धन आणि अधिकार कधीच मिळत नाही, हा धडा शाळकरी मुलांनासुद्धा पाठ आहे. धनाचा आणि धर्माचा, सत्तेचा आणि नीतीचा, तारुण्याचा आणि संयमाचा संबंध असावा, हे मत आता इतिहासजमा होऊन गेलं. जे मिळवायचं ते कसंही आणि कोणत्याही उपायांनी पदरात पाडून घ्यावं, हाच आजचा सुविचार होऊन बसला आहे, पण याचे भयानक दुष्परिणाम सर्वांच्याच जीवनावर होत आहेत.

जगज्जेता सिकंदरानं घातलेला दंडक असा होता, की त्याच्या दरबारात येणाऱ्या प्रत्येकानं त्याच्यासमोर खाली वाकून त्याच्या झग्याचं चुंबन घ्यावं. प्रत्येकानं आपली मान आणि कंबर खाली झुकविली पाहिजे. विशी-बावीशीतल्या या सम्राटासमोर कवी, विचारवंत आणि पंडितही निरुपायानं अवनत होत असत. एकदा एक साधू ताठपणानं त्याच्यासमोर उभा राहिला. राजसेवकानं त्याला दरबारी नियम समजावून सांगितला, तेव्हा तो साधू मोठमोठ्यानं हसून म्हणाला, ''काय म्हणता, सिकंदर सम्राट आहे ? तो तर माझ्या गुलामांचा गुलाम आहे; त्याला मी कसं अभिवादन करणार ?'' संतप्त झालेल्या सिकंदराला साधूनं शांत स्वरात सांगितलं, ''अहंकार, क्रोध, काम, लोभ या विकारांवर विजय मिळवून मी त्यांना माझे गुलाम बनविले आहे. तुझ्या ठिकाणी हे सारे विकार प्रबल आहेत, त्यांच्या तालावर तू नाचतोस. ज्याला हे सारे विकार जिंकता येत नाहीत, तो सम्राट होऊ शकत नाही. मी जिंकलेल्या गुलामांची तू गलामगिरी करतोस, तुला मी नमस्कार करणार नाही. वाटल्यास माझं मस्तक तू उडवू शकतोस; पण माझ्यावर तू स्वामित्व गाजवू शकत नाहीस.'' एका भारतीय साधूच्या निर्भय आणि निःस्पृह, प्रामाणिक उद्‌गारांसमोर सिकंदर अवाक् झाला. त्यानं आपली मान खाली घातली.

●●●

# तेथे कैंचा पांडुरंग ?

एक उच्चविद्याविभूषित गृहस्थ एका तथाकथित आचार्यांच्या संदर्भात भक्तिभावनेनं बोलत होते. त्यांचं दर्शन म्हणजे साक्षात ईश्वरी साक्षात्कार आहे, असं त्यांचं म्हणणं होतं. हे गृहस्थ तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांचे अभ्यासक होते. महाराजांच्या व्यक्तित्वानं ते अंतर्बाह्य भारून गेले होते. केवळ हस्तस्पर्शानं आपले महाराज असाध्य रोगाचंही निवारण करू शकतात आणि मृतालाही जीवन देऊ शकतात, असं विधान त्यांनी केलं. मी त्यांना विचारलं, 'असं एखादं उदाहरण आहे काय ? ते म्हणाले, 'मृताला जीवन देणं हे महाराजांना सहज करता येईल; पण विश्वचक्राच्या गतीत व्यत्यय येईल, असं आपण काही करणं इष्ट नव्हे, ही त्यांची भूमिका आहे.' हे ऐकूनच महाराजांच्या दैवी सामर्थ्याची कल्पना येते. त्या सद्‌गृहस्थांना समजावून सांगण्याचा मी व्यर्थ प्रयत्न केला.अखेर त्यांना त्यांच्या अज्ञानवलयातच सुखी राहू द्यावं, या विचारानं मी आणखी युक्तिवाद केले नाहीत. भर्तृहरीच्या एका प्रसिद्ध श्लोकाची मला आठवण झाली. त्या श्लोकाचा भावार्थ असा. पुष्कळ प्रयत्न केला तर एक वेळ वाळूचे कण रगडून त्यातून तेल काढता येईल. मृगजळातलं पाणी पिऊन माणसाला आपली तहान भागवता येईल, रानावनात खूप भटकलो तर एक वेळ सशाचं शिंगसुद्धा सापडेल; पण अज्ञानी आणि हटवादी माणसाची समजूत घालता येणार नाही.

स्वत:ला ते महाराज 'प्रज्ञाभूषण' म्हणवून घेत होते. त्यांच्या प्रवचनाला श्रोते गर्दी करीत होते, यात शंका नाही. महाराजांचं व्यक्तिमत्त्वही दर्शनीय होतं. भगव्या रंगाच्या तलम वस्त्रात लपेटलेला त्यांचा देह बांधेसूद होता. वातानुकूलित भव्य सभागृहात मखमली गादीवर बसून ते बोलत असत. गळ्यात मोत्यांच्या माळा आणि ताज्या फुलांचा हार. हाताच्या बोटांत चार सोन्याच्या अंगठ्या, समोरच्या भक्तगणात राज्याचे मंत्री, अधिकारी, कारखानदार, उद्योगपती यांची संख्या अधिक. आत्मा आणि परमात्मा हे शब्द आपल्या प्रवचनातून ते अनेक वेळा पेरायचे. कुणीतरी त्यांना आत्म्यासंबंधी प्रश्न विचारला, तेव्हा त्यांच्या कपाळावर आठी उमटली. ते म्हणाले, 'माझ्या आत्मचिंतनात व्यत्यय आणू नका. ध्यान देऊन माझे शब्द ऐका. तुम्हाला

आत्मदर्शन होईल. आत्म्याचा शोध सोपा नसतो.' पुन्हा त्यांना कोणी प्रश्न विचारला नाही. कारण सर्वांचं समाधान झालं होतं. महाराजांच्या आशीर्वादानं निवडणुकीचं तिकीट मिळतं, मंत्री होता येतं, उद्योगधंद्यात उत्कर्ष होतो, अशी दृढ श्रद्धा भक्तांच्या मनात रुजलेली होती किंवा रुजवण्यात आली होती. महाराज हे परमेश्वरी शक्तीचे धारक आहेत, हा समज सर्वत्र पसरलेला होता.

हे कल्पनारंजित चित्र नव्हे. या चित्रातला प्रत्येक रंग आणि प्रत्येक रेषा वास्तव आहे. अज्ञान आणि अंधश्रद्धा यांची चिवट मुळं लोकमनात खोलवर गेलेली असतात. त्यामुळे या चित्रातले रंग लवकर फिकट होतील, असं मानायला आधार नाही. या अंधश्रद्धेची कारणीमांसा कशी करायची, हा एक अवघड प्रश्न आहे. प्रत्येक माणसाच्या मनात आपल्या भवितव्यासंबंधी एक प्रकारची भीती दडलेली असते. शास्त्रज्ञान कितीही प्रगत झालं तरी ते आपलं रक्षण करू शकेल हा विश्वास माणसाला वाटत नाही. अनिश्चिततेची तलवार त्याच्या मस्तकावर टांगलेली आहे. काही तरी घडून आपल्या हातातलं सत्तेचं पद निसटून जाऊ नये किंवा आपण गोळा केलेली संपत्ती शासनानं अथवा एखाद्या अन्य घटकानं काढून नेऊ नये म्हणून अशा एखाद्या 'प्रज्ञाभूषण संता'चा मानसिक आधार या लोकांना हवा असतो. सत्ता, संपत्ती आणि आपलं जीवन काहीच सुरक्षित नाही, या भयानं कोणता तरी आधार मिळण्यासाठी बहुसंख्य लोक धडपडत असतात. त्यांनी दिलेला अंगारा, अंगठी किंवा माळ आपलं संरक्षण करील, ही श्रद्धा लोकांच्या मनात स्थिर होते. तिचं विश्लेषण करणं म्हणजे महाराजांबद्दल अविश्वास दाखवणं आहे, असंही त्यांना वाटतं. जोपर्यंत अज्ञान आहे आणि जोपर्यंत विचारशून्य श्रद्धेची भक्कम जोड त्याला मिळत आहे, तोपर्यंत अध्यात्माच्या नावाखाली चाललेला व्यापार कधी उताराला लागेल, असं वाटत नाही. बुद्धीला कौल लावण्यापेक्षा महाराजांच्या पायावर डोकं ठेवणं अधिक सोपं आणि सुरक्षित आहे, ही जाणीव समाजमनातून कशी उखडून टाकायची, हा एक यक्षप्रश्न आहे.

**तुका म्हणे अवघे सोंग । तेथे कैंचा पांडुरंग ।।**

●●●

# शब्द

शब्द ही एक विलक्षण शक्ती आहे. शब्दांच्या माध्यमातूनच आपलं सुख-दु:ख, आशा-निराशा मनुष्य प्रकट करू शकतो. मायेचा शब्द ऐकला की तान्हं मूलदेखील आनंदित होतं. शब्दांचा आधार आहे म्हणून जीवनात प्रकाश आहे. म्हणूनच संत तुकारामांनी म्हटलं आहे, 'शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्दे वाटू धन जनलोकां।' शब्द नावाच्या दैवताची शब्दांनीच पूजा करू असं ते म्हणतात. शब्द हे साहित्याचंच केवळ मूलद्रव्य नव्हे. जन्म घेणाऱ्या बालकापासून जीवनाचा निरोप घेणाऱ्या वृद्धापर्यंत साऱ्यांनाच शब्द सोबत करीत असतात. आपले शब्द सुंदर, अर्थपूर्ण, भावस्पर्शी असावेत असं प्रत्येक कवीला वाटतं. शब्दातलं नावीन्य आणि ताजं टवटवीत तारुण्य वाचकांचं मन उत्साहित करतं. ज्ञानेश्वरांनी आपली शब्दविषयक आकांक्षा स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, 'शब्द हा केवळ श्रवणाचा विषय आहे. पण मी असे शब्द लिहीन, की डोळे म्हणतील आम्हाला त्यांचं रूप पाहू द्या. नाक म्हणेल मला त्यांचा सुगंध घेऊ द्या. रसना म्हणेल मला शब्दांचा रस चाखू द्या. कानाला त्यांचा नाद ओढून घेईल. सर्वांग म्हणेल, शब्दांची स्पर्शकोमलता अनुभवू द्या. शब्द एकच; पण त्याच्यासाठी इंद्रियांत भांडण लागेल. पण माझे शब्द एकाच वेळी सर्व इंद्रियांना प्रसन्न करतील.' ज्ञानेश्वरांचा हा प्रचंड आत्मप्रत्यय सार्थ आहे. वक्ता, लेखक आणि कवी, लोकांना प्रबोधित करणारे विचारवंत या साऱ्यांनाच शब्दांची उपासना करावी लागते. सामान्य माणसालाही शब्दांच्या बळावरच उभं राहावं लागतं.

शब्द तरी किती प्रकारचे असतात! फुलवणारे शब्द, पेटवणारे आणि उद्ध्वस्त करणारे शब्द, शीतल शामक आणि आक्रमक शब्द, भक्तीचे आणि शक्तीचे शब्द. इतिहास घडवणारे शब्द. ओंगळ मनाची दुर्गंधी घेऊन आलेले किळसवाणे शब्द, जोडणारे आणि तोडणारे शब्द. जसे माणसाचे भाव, तसे त्याचे शब्द प्रकट होतात. शब्द खरेही असतात आणि बऱ्याच वेळा दिखाऊ प्रेमाचे मुखवटे घेऊन निर्माण होतात. 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम्' ओठावर मधाळपणा पण पोटात मात्र विष, असेही नाटकी धूर्त शब्द पुष्कळ भेटतात. शब्दाचं उद्यानही असतं आणि त्यांचा बाजारही भरतो. एक राष्ट्रप्रमुख आपल्याविषयी नेहमी शत्रुभाव ठेवणाऱ्या

दुसऱ्या राष्ट्रप्रमुखाला म्हणतो, 'मी माझ्या राष्ट्राच्या आणि माझ्या शुभेच्छा आपल्याला प्रेमानं देण्यासाठी इथं आलो आहे.' दुसरा प्रमुख त्याच्याशी हस्तांदोलन करीत म्हणतो, 'दोन देशांतली मैत्री आणि प्रेम दृढ करण्यासाठी मी उत्सुक आहे. माझ्या जनतेच्या सदिच्छा आपल्याला अर्पण करतो.' या शब्दांचा अद्यापी रंग उडालेला नसतो, तोच बॉम्बस्फोटाचे आवाज देशात कुठेतरी उमटतात. निरपराध माणसांच्या किंकाळ्या, सूडाचे शब्द हे सारं दुष्टचक्र सुरू होतं. मुत्सद्दी राजकारण्यांचे शब्द पुष्कळ वेळा आपले विचार लपविण्यासाठी उच्चारले जातात. पण खऱ्या प्रेमाच्या शब्दात मानसिक शांती देण्याचं सामर्थ्य असतं. वेदनांनी तळमळणाऱ्या एका रुग्णाला इंजेक्शन देऊनसुद्धा झोप येत नव्हती. तो सारखा कण्हत होता. पण त्याच्या म्हाताऱ्या आईनं आपला अशक्त सुरकुतलेला हात त्याच्या अंगावरून फिरवीत त्याला म्हटलं, 'बाळ, शांत झोप. आता तुझ्यावरचं गंडांतर टळलं आहे. उद्या सकाळपर्यंत तुझं सगळं दुखणं पळून जाईल. शांत झोप. तो परमेश्वर तुझं कल्याण करील.' आपल्या कापऱ्या थकलेल्या आवाजात तिनं एक अभंग उत्कटपणानं म्हटला. तळमळणारा तो रुग्ण गाढ झोपी गेला. माणसाच्या शब्दांत जेव्हा त्याच्या प्रेमभावनेचं स्वच्छ चांदणं पडलेलं असतं तेव्हा ते शब्द सुंदर होतात. शुभंकर होतात. शब्दांचा प्रभाव माणसाच्या स्वभावावर अवलंबून असतो. संतांची वाणी दु:खीकष्टी मनाला नवी उभारी देते ती तिच्यातल्या निखळ प्रेमभावनेनं. कित्येक लेखक-कवींची पायांत पैंजण घातलेली, अंगभर दागिन्यांनी मढलेली भरजरी भाषा थोडा वेळ भुलवते, पण हृदयाला भिडत नाही. पण ग्यानबा-तुकारामाची, नामाजनीची आणि चोखोबा सावतोबाची भाषा पिढ्यानूपिढ्या माणसांना प्रेमानं भेटते. या भाषेतले शब्द कधी शिळे होत नाहीत. शब्दांचं उच्चारण जीभ करीत असली तरी त्या शब्दांची रचना करणारं प्रेमरसायन माणसाच्या अंत:करणात तयार व्हावं लागतं. शब्दांनी शांतीही होते आणि क्रांतीही होते. सृजनाची हिरवी शक्ती त्यांच्यात असते. विध्वंसाची दाहकताही असते. आजच्या जगाला शांती देणारे आणि माणसाचं मन निरामय बनवणारे शब्द हवे आहेत. आग ओकणारे, माणुसकी पेटवणारे शब्द आज पावलोपावली भेटतात. मनाला सुगंधी बनवणारे शीतल शब्द जगाच्या बाजारात कुठंही मिळत नाहीत. ही आजच्या जगाची शोकांतिका आहे. शब्दाला ब्रह्म म्हणण्यात जे औचित्य आहे, ते अनुभवाला यावं हे सांगण्यासाठी हे थोडे शब्द !

●●●

# माणसाचा धर्म

गावात पेटलेल्या जातीय दंगलीत गंभीररित्या जखमी झालेल्या एका तरुणावर तातडीनं शस्त्रक्रिया करणं आवश्यक होतं. रक्तस्राव बराच झाला होता. शरीरावर अनेक जखमा झालेला तो तरुण मरणाच्या दारात उभा होता. डॉक्टर शस्त्रक्रियेसाठी तयार होत होते. कुणीतरी त्यांना फोन केला. फोनवरील संभाषणात वेळ घालवण्यापेक्षा त्या तरुणावर त्वरेनं उपचार करणं अगत्याचं होतं. तरीही का कुणास ठाऊक, त्यांनी फोन कानाशी लावला. एक उद्धट, रानटी आवाज बोलत होता.

'तुमच्या हॉस्पिटलात आताच दाखल केलेल्या त्या तरुण गुंडाला मरू द्या. त्याला जगवण्याचा प्रयत्न करू नका. पेटलेल्या दंगलीत दोन-चार ठिकाणी चिथावणी देऊन त्यानं आगी लावल्या. एक धार्मिक ठिकाण त्यानं उद्‌ध्वस्त केलं. धर्माची विटंबना करणारा तो गुंड जर जगला, तर आम्ही तुम्हाला जगू देणार नाही. तुमचं हॉस्पिटल जाळून टाकू.' फोन बंद झाला. डॉक्टरांच्या मुद्रेवर क्षणभर भयाची आणि चिंतेची एक रेषा उमटली; पण दुसऱ्याच क्षणी त्यांनी स्वतःला सावरलं. मृत्यूची घटका मोजत पडलेल्या त्या बेशुद्ध तरुणाला त्यांनी टेबलावर घेतलं आणि ते एकाग्र मनानं त्याच्यावर शस्त्रक्रिया करू लागले. हॉस्पिटलच्या आवारात दंगल सुरू झाल्याचं त्यांना समजलं. खिडक्यांच्या काचा फुटत होत्या. पेटत्या कापडांचे बोळे टाकले जात होते. किंकाळ्या ऐकू येत होत्या; पण क्षणार्धही डॉक्टरांचा हात थरथरला नाही. त्यांचे लक्ष विचलित झालं नाही. रक्तबंबाळ अवस्थेत दाखल झालेल्या त्या तरुणाला जीवनदान देणं, इतकंच त्यांचं उद्दिष्ट होतं. दहा-पंधरा मिनिटांत हॉस्पिटलच्या आवारातला दंगा शांत झाला. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. कपाळावरचा घाम पुसत डॉक्टर ऑपरेशन थिएटरबाहेर आले, तेव्हा तो फोनवर बोलणारा आडदांड माणूस त्यांना भेटला.

'आज थोडी झलक दाखवली. हे हॉस्पिटल जळताना तुला पाहावं लागेल.' एक लहानशी स्मितरेषा डॉक्टरांच्या चेहऱ्यावर उमटली.

आपली भूमिका स्पष्ट करताना डॉक्टर आपल्या मित्राला म्हणाले, 'गुंडांच्या धमक्यांनी माझं मन बदलत नाही. ज्या तरुणावर ती शस्त्रक्रिया केली, तो एक धर्मांध

प्रवृत्तीचा अट्टल गुंड आहे, याची मला कल्पना होती. या खुनी इसमाला उपचाराशिवाय मरू द्यावं, हा विचार माझ्या मनात चमकून गेला. त्याच्या अत्याचाराच्या कथा मी ऐकलेल्या आहेत. त्याचं जगणं हेच इतरांच्या जीवनाला आव्हान आहे, हे मला कळत होतं. त्याचे रानटी विचार आणि हिंसक कृती यांना पूर्णविराम देणं माझ्या हातात होतं; पण मी तसं केलं नाही. एखादी ज्योत फुंकर घालून मालवता येते; पण ती पुन्हा प्रज्वलित करण्याचं सामर्थ्य नसेल तर ती नाहीशी करण्याचा आपल्याला अधिकार आहे का ? मी त्याच्यावर उपचार केले नसते, तर तो एखाद्या तासात मृत्युमुखी पडला असता. त्याच्यावर उपचार न करणं हा विश्वासघाताचा मार्ग मी स्वीकारला असता, तर त्याच्यात आणि माझ्यात काहीच फरक नाही, ही टोचणी मला जन्मभर सहन करावी लागली असती. डॉक्टरकडे येणाऱ्या रुग्णाला जात नसते, संप्रदाय नसतो. त्याच्या विचाराशी डॉक्टरला कर्तव्य नसतं. मी केवळ डॉक्टर या नात्यानं त्याच्याकडं पाहिलं आणि माझं कर्तव्य केलं.'

डॉक्टरांचे हे विचार तर्कशुद्ध होते. समर्थनीय होते. सुजन येवो की दुर्जन येवो, त्याच्या वेदना समजून घेणं आणि त्याला आत्मीयतेनं दुःखमुक्त करणं, हाच डॉक्टर-वैद्याचा गुणधर्म आहे. एका भव्य हॉस्पिटलमध्ये मोठ्या फलकावर ठळक अक्षरांत एक सुभाषित कोरलं होतं. 'मी तुमची जात विचारणार नाही. तुमच्या धर्माबद्दलही अवाक्षर विचारणार नाही. तुमच्या राजकीय मतसरणीशी मला कर्तव्य नाही. फक्त तुमची दुःखवेदना काय आहे ती मला सांगा.' केवळ दुःखाची माहिती करून घेणं आणि रुग्णाला दुःखमुक्त करणं हाच 'आनंदधर्म' आहे, असं आश्वासन तो फलक देत होता. एका रुग्णानं तो फलक पाहून प्रसन्नपणानं म्हटलं, 'हे सुभाषित वाचूनच माझा अर्धा रोग नाहीसा झाला. प्रेमाची आणि करुणेची अक्षरं हेच जगातल्या अनेक दुःखावरचं औषध आहे. दुःखानं व्याकूळ झालेल्या मुद्रेवर आनंदाचं चांदणं फुलवणं, हाच जगातला सर्वश्रेष्ठ धर्म आहे. त्या धर्माला नाव-गाव नाही. जात आणि पंथ नाही. कोणतेही भेद त्याला बांधू शकत नाहीत. त्याला नावच द्यायचं असेल तर 'माणसाचा धर्म' असं त्याला संबोधावं लागेल.

●●●

# कलावंताचा आनंद

मराठी रंगभूमीच्या वैभवाचं एक उत्तुंग शिखर म्हणून बालगंधर्वांचा उल्लेख केला जातो तो यथार्थच आहे. या कलावंतानं आपल्या प्रतिभेच्या साऱ्या शक्तींचा सुंदर आविष्कार रंगभूमीवर केला. सुस्वर आणि सौंदर्य ही त्यांची सामर्थ्यं होती. कलेवर त्यांची प्राणांतिक निष्ठा होती. सन १९११ मधील घटना. 'मानापमान' नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईच्या रिपन थिएटरमध्ये ठरला. नाट्यप्रयोगाच्या तीन-चार दिवस आधीच सर्व तिकिटं विकली गेली, पण प्रयोग होण्याच्या आधल्या रात्री बालगंधर्वांची एकुलती एक लाडकी कन्या आकस्मिकपणे मरण पावली. बालगंधर्व त्या दु:खानं कोसळले. 'मानापमानाचा' प्रयोग रहित करावा असा निर्णय काही लोकांनी घेतला. पण बालगंधर्वांनी या निर्णयाला संमती दिली नाही. ते म्हणाले, 'नाटक बंद ठेवू नका. ते झालंच पाहिजे. माझ्या वैयक्तिक दु:खासाठी हजारो रसिकांचं सुख हिरावून घेणं मला प्रशस्त वाटत नाही. नाटक झालंच पाहिजे.' बागंधर्वांच्या या निर्धारामुळं इतरांचा निरुपाय झाला. कन्यावियोगाच्या दु:खात असताना या कलावंतानं हा प्रयोग करू नये असं हितचिंतकांना वाटत होतं. पण नाटकाचा तो पहिलाच प्रयोग विलक्षण यशस्वी झाला. व्यक्तिगत दु:ख बाजूला ठेवून बालगंधर्वांनी भामिनीची भूमिका अत्यंत तन्मयतेनं रंगवली. आपल्या हृदयातील कारुण्य लपवून शृंगाररसाची ही भूमिका त्यांनी कलात्मक समरसतेनं साकार केली. दु:खी मन:स्थितीत असताना हसरी खेळकर भामिनी आपल्या अभिनयातून आणि गायनातून समूर्त करण्याचा एक सुंदर चमत्कार बालगंधर्वांनी केला होता. कुणीतरी त्यांना विचारलं, 'मनाच्या अशा अवस्थेत हे कसं शक्य झालं ?' बालगंधर्वांनी उत्तर दिलं, 'रंगभूमीवर मी भामिनी होतो. कन्येचा बाप नव्हतो. माझ्यातली भामिनी बोलत होती. गात होती. आता प्रयोग संपला. आता मी पुन्हा दु:ख़ी बाप झालो आहे.' त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. दु:खी बाप रडत होता. पण त्याच्यातल्या कलावंतानं नाटक रंगवलं होतं.

कलावंतालाही अनेक व्यक्तिगत दु:खवेदना असतात. एका व्हायोलिनवादकाच्या पोटात एक असाध्य रोग वाढत होता. त्याच्या वेदना त्याला व्याकूळ करीत असत. पण एखाद्या गायकाच्या मैफलीत तो वाजवायला बसला की

त्या वेदनांचं त्याला भान राहायचं नाही. व्हायोलिनमधून निघणाऱ्या स्वरावलीनं तो अंतर्बाह्य मोहरून निघायचा. स्वरसौंदर्य हेच सत्य. बाकीच्या साऱ्या गोष्टी केवळ आभासात्मक आहेत. असं त्याला वाटायचं. गाण्याच्या बैठकीत असला म्हणजे तो पूर्णपणे त्या रसरंगात बुडून जायचा. पण गाणं संपलं की त्याचं दुखणं त्याला अगतिक करायचं. याचा अर्थ आपली कला, तिची अभिव्यक्ती हेच त्याचं जीवन होतं. कलेची एक विलक्षण, अदम्य अशी नशा असते. एखादा लेखक तास न् तास लेखनसमाधीत मग्न होऊन जातो तेव्हा आजूबाजूच्या सामान्य व्यवहाराचं त्याला भानही राहत नाही. कलानिर्मितीचे अत्युच्च आनंदाचे क्षण अशा समरसतेतूनच त्यांच्या पदरात पडतात. हीच कलेची फलश्रुती असते. एखादा शिल्पकार आपल्या ध्यानामनातली अतिसुंदर मूर्ती पाषाणात खोदण्यासाठी रात्रंदिवस धडपडत असतो तेव्हा त्याच्या सर्व मानसिक शक्ती एकत्रित होऊन त्या पाषाणावर कार्य करीत असतात. आपल्याला अभिप्रेत असलेला आकार ती निर्जीव शिला घेत आहे, हे पाहताना त्या कलावंताला जन्माचं सार्थक झाल्याचा आनंद मिळतो. कितीही संपत्ती ओतली तरी हा साक्षात्कारी क्षण जगातल्या कोणत्याही कुबेराला विकत घेता येणार नाही. कलावंतांच्या या अनुपम आनंदाला कुणी 'ब्रह्मानंद' म्हणेल किंवा कुणी आणखी काही नाव देईल. पण ही आगळी अनुभूती देणारा आनंद जितका असामान्य तितकाच दुर्मिळही आहे. तो अभिजात कलावंताच्याच पदरात पडतो.

एका अभिनेत्याला नाटककारानं रेखाटलेली एक करुण व्यक्तिरेखा साकार करायची होती. कारुण्याचे वेगवेगळे पैलू त्याला आपल्या अभिनयातून प्रकट करायचे होते. कितीही परिश्रम केले तरी त्याला आत्मविश्वास येत नव्हता. नाटककारानं सांगितलं, 'तुम्ही मी लिहिलेल्या प्रत्येक शब्दाशी आणि रंगवलेल्या त्या व्यक्तीच्या दु:खाशी संवाद करा. स्वत:ला विसरून त्या भूमिकेत खोलवर जा.' अभिनेत्यानं तद्रूपता साधण्याचा प्रयत्न केला. त्याचा प्रत्येक शब्द आर्त कारुण्याचा वाहक बनला. एक आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व त्या दिवशी त्याला तल्लीनतेतून लाभलं. नाटकाचा प्रयोग संपल्यानंतर अनेकांनी भेटून त्याचं अभिनंदन केले. कुणी म्हणालं, 'एका नटसम्राटाचा आज जन्म झाला.' या शब्दांनी तो अभिनेता भारावून रडू लागला. ते अश्रू आनंदाचे होते. कृतार्थतेचे होते. कलेच्या एकनिष्ठ उपासनेतून त्या अश्रूंचं पारितोषिक त्याला मिळालं होतं.

●●●

# ध्येयवादी

सुधारकाचार्य गोपाळ गणेश आगरकर यांना जिवंतपणीच आपली प्रेतयात्रा पाहण्याचा योग आला. सामाजिक आणि धार्मिक रूढींवर, अंधश्रद्धांवर त्यांनी मर्मभेदक प्रहार करून सुधारणावादी विचारांचा उद्घोष केला होता. स्वतंत्र बुद्धीनं विचार करण्याची शास्त्रशुद्ध वाट जनतेला दाखविण्यासाठी त्यांनी जीर्ण विचारआचारांवर आघात केले होते. कर्मठ परंपरावाद्यांनी त्यांची प्रेतयात्रा काढली. आपल्या घराच्या खिडकीतून त्यांनी ती शांतपणानं पाहिली. समाजप्रबोधनाच्या कार्याबद्दल त्यांना मिळालेलं हे पारितोषिक होतं. आपली अंत्ययात्रा पाहताना या प्रबोधनकाराच्या मनात कोणते विचार उचंबळून आले असतील ? ते स्वत:शी त्या वेळी काय म्हणाले असावेत, याची कल्पना करता येणं शक्य आहे.

या प्रसंगामुळे माझं कार्य समाजमनात रुजत चाललं आहे, हे स्पष्ट दिसतं. जुनाट विचारांच्या वर्तुळात शतकानुशतकं निरर्थक फिरत राहिलेल्या समाजावर मी केलेले प्रहार किती अचूक आहेत हे आज मला सर्वार्थानं कळलं हे बरं झालं. मरणाच्या भयानं माझे जीवनवादी विचार, बंडखोर विचार मी कधीच सोडणार नाही. लोकनिंदेचा वणवा मला नष्ट करू शकणार नाही. 'इष्ट असेल ते बोलणार आणि न्याय्य असेल ते करणार' हा माझा 'स्वधर्म' आहे. स्वधर्माचरण करताना आलेला मृत्यू मला सुखावह वाटेल. पण अनेक साखळदंडांनी बांधला गेलेला हा माझा देश मुक्त करण्यासाठी मी माझ्या अंतापर्यंत धडपडत राहीन. जिवश्च कंठश्च मित्र मला दुरावले, तरीही मी एकाकी चालत राहीन. प्रत्येक पाऊल पुढेच पडेल. आगरकरांच्या या उद्गारात निग्रह आहे. जयिष्णू विचारांचं बळ आहे. प्रत्येक ध्येयवाद्याच्या मनात हाच पीळ असतो. सुंभ जळला तरी तो जळत नाही. आपल्या अंत:करणप्रवृत्तीला प्रमाण मानून अशी माणसं एकेकटी चालत राहतात. पण त्यानंतर त्यांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत समाजही त्यांच्यामागं चालू लागतो. एम. ए. चा अभ्यास करताना टिळक आणि आगरकर आपल्या दृष्टीसमोर भव्य स्वप्न रंगवीत होते. त्या काळात आपल्या आईला लिहिलेल्या पत्रात आगरकरांनी म्हटलं आहे, 'आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत. आता त्याला मोठ्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील,

असे मोठाले मनोरथ आई तू करीत असशील; पण मी आताच तुला सांगून टाकतो, की विशेष सुखाची हाव न धरता मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार आहे. त्या काळात सुख-समृद्धीचं दार विद्यासंपन्न माणसाला सहजपणानं उघडता आलं असतं. पण ही दुर्दम्य वृत्तीची माणसं राजमार्ग सोडून काट्याकुट्यांची वाट निवडतात आणि जन्मभर वैयक्तिक सुखाकडं पाठ फिरवतात. सत्ता आणि संपत्तीच्या मागं धावत सुटलेल्या स्वार्थी जगाला या प्रवृत्तीचं मोल कधी कळत नाही. आज तर सुशिक्षित लोकही 'कोण हे आगरकर', असा प्रश्न विचारतात. या प्रश्नाचं उत्तर त्यांना कोणत्या शब्दांत द्यावं हे कळत नाही. मंत्रिमंडळातल्या एका सदस्याला टिळक आणि गांधी यांचं संपूर्ण नाव सांगता आलं नाही, तेव्हा मला धक्काच बसला होता. अखेर नावात काय आहे ? जिथं नाव माहीत नाही, तिथं या व्यक्तीचं महत्त्व माहीत असावं; ही अपेक्षा ठेवणंही वेडेपणाचं ठरेल. गडकऱ्यांच्या एका कवितेची इथं आठवण होते. कवी म्हणतो, 'मी कधी कुणाला कळलोच नाही. जीवन असंच गेलं. मरणोत्तर तरी कुणी मला ओळखेल काय ? कुठेतरी आणि कधीतरी जगात मी होऊन गेलो, एवढंच बोललं जाईल.' लोकांच्या हिशेबी, आगरकरांसारखा बुद्धिवादाचा आचार्य 'असेल कोणीतरी' यापेक्षा अधिक काही असत नाही. आपलं हे भवितव्य प्रत्येक प्रखर ध्येयनिष्ठ व्यक्तीला माहीत असतं. पण तरीही उपेक्षेच्या अंधारात राहून लोकजीवनाला प्रकाशकिरण देणाऱ्या अशा प्रबोधनकारांच्या कार्याचं महत्त्व समाजानं समजून घेतलं पाहिजे. ज्ञान आणि प्रेम यांच्या पायावर समाज उभा राहावा, हीच सुधारकांची भूमिका असते. वेड्यावाकड्या वळणांनी अडखळत चाललेल्या जीवनाला नवी वाट दाखवून त्याला योग्य गती देणाऱ्या विचारवंतांना लोक नीट समजून घेऊ शकत नाहीत. आगरकरांच्या पदरात जितके शिव्याशाप पडले, त्या तुलनेत आनंदाचे आणि सन्मानाचे क्षण फारच कमी पडले, आगरकरांनी देव मानला नाही; पण आपल्या विचारातून त्यांनी समाजमनात देवत्वाची प्रतिष्ठापना केली हेच खरं ! त्यांचा मृत्यू झाला तेव्हा त्यांच्या उशाजवळ फडक्यात बांधून ठेवलेल्या दहा रुपयांच्या दोन नोटा आणि आपल्या हस्ताक्षरात त्यांनी लिहिलेली चिठ्ठी मिळाली. मजकूर असा होता, 'माझ्या प्रेतदहनार्थ इतकेच पैसे मी वाचवू शकलो.' अनेक प्रकारच्या मानसिक छळाला आणि संघर्षाला धीरानं तोडं देणाऱ्या या आचार्यांचा प्रवास वयाची चाळिशी गाठण्याच्या आतच संपून गेला.

●●●

# माझा देश माझी माणसं !

रामप्रसाद बिस्मिल हा देशभक्त क्रांतिकारक ऊर्दू कवी १९२९ मध्ये फासावर गेला. त्याची 'सरफरोशी की तमन्ना' ही राष्ट्रप्रेमानं चिंब भिजलेली कविता आजही अनेकांच्या जिभेवर नाचत असते. तो म्हणतो -

**'सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिलमें है।**
**देखना है जोर कितना बाजूए कातिल में है।'**

असंख्य अंत:करणांत देशभक्तीची ज्वाला पेटविणारी ही कविता लिहिणारा कवी देशासाठी स्वत:च बलिदान करून गेला. त्याचं काव्य वाचताना वाचकाच्या रक्तात बंड उभं राहतं. त्याचं मन राष्ट्रभक्तीनं रसरशीत होतं. या काव्याच्या काही धगधगीत ओळी आपल्या कापऱ्या आवाजात जुन्या पिढीतल्या एका देशभक्तानं *आवेशात म्हणून दाखविल्या. त्या म्हणताना त्याच्या मस्तकावरचं वार्धक्याचं ओझं* गळून पडलं होतं. मुद्रेवर आक्रमक तारुण्याची लाट आली होती. थोड्याच वेळात ती ओसरून गेली. त्यांच्या स्वरात निराशा आली. विषण्णतेनं ते म्हणाले, ''या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आमच्या पिढीतल्या असंख्य लोकांनी हसतमुखानं आपल्या संसारावर निखारे ठेवले. तारुण्यातले दिवस आम्ही तुरुंगात खितपत काढले. कौटुंबिक सुखाला आम्ही अंतरलो. देशाचं स्वातंत्र्य उदयाला यावं म्हणून अंधारकोठडीत रात्रंदिवस प्रकाशाची गीतं गात राहिलो; पण ज्या स्वातंत्र्याचं स्वप्न आमच्या पिढीनं पाहिलं, त्याची लक्तरं झालेली दिसत आहेत. देशाचा विचार आज कोणी करताना दिसत नाही. देशभक्तीची भावना इतिहासजमा झाली. बंदिवासातदेखील राष्ट्रप्रेमाचं उत्साही वातावरण होतं. आज स्वातंत्र्यातही राष्ट्रीय जाणीव फारशी उरली नाही, ही आमची आणि आमच्या देशाची शोकांतिका आहे. या देशाचं काय होणार ?''

त्या स्वातंत्र्यसैनिकाच्या शब्दात विदारक सत्य होतं. 'माझा देश' आणि 'मी या देशाचा घटक' या भावनेनं अंतर्बाह्य रोमांचित होणारे लोक काळाबरोबर निघून गेले. देशभक्ती ही एक मागासलेली अज्ञानमूलक भावना आहे, असं सांगणारे बुद्धिवादी अलीकडे आढळतात. देशाच्या कल्याणासाठी रक्त सांडणारे आणि प्राणाहुती देणारे मागासलेले लोक आता दिसत नाहीत, ही केवढ्या सुदैवाची गोष्ट

आहे ! आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर उभे असलेले मूठभर वृद्ध देशभक्त सोडले तर देशप्रेमाची प्रखर भावना शोधण्यासाठी इतिहासाची पानं चाळावी लागतील. कित्येक पदवीधर तरुण-तरुणींना राष्ट्रगीतही पाठ म्हणता येत नाही. ते गीत कुणी लिहिलं आणि त्या गीताचा अर्थ काय याचीही त्यांना कल्पना नसते. नोकरीसाठी मुलाखतीला आलेल्या एका तरुणाने म्हटले, 'हे नॅशनल साँग कुणी लिहिलं याची मला माहिती नाही. आम्ही आमचा अभ्यास करीत होतो, अवांतर गोष्टींची माहिती मी मिळवली नाही.'

राष्ट्रगीताची माहिती ही त्याच्या दृष्टीने एक 'अवांतर' गोष्ट होती. मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्यालाही यात फारसं आक्षेपार्ह वाटलं नाही. कारण नोकरीसाठी आलेला तो तरुण एका पुढाऱ्याचे प्रशस्तिपत्र घेऊन आला होता. राष्ट्रगीत पाठ नसणे किंवा त्याचा कवी कोण हे सुशिक्षितांना माहीत नसणे, हा काही अपराध नव्हता. अशा किरकोळ प्रश्नांची उत्तरे माहीत नसली म्हणून काही बिघडत नाही ! हा माझा देश आहे, हे सारे माझे बांधव आहेत. इथल्या भूमीशी आणि माणसांशी मी भावनेने, आत्मीयतेने बांधला गेलो आहे, ही जाणीव नाहीशी होणे, हे आपल्या संस्कृतीचे विडंबन आहे. जन्मभूमीबद्दल अभिमान नसणे, हा घृणास्पद अपराध आहे. याचे भान उरलेले नाही. पाश्चात्त्य देशाचे अंधानुकरण करणाऱ्यांनी पाश्चात्त्यांची राष्ट्रभक्ती मात्र घेतली नाही. 'इंडियासारख्या बॅकवर्ड कंट्रीत राहण्यात काय अर्थ आहे ? अमेरिकेसारख्या संपन्न देशात मी सेटल होणार आहे !' असले उद्‌गार कित्येक सुशिक्षितांच्या तोंडून ऐकायला मिळतात. पण एक कवी आपल्या काव्यातून उत्कटतेनं म्हणतो, 'आकाश सगळीकडे सारखेच आहे; पण माझ्या भारतीय वातावरणातला प्राणवायू खऱ्या अर्थाने मला जगवतो. माझ्या देशाची माती मला प्रिय आहे. इथली माणसे मला प्यारी आहेत. मला माझाच देश सर्वार्थाने प्रिय आहे.' या भावपूर्ण विचारावर कसले भाष्य करायचे ?

●●●

# खायचे दात आणि दाखवायचे दात

राजनीती ही वारांगनेसारखी चंचल आणि कुटिल असते असं म्हटलं जातं. ती एकीकडे नेत्रकटाक्ष टाकील, दुसऱ्याकडे पाहून मधुर हास्य करील आणि त्याचवेळी तिसऱ्याचा विचार तिच्या मनात चाललेला असेल. अशी राजनीती बहुधा यशस्वी होते. तिला नैतिक आदर्शांचं अधिष्ठान असलंच पाहिजे हा आग्रह जेव्हा धरला जातो, तेव्हा ती व्यवहारदृष्ट्या सफल होत नाही, हे इतिहासावरून सिद्ध होतं. सत्य, संयम, न्याय आणि करुणा या तत्त्वांचा अतिरेक झाला तर राजकारण सर्वस्वी फसतं. सोवळी नीतिमत्ता इथं चालत नाही. शत्रुराष्ट्रं याच दुर्बलतेचा गैरफायदा घेतात आणि त्याचे परिणाम देशातल्या जनतेच्या जीवनावर दीर्घकाळ होतात. लोकजीवनाला स्थैर्य आणि संरक्षण देण्यासाठी राज्यकर्त्यांनी सदैव सावध राहून वास्तव परिस्थितीचा विचार केला पाहिजे. कोणत्यातरी स्वप्नमय विचारांच्या आहारी जाणारे राज्यकर्ते जनतेचं हित करू शकत नाहीत, अशी इतिहासाची साक्ष आहे. त्यामुळे वारांगनेचं चातुर्य आणि चंचल वृत्ती कित्येक वेळा राजकारणात अपरिहार्य ठरते. सत्य आणि संयम यांचा एकांतिक अतिरेक देशाच्या अंगलट येतो, या अर्थाचं प्रतिपादन 'महाभारतात' अनेक ठिकाणी आढळतं.

राजधर्माच्या अंगोपांगाचं सूक्ष्म विश्लेषण महाभारतानं केलं आहे. कपटी शत्रूचा पराभव कपटानंच केला पाहिजे. अन्यथा सत्याचा आग्रह धरणारा राजा नष्ट होतो आणि शत्रू त्याचं राज्य कपटमार्गानं जिंकून घेतात. आजही देशोदेशीच्या राजकारणात असत्य आणि कपटकारस्थान यांचाच प्रभाव दिसतो. सत्यानं असत्याला जिंकावं हा श्रेष्ठ धर्म असला तरी सत्याचा विजय होईलच, ही शाश्वती नाही. अनेक वेळा अनीतीचा, अधर्माचा आणि असत्याचा विजय होऊन धर्माला वनवास पत्करावा लागतो. राजकारण हा साधूंचा खेळ नाही. तो सैतानाचा खेळ होऊ नये यासाठी प्रयत्न करताना, तारतम्यानं आडवाटा आणि चोरवाटा यांचाही वापर प्रसंगविशेषी करावा लागतो. छत्रपती शिवाजी महाराज धर्मनिष्ठ होते; पण शत्रूला मुत्सद्दीपणाने कोंडीत पकडताना त्यांनी सत्य-संयमाचा बडिवार माजवला नाही. 'शठं प्रति शाठ्यम्' हे राजनीतीच्या यशस्वितेचं सनातन सूत्र आहे. आपल्या हातातली साधनं शुचिमान

असली तरी प्रतिपक्षाच्या हातातली शस्त्रं तशी सोज्वळ नसतात, हे समजून घेणं हा कुटिल राजनीतीचा एक आवश्यक सिद्धांत आहे. राज्यं सत्याच्या बळावर जिंकता येत नाहीत. सामर्थ्याला धूर्तपणाचं अधिष्ठान असेल तरच राज्य मिळतं आणि ते टिकविता येतं, हे व्यासांच्या महाभारतात वर्णिलेलं आहे. वनपर्वात कपटनीतीचा पुरस्कार करताना म्हटलं आहे -

**निकृत्या निकृतीप्रज्ञा हन्तव्या इति निश्चय :।**
**नहि नैकृतिकं हत्वा निकृत्या पापमुच्यते ॥**

'दांभिक, कपटी शत्रूचा वध कपटमार्गानेच होतो, हे निश्चयानं समजावं. अशा शत्रूचा वध कपटमार्गानं केला तर त्याला कोणी पातकी म्हणत नाहीत.' जे घातकी असतात, त्यांचा घात करण्यात अधर्म नाही, असं ही राजनीती सांगते. खळांची व्यंकटी सांडावी, हा अत्यंत उज्ज्वळ आशावाद संतांच्या विशुद्ध मनात असतो, तो स्तुत्यच आहे. पण कोणत्याही उपायानं दुष्टांचं दुष्टत्व नाहीसं होत नसेल, तर दुष्टांनाच नाहीसं करणं सामाजिक कल्याणासाठी आवश्यक असतं. श्रीकृष्णानं धर्मयुद्धाचा नियम मोडून दुर्योधनाच्या मांडीवर गदाप्रहार करण्याचा सल्ला भीमाला दिला नसता तर गदायुद्धात दुर्योधन विजयी झाला असता. ही भूमिका मान्य नसणारी आणि केवळ सत्य आणि धर्मनीतीचा आग्रह धरणारी एक विचारधारा पूर्वीपासून अस्तित्वात आहे. त्या विचारातलं सामर्थ्य लक्षात घेऊनही राजकारणाच्या जीवघेण्या धुमाळीत सत्प्रवृत्तीच्या विजयासाठी वक्रबुद्धीचा आणि वाकड्या वाटेचा वापर करणं हेच सयुक्तिक ठरतं.

आदिपर्वात म्हटलं आहे, 'शत्रूला ठार मारण्याचा हेतू मनात ठेवून बाह्यात्कारी त्याच्याशी मधुर भाषण करावं. प्रहार करतानाही गोड बोलावं आणि प्रहार केल्यावर दुःख दाखवून रडावं.' आजच्या जगात याच कपटनीतीचा अनेक राष्ट्रे अवलंब करीत आहेत. यशस्वी राजकारण करताना खायचे दात आणि दाखवायचे दात वेगवेगळे असावेत, असा त्याचा अर्थ आहे.

●●●

# हसायला विसरू नका !

ज्याला मनमोकळेपणानं खळखळून हसता येतं, तो माणूस सुदैवी म्हटला पाहिजे. अलीकडे हास्यविनोदाला ओहोटी लागली आहे की काय, अशी शंका येते. हिंसा, संकटं आणि दु:खं यांचा तीव्र विळखा आपल्याभोवती पडत असताना हास्यविनोदाला फारसा अवसर उरलेला नाही. पण मला वाटतं, या स्थितीतच हसण्याखिदळण्याची, त्याचा आस्वाद घेण्याची खरी गरज आहे. निराशेचे आणि वेदनेचे अश्रू पुसून मुद्रेवर हास्याच्या लहरी ज्याला निर्माण करता येतात, त्याला हे संघर्षपूर्ण जीवन उत्साहानं जगण्याची युक्ती सापडली, असं म्हणता येईल. दिवसातून आपण फार वेळा रागावतो. कुणाशीही मनापासून बोलत नाही. ही जीवनपद्धती बदलून खेळकरपणा, हास्यविनोदात रस घेण्याची वृत्ती अंगी बाणवली, तर जीवनात अधिक जिवंतपणा येणार नाही का ?

एकदा एका आजारी मित्राला भेटायला आणि त्याला धीर द्यायला रुग्णालयात गेलो होतो. मला पाहिल्यावर त्याच्या मुद्रेवर स्मितरेषा उमटली. आपल्या प्रकृतीबद्दल तो म्हणाला, ''अजून माझं तिकीट कन्फर्म झालेलं दिसत नाही. मी अजून वेटिंगलिस्टवरच आहे. खरं तर बेडिंग बांधून तयार आहे. पण परमेश्वराचा डिसिजन अजून होत नाही. बहुतेक आमचं जाणं लांबणीवर पडणार असं दिसतंय. स्वर्गातसुद्धा जागा पाहिजे ना ! तिथंही वशिलेबाजी असणारच; मग आमचा नंबर लवकर लागणं शक्य नाही.'' असं म्हणून तो खळाळून हसला. त्याला तपासायला आलेले डॉक्टरही हसले. तोंडावर हातरुमाल धरून नर्सही हसली. रुग्णाच्या खोलीत इतका प्रसन्न हास्यविनोद क्वचितच घडत असेल. स्वत: आजारी असलेल्या व्यक्तीनंच तो विनोद केला होता. मीही हसत म्हणालो, ''ही हसण्याची हिरवीगार सळसळणारी शक्ती जोपर्यंत तुझ्यात आहे. तोपर्यंत तुला कसलीच भीती नाही.''

हसणं हे जीवनाचं अन्न आहे. दररोज एकदा तरी निर्मळपणानं खळखळून हसावं आणि दु:खाचा निचरा करावा. दररोजच्या स्नानाप्रमाणेच हास्यविनोदाचे दोन-चार फवारे रोज अंगावर घ्यावेत.

हास्यविनोदाची महती गाताना जगातल्या दु:खदैन्याची जाणीवही असावी.

आजूबाजूचं चिंतेचं वातावरण पूर्णत: विसरणं कुणालाच शक्य नाही. दु:खाचं अस्तित्व स्वीकारून हास्यविनोदाची वाट शोधणारा माणूस मनाचा समतोल साधू शकतो. कित्येक माणसं दु:खाच्या धक्क्यानं पार पिचून जातात. कोसळून पडतात. पण रसिक आणि खेळकर माणूस अशाही अवस्थेत ताठ उभा राहू शकतो. त्याच्यातली रसज्ञ विनोदबुद्धी त्याला आधार देते. विनोदी लेखक स्विफ्ट म्हणतो, 'रडण्याची पाळी येऊ नये म्हणून मी तत्परतेने सर्व गोष्टींना हसत राहतो.' लोकमान्य टिळकांना सहा वर्षांची कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली, तेव्हा न्यायालयातलं वातावरण अत्यंत गंभीर झालं होतं. निकाल ऐकताच टिळकांचे भक्त, मित्र आणि हितचिंतक कोर्टातच रडू लागले. दु:खी वातावरण गडद झालं. ते पाहून टिळक मोठ्यानं हसले. आणि म्हणाले, "अरे, रडायला काय झालं ? इंग्रज सरकार किती दयाळू आहे. दयाळू सरकारचे आभारच मानले पाहिजेत." असं म्हणून ते पुन्हा हसले. ते हसले नसते तर वातावरणातला ताण वाढला असता. विनोदामुळे आपल्याही मनातलं दु:ख टिळकांना कमी करता आलं. काय असेल ते असो-हसणाऱ्या चेहऱ्याभोवती मित्रमैत्रिणींची गर्दी होते. रडणाऱ्याला हे भाग्य लाभत नाही.

प्रसन्नपणानं हसणारं गोजिरवाणं बालक पाहिलं, की त्याच्या गालावरचं कोवळं उत्साही हास्य हे त्याच्या जीवनशक्तीचं दर्शन घडवतं. हसणारं फूल, मूल, चांदणं, थंडगार वाऱ्याची सुगंधी झुळूक, झाडं आणि पाखरं, हे पाहताना सृष्टीत चाललेला हास्याचा आनंदी उत्सव कसा शाश्वत आहे, याची जाणीव होते. दु:खाला आणि वेदनेला उत्तर देण्याची शक्ती हास्यातच आहे.

अलीकडे हास्यमंडळं किंवा हास्यक्लब्ज् काही ठिकाणी निघाले आहेत. स्त्री-पुरुष एकत्र जमून मोठमोठ्यानं हसतात. हसणं हा एक व्यायामप्रकार मानला जातो. हास्यामुळं मनाला संजीवनी मिळते. मरगळलेलं म्हातारं झालेलं मन खळखळून हसण्यानं ताजं टवटवीत होतं. मनाला तारुण्य देणारं हास्यासारखं उत्तम औषध नाही. ज्या घरात हसण्याचा आवाज येत नाही ते घर रोगट बनलं आहे असं मी म्हणेन. हसत हसत जगावं हेच सुखी जीवनाचं रहस्य.

●●●

# अहंगंड आणि आत्मप्रत्यय

अनेक वर्षं सिंहासनावर बसलेला एक सम्राट म्हणाला, ''माझ्या सत्तेला प्रतिबंध करू शकेल, अशी शक्ती या जगात नाही. मी आहे म्हणून सूर्योदय होतो. फुलांना गंध येतो. सागराच्या लाटा उचंबळतात. तारकांना तेज येतं. माझं स्वामित्व इतिहासाच्या प्रत्येक पानावर मुद्रित होत आहे.''

सत्तेची वारुणी पिऊन झिंगलेल्या त्या राजाला अहंगंडानं पछाडलेलं होतं. 'मी करेन ती पूर्व, मी चालेन तो मार्ग आणि मी बोलेन ते साहित्य', असा गैरसमज अनेकांचा होतो. या सत्ताधीशालाही अशाच हास्यास्पद विचारांनी ग्रासलेलं होतं. आपल्या स्थानाला आणि माहात्म्याला कुणीही धक्का लावू शकत नाही, या भ्रमात ही अहंकारी माणसं असतात. सत्ता आणि वैभव कोणत्याही क्षेत्रातलं असो, त्याला ओहोटी लागतेच. आपण एकमेव आहोत. आपल्यानंतर या क्षेत्रात नवीन काही उगवणार नाही, ही भ्रांत समजूत कित्येकांची झालेली असते. सर्वच क्षेत्रांत अशा भ्रांतिष्ट कल्पनांचे ठेकेदार सापडतात. महनीय युगपुरुष येतात आणि जातात; पण ते निघून गेल्यानंतर जग ओस पडत नाही. जीवन-मृत्यूचं चक्र फिरतच असतं. मग अहंगंडाच्या भोवऱ्यात फिरत राहण्यात काही अर्थ आहे काय ? संत कबीरानं म्हटलं आहे, 'काय मागावं ? इथं स्थिर काहीच नाही. लक्षावधी नातीगोती असलेल्या लंकाधिपती रावणाच्या प्रासादात दिवा लावायलाही कोणी दिसत नाही. प्रकाश संपला, आता काळोख उरला.' जीवनातल्या एका अटळ अशा विदारक अवस्थेचं चित्र कबीरानं रेखाटलं आहे. विश्वाच्या विराट पसाऱ्यात वर उल्लेखिलेला तो सम्राट म्हणजेच क्षणभर वळवळणारा एक कीटक नव्हे काय ? कोणत्या तरी क्षणी हे कीटक अंतर्धान पावतात. त्यामुळे जगात कसलीही खळबळ होत नाही.

हा विचार सयुक्तिक असला तरी या सृष्टीत माणूस सर्वथैव निष्क्रिय आणि नगण्य आहे, असं समजणं चुकीचं आहे. जे स्वप्नातही शक्य नाही, असं वाटतं, ते माणूस आपल्या शक्तीनं प्रत्यक्षात घडवू शकतो. आकाशातल्या ग्रहांवर आक्रमण करण्याची माणसाची महत्त्वाकांक्षा मुळीच चुकीची नाही. विश्वाच्या जगङ्व्याळ व्यापारात आपण क्षुद्र जंतू आहोत, हे समजण्यापेक्षा आपल्या बुद्धिबलानं आणि

बाहुबलानं जीवनप्रवाहाला मी वेगळं वळण देऊ शकेन, ही कल्पना केव्हाही चांगली आहे. अंथरूण पाहून पाय पसरण्यापेक्षा अथांग आभाळात मला पाय पसरायचे आहेत, ही भूमिका पुरुषार्थाला साजेशी आहे. जन्मलेल्या बालकानं सूर्याला गिळण्याचा प्रयत्न करण्यात वेडेपणा असला तरी ती त्याच्या उत्तुंग आकांक्षेची प्रस्तावना असते. साऱ्या जगात माझ्या पाऊलखुणा मी उमटवीन, हा आत्मप्रत्यय अहंकाराला जवळचा असला तरी तो अधिक प्रशंसनीय आहे. वास्तवाला, आपल्याला अपेक्षित असलेलं रूप देण्याची अखंड धडपड करावी.

शिवाजी शहाजी भोसले नावाचा सोळा वर्षाचा कोवळा तरुण रोहिडेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापण्याची आपली भव्य कल्पना उच्चारतो आणि देवाला वंदन करून 'हे राज्य व्हावे, ही श्रींची इच्छा आहे,' अशी घोषणा करतो. तेव्हा त्याच्या दृष्टीत कितीतरी विशाल आणि व्यापक स्वप्नं होती. त्या युवकाच्या हातातल्या समशेरीला निर्धाराचं पाणी होतं. तिच्या टोकानं मी महाराष्ट्राचा स्वतंत्र इतिहास लिहीन, या उदात्त अहंकारानं तो प्रेरित झाला. सारंच एक दिवस पुसलं जाणार आहे, म्हणून काही लिहूच नये, असा हताश विचार केला, तर पौरुषाची आणि पराक्रमाची महाकाव्यं लिहिली जाणार नाहीत. भ्रामक अहंगंड नको; पण डोळस महत्त्वाकांक्षा आणि भव्य कल्पना, यांची आराधना केलीच पाहिजे. नाहीतर माणुसकीला काहीच अर्थ उरणार नाही.

●●●

# सांगे वडिलांची कीर्ती

एक गृहस्थ वेळी अवेळी आपल्या वाडवडिलांची अतिशयोक्त स्तुतिस्तोत्रं गात असतात. आपण एका शूर व घरंदाज कुळातले आहोत, याचा त्यांना आत्यंतिक अभिमान वाटतो. एका संपन्न घरात जन्माला येणं इतकंच त्यांचं कर्तृत्व आहे. पूर्वजांची महती गर्वानं सांगण्यापलीकडे या गृहस्थाच्या हातून दुसरं काहीही उल्लेखनीय घडलेलं दिसत नाही. ज्यांच्या ठायी कसलंही कर्तृत्व नसतं, पण तरीही जे अहंगंडानं जगत असतात, त्यांच्याबद्दल समर्थ रामदासांनी म्हटलं आहे, **'सांगे वडिलांची कीर्ती। तो येक मूर्ख।'**

पूर्वजांच्या केवळ नावावर जगत राहणारे पुष्कळ महाभाग असतात. त्यांनी स्वत: कोणताही पुरुषार्थ केलेला नसतो; पण तरीही पूर्वजपराक्रमाची दवंडी पिटत राहण्यात त्यांना एक प्रकारचा चमत्कारिक आनंद मिळतो. आपल्या कर्तृत्वहीनतेवर पांघरूण घालण्याचं हे एक साधन त्यांना सापडलेलं असतं. गर्व करण्यासारखं काहीही नसून, गर्वाच्या घरातच मुक्काम ठोकणाऱ्या लोकांची संभावना 'तो एक मूर्ख' अशी व्हावी, यात आश्चर्य नाही. पूर्वजांच्या अभिमानास्पद कामगिरीचा वेळप्रसंगी काहीसा गर्वानं उल्लेख करायला प्रत्यवाय नाही; पण त्यांच्या कीर्तीची सदैव जपमाळ ओढीत बसणं, हे मानसिक विकृतीचं लक्षण आहे. कदाचित अशा लोकांचा अहंगंड त्यांच्या न्यूनगंडातूनच उत्पन्न होत असावा. या लोकांना कठोर आत्मपरीक्षणाची सवय नसते. त्यामुळेच आपल्या वाडवडिलांच्या लौकिकाचा आधार त्यांना हवाहवासा वाटतो.

पूर्वकालातल्या वैभवाची आणि पराक्रमाची आठवण व्यक्तीनं काय किंवा राष्ट्रानं काय जरूर ठेवली पाहिजे. आपल्या इतिहासातल्या प्रकाशस्थळांविषयी अभिमान वाटावा, हे अगदी स्वाभाविक आहे; पण त्या अभिमानाच्या वर्तुळात स्वत:ला गुरफटून घेणं, हे मात्र निष्क्रियतेचं द्योतक आहे. इतिहासातल्या काही व्यक्ती आणि घटना नवं स्फुरण देऊ शकतात. राष्ट्राच्या आंतरिक शक्तीला जाग आणू शकतात. इतिहासातून मिळणाऱ्या प्रकाशातून समाजानं आणि राष्ट्रानं आपली वाट शोधली पाहिजे. इतिहास घडवणाऱ्या व्यक्तींच्या जयघोषालाही काही अर्थ असतो; पण इतिहासाला, भूतकाळाला देवता मानून त्याची अहर्निश पूजा बांधणारी भाबडी

मनोवृत्ती मात्र वेडेपणाची ठरते. पूजा करणाऱ्या पूजकापेक्षा जाणीवपूर्वक अभ्यास करणारा आणि त्याला अनुसरून कर्तृत्वाची पावलं टाकणारा माणूस किंवा समाज हाच खरा इतिहासप्रेमी असतो. सारा इतिहास कधीच अनुकरणीय किंवा वंदनीय नसतो. इतिहासाचा काही भाग अन्यायाची आणि अधर्माची साक्ष देणारा असतो. त्याचीही पूजा कोणी करू लागला, तर ते कधीही संयुक्तिक ठरणार नाही. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत इतिहासाचं स्मरण आणि अभिमान समर्थनीय आहे; पण आमच्या इतिहासात कित्येक रूढी आणि परंपरा, कित्येक संकेत आणि अंधश्रद्धा यांनी ज्ञानाची व व्यक्तिस्वातंत्र्याची क्रूर गळचेपी केली, हेही समजून घेतलं पाहिजे. या इतिहासाची कित्येक पानं निरपराध माणसांच्या अश्रूंनी, रक्तानं भिजलेली असतील, तर आता या प्रकारांची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेतलीच पाहिजे. नवा, अधिक उज्ज्वल इतिहास घडवावा, हे स्वप्न दृष्टीसमोर ठेवणं, हीच नव्या इतिहासाची पायाभरणी ठरेल. इतिहासाला देव्हाऱ्यात बसवणं म्हणजे वाडवडिलांच्या कीर्तीचे केवळ नगारे वाजवीत राहणं नव्हे काय ?

मानवी कर्तृत्वातून इतिहास घडतो. महत्त्वाकांक्षी माणूस जेव्हा आपली दमदार पाऊलं टाकीत ध्येयाचा चिवटपणानं पाठलाग करीत असतो तेव्हाच इतिहासाला आकार येतो. इतिहास विसरू नये हे खरं, पण नवा इतिहास घडवण्यासाठी नवी स्वप्नं पाहण्याची शक्ती दृष्टीत यावी लागते. पाहिलेली स्वप्नं वास्तवात उतरवण्यासाठी लढण्याची उर्मी रक्तात उचंबळून आली पाहिजे. पराक्रमी हात इतिहास घडवतात आणि मग कवींचे हात त्या शूरांचे पोवाडे लिहितात. इतिहासानं शूर वीरांची नावं जपली आहेत. वडिलांच्या कीर्तीवर जगणाऱ्या भेकडांची इतिहासात नोंद नसते.

●●●

# दैववादाचे तुणतुणे

नियती हीच खरी बलाढ्य शक्ती आहे. तिच्या लहरीप्रमाणे हे जग चाललं आहे, असा दृढ समज असंख्य लोकांचा असतो. एका नियतीवादी कारखानदाराच्या विनंतीवरून भगवान महावीरांनी त्याच्या कारखान्याला भेट दिली. वेगवेगळ्या आकारांची सुबक व आकर्षक भांडी तयार करण्याचा उद्योग त्या कारखान्यात चालू होता. ''आपल्या भांड्यांना बाजारात सर्वाधिक मागणी असते. या कारखान्यामुळे आपण देशातले श्रीमंत आणि सन्माननीय उद्योगपती मानले जातो,'' असं त्यानं गर्वानं सांगितलं. भगवान महावीरांनी त्याला प्रश्न विचारला, 'सद्दालपुत्रा, तुझ्याच कारखान्यातली भांडी इतकी आकर्षक आणि लोकप्रिय का झाली ?' तो उद्योगपती म्हणाला, 'भगवान, ही सारी नियतीची कृपा आहे. तिच्या कृपाछत्राखाली असल्यामुळे माझा सारखा उत्कर्ष होत आहे.'

भगवान महावीरांना सद्दालपुत्राची ही विचारसरणी पूर्णतया चुकीची वाटली. नियतीचं तुणतुणं वाजवीत राहणं, हा एक प्रकारचा दुबळेपणा आहे, निराशावाद आहे, ही त्यांची भूमिका होती. ते सद्दालपुत्राला म्हणाले, 'तुझ्या स्पष्टीकरणात शुद्धता आणि संगती नाही. तुझ्याच कारखान्यातली भांडी सर्वत्र विकली जातात, याचं कारण दैवाची अनुकूलता हे नसून, घडवणाऱ्यांचे हात कलासंपन्न आहेत. उत्तम दर्जाची माती मिळवून तिच्यावर आवश्यक ते संस्कार इथं दक्षतेनं केले जातात. इथं तयार होणारी उत्कृष्ट भांडी म्हणजे बुद्धि आणि उद्योग याचं फलित आहे. चांगल्या निर्मितीसाठी योजना आणि कष्ट यांची जरुरी असते. हे घटक तू सांभाळलेस, म्हणूनच या क्षेत्रात तू अग्रगण्य झाला आहेत. यात नियतीचा संबंध कुठं येतो ?' सद्दालपुत्र गोंधळला. महावीरांचे तर्कशुद्ध विचार त्याला पटत होते; पण तरीही नियतीची इच्छा, दैवाची कृपा हे शब्द तो सारखे उच्चारीत होता.

''कारखान्याला आग लागली तर ती विझवण्यासाठी तू धडपड करशील, की नियतीची इच्छा म्हणून स्वस्थ बसशील; नियती प्रमाण मानायची, तर आग शमविण्याचे प्रयत्न करण्याचे काही कारण नाही.'' या तर्कावर सद्दालपुत्र निरुत्तर झाला. महावीरांना वंदन करून त्यानं दैववादाचा अतार्किक विचार सोडून दिला.

आजच्या बुद्धिवादी समजल्या जाणाऱ्या जगातही आपल्या ललाटी लिहिलं आहे, ते परमेश्वरसुद्धा पुसू शकत नाही, असं मानणारी कोट्यवधी माणसं आहेत. 'मी माझ्या नियतीला आकार देऊ शकतो. माझ्या ललाटलेखातील शब्द बदलू शकतो; खरं तर माझा ललाटलेख मीच लिहीत असतो,' असा आत्मविश्वास फार थोड्या लोकांच्या जीवनात दिसतो. 'मला उजाड माळरान द्या. त्याचं मी नंदनवन करू शकेन' अशा आशयाचे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. नशिबाला त्यांनी कधीच बोल लावला नाही. ते प्रयत्न करीत राहिले. काट्याकुट्यांच्या जमिनीवर घाम गाळून फुलांची शेती करणाऱ्यांच्या पदरात सुगंधाचं भरघोस पीक पडतं, हे सिद्ध करणारे अनेक पुरुषार्थवादी लोक आहेत. त्यांनीच इतिहासाला नवी वळणं दिली. घोड्यावरती मांड बळकट असली आणि हातातला लगाम घट्ट धरून ठेवला, म्हणजे दैवाचं घोडं निमूटपणे स्वाराच्या नियंत्रणाखाली धावत राहतं. धावणाऱ्याला वाट दिसते आणि शक्तीही मिळते. दैववादाचं एकसारखं तुणतुणं वाजवणारे लोक अगतिक असतात. प्रवाहाबरोबर वाहवत जाणाऱ्या काटकीसारखे कुठल्यातरी किनाऱ्याला लागतात. त्यांनी दैवाची रडगाणी सोडली पाहिजेत आणि म्हटलं पाहिजे, 'मीच आहे देव माझ्या दैवाला घडवणारा !'

महाभारतात एक प्रसंग आहे. कौरव-पांडवांचं युद्ध सुरू झाल्यावर दुसऱ्याच दिवशी पांडवांना निराशेनं घेरलं. आपल्याला हस्तिनापूरचं सिंहासन मिळू शकणार नाही कारण कौरवसैन्य अफाट आहे. त्यांच्याकडं मोठमोठे वीर आहेत. आपलं सैन्य त्यांच्या तुलनेत कमी आहे. नको ते राज्य आणि नको ते सिंहासन या विचारानं हताश झालेले पांडव आपल्या शिबिरात परतले. तेजस्विनी द्रौपदी त्यांचा धि:कार करून म्हणाली, 'आपला पुरुषार्थ जागृत करा. तिळात तेल असतं, लाकडात अग्नी असतो, जमिनीत पाणी असतं पण ते बाहेर काढायला पुरुषार्थ आणि प्रयत्न यांची जरूर असते. तुम्ही शौर्य धैर्यानं उफाळून उठलात तर कौरवांची काय कथा ?' आणि मग दैववाद पराभूत झाला.

●●●

# नाटक

'जग ही एक रंगभूमी आहे आणि आपण जीवनाच्या नाटकात नानाविध भूमिका वठविणारे नट आहोत,' असं शेक्सपिअरचं एक वचन आहे. भर्तृहरीनंही एका श्लोकातून वेगवेगळ्या भूमिकांचा मार्मिक उल्लेख केला आहे. कधी बालक म्हणून, कधी तरुण म्हणून, तर कधी वृद्ध या नात्यानं माणूस आपली भूमिका करीत असतो. आणि अखेरचा पडदा पडल्यानंतर तोंडावरचा रंग पुसून तो मृत्यूच्या विंगमधून निघून जातो. हे वर्णन अगदी सार्थ आहे. आयुष्यात माणसाला तऱ्हेतऱ्हेची सोगं घ्यावी लागतात. आणि घेतलेलं सोंग निभावून न्यावं लागतं. कुणीतरी अज्ञात सूत्रधार माणसाच्या चेहऱ्याला आपल्या लहरीप्रमाणे रंगरंगोटी करवून त्याला जगाच्या रंगभूमीवर ढकलून देतो. इच्छा असो की नसो, आपल्या वाट्याला आलेली भूमिका त्याला जीव लावून सजवावी लागते. पण साऱ्यांच्याच भूमिका नीट वठतात, असं मात्र नव्हे. परमेश्वर नावाच्या नाटककाराला सुसंगतीपेक्षा विसंगत घटनांनी भरलेली नाटकं लिहावीशी वाटतात. नाट्यशास्त्राचे नियम त्याला समजावून सांगणारा भरतमुनी अद्याप जन्मला नाही. राजा होण्याची ज्याची योग्यता असते, त्याला हा नाटककार हुजऱ्या बनवितो आणि हुजऱ्याचीही लायकी नसलेल्याला सिंहासनावर थाटामाटाने बसवितो. ज्ञानवंत भणंगासारखा भटकत राहतो. त्याच्या फाटक्या झोळीत फारसे काही पडत नाही. मूर्खांना मात्र लक्ष्मी वरमाला घालते. एखाद्या म्हाताऱ्याला म्हातारपणाच्या यातना देत, तळमळत जिवंत ठेवतो; आणि एखाद्या उमलत्या तरुणाच्या किंवा बालिकेच्या जीवनाची कळी अचानक खुडून टाकण्याचा निर्दयपणा करतो; याला काय म्हणावे ? जीवनाचं नाटक गूढ आणि अनाकलनीय असतं, हे सत्य आपल्याला स्वीकारावं लागतं.

जीवननाटक दुर्बोध आहे; पण ते अर्थशून्य आहे, असं मात्र मला वाटत नाही. अर्थ शोधावा लागतो. अर्थ भरावा लागतो. नाटकाकडे पाठ फिरवणं मात्र व्यर्थ आहे. रंगभूमीवरचा एक यशस्वी नट मला म्हणाला, "आमच्या नाटककंपनीत कोणी कोणती भूमिका करायची यावरून नेहमी अटीतटीची भांडण होतात. प्रत्येकाला नाटकाचा नायक व्हायचं असतं. आता नाटकात एकच नायक असणार. मी मात्र

कोणत्याही विशिष्ट भूमिकेसाठी कधी अडून बसलो नाही. कधी नायक झालो, कधी खलनायकाची छबी उभी केली. दारूबाजाचीही भूमिका निभावून नेली. तर काही वेळा संतसज्जनाच्या रूपातही मी प्रेक्षकांपुढे उभा राहिलो. प्रत्येक भूमिकेत मी स्वत: रंगून गेलो. नाटकात चेहऱ्याला कोणता रंग लावला आहे, यापेक्षा तुमचं अंतरंग कसं आहे, हेच महत्त्वाचं असतं. तो रंग जेव्हा प्रकट होतो, तेव्हाच प्रेक्षक तुम्हाला डोक्यावर घेतात. सच्चेपणानं भूमिका करणाऱ्या आंधळ्या भिकाऱ्याच्या साध्या शब्दांना आणि अभिनयाला टाळ्या पडतात. पण राजाच्या दरबारी भाषेलाही प्रतिसाद मिळत नाही. नाटकात भाषा चालत नाही; भावच प्रभाव पाडतात. म्हणून मी कुठलीही भूमिका आनंदानं स्वीकारतो. मिळालेल्या भूमिकेचं सोनं करणं नटाच्याच हातातं असतं. तिथं परमेश्वरसुद्धा हस्तक्षेप करू शकत नाही. ही माझी भूमिका मी जगणार आहे. एवढा आत्मविश्वास असला पाहिजे.''

खरं तर त्या नटानं नाटकासंबंधी बोलताना जीवनाचं तत्त्वज्ञान किती सहजतेनं सांगितलं होतं ! आयुष्यात प्रत्येकालाच काही महत्त्वाकांक्षा असतात. काहींच्या अपेक्षा गगनचुंबी असतात; पण त्या साकार करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती त्यांच्यात नसते. हे आयुष्याचं नाटक काही केल्या रंगत नाही. असा त्रागा करून आपल्या भूमिकेपासून दूर जाणारे पुष्कळ असतात. पण काही जण अपयशाच्या खाचखळग्यांतून नेटाने चालत राहतात. निराशेचे कडवट घोट गिळून टाकतात. आशावादाचं स्मित त्यांच्या चेहऱ्यावर चमकत असतं. या लोकांचं आयुष्य घडत जातं. रंगत चाललेल्या रसपूर्ण नाटकासारखं आपलं जीवन नाट्यसुंदर करण्याची कला त्यांना साधलेली असते. रंगभूमीवर उभं राहण्यासाठी मनात बळ असावं लागतं. भूमिकेशी तादात्म्य पावण्याची मानसिक शक्ती असावी लागते. परमेश्वरानं लिहिलेल्या आपल्या जीवननाटकात आपल्याला हवी तशी सुधारणा करण्याची हिंमत ठेवली, तर नाटकाची परिणामकारकता कमी होत नाही. हा ईश्वरी खेळ नव्हे; हा मानवी खेळ आहे आणि माणसाच्या प्रतिभेतही परमेश्वरी स्पर्श असतो, हे गृहीत धरून जगाच्या रंगभूमीवर धीटपणानं उभं राहावं. सुचतील ती गाणी गावीत. जमेल तो अभिनय करावा; पण प्रत्येक गाण्यात आणि अभिनयात आपल्या हृदयातील नाट्य मनापासून ओतावं. नाटक असंच रंगत ठेवावं.

●●●

# जीवनगाणे

मुलाच्या मरणानं शोकाकुल माता भगवान बुद्धाकडे येऊन 'मुलाला जिवंत करा', अशी विनंती करू लागली. तिचं सर्वस्व मृत्यूनं हिरावून नेलं होतं. बुद्धांच्या मुद्रेवरही करुणा आणि दु:ख यांच्या रेषा उमटल्या. त्यांनी 'ज्या घरात आजपर्यंत मृत्यू झाला नाही, त्या घरातून मूठभर धान्य आणलंस, तर तुझं मूल मी जिवंत करीन' असं आश्वासन दिलं. ती गावभर फिरली. मृत्यूचं पाऊल जिथं उमटलं नव्हतं, असं घर तिला आढळलं नाही. हळूहळू तिचा दु:खावेग ओसरला. मरण अटळ असतं आणि युगपुरुषालाही ते चुकविता येत नाही, हे तिला समजलं. आज पुन्हा या कथेची आठवण होण्याचं कारण असं, की आमच्या शेजारी राहणाऱ्या एका विद्वान प्रवचनकाराच्या पत्नीचा मृत्यू झाला होता. ते व्याकूळ होऊन प्रत्येकाला विचारीत होते, 'हे असं कसं झाले हो ? तिची माझी भेट पुन्हा झाली पाहिजे. कोणीतरी माझी-तिची भेट करून द्या.'

भगवान बुद्धाला भेटलेली स्त्री अज्ञानी होती. हे प्रवचनकार अभ्यासू आणि बहुश्रुत होते. मृत्यूची कल्पनासुद्धा मनाचा थरकाप करते; पण केव्हातरी या विदारक सत्याला सामोरं जाणं भाग आहे. त्यावेळी निश्चल राहण्याचं धैर्य मिळावं. मरण म्हणजे नेमकं काय, हे सांगता येत नाही. मृत्यू ही एक अज्ञेय शक्ती आहे. मृत्यूनंतर अस्तित्व असतं का, हेही कुणी निश्चितपणे सांगू शकत नाही. म्हणून उत्तर नसलेल्या प्रश्नाच्या मागे धावण्यापेक्षा अन्य महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करणं अधिक श्रेयस्कर नव्हे काय ? जेवढं जीवन आपल्या पदरात निसर्गानं किंवा नियतीनं टाकलं असेल, तेवढं रस घेऊन माणसं का जगत नाहीत ? पावलोपावली मरणाचा विचार करणं, ही एक प्रकारची विकृती म्हणावी लागेल. गंभीर प्रकृतीच्या माणसांपेक्षा बालकांचं हसणं, बागडणं, रुसणं आणि रडणं, खिदळणं अधिक सुज्ञपणाचं वाटतं. ही मुलं जीवनाला बिलगलेली असतात. आईच्या कडेवर जितक्या असोशीनं मूल निश्चिंत असतं, तसंच निश्चिंतपण जीवनाच्या संगतीत या बालकांना मिळतं. प्रौढ माणसं मात्र पावलोपावली शंकेनं सावध पावलं टाकीत चालतात आणि त्यामुळं जीवनाचा उत्कट आनंद त्यांच्या पदरात पडत नाही. 'बालपणीचा काळ सुखाचा' असं म्हटलं गेलं, ते

या अर्थानं बरोबरच आहे. माणसं प्रौढ झाली, पन्नाशी पार करून गेली, की त्यांच्या मनात मरणाची भीती चोरपावलांनी येऊ लागते. माझ्या माहितीचे एक गृहस्थ कुणाच्याही मृत्यूची वार्ता ऐकून अस्वस्थ होतात. याचा अर्थ ते 'जागृत' असतात, असा मात्र नव्हे.

मरणाला हसतमुखानं सामोरी जाणारी काही माणसं असतात. 'वंदे मातरम्' असा उत्साही घोष करीत फासाच्या फळीकडे कित्येक देशभक्त गेल्याची नोंद इतिहासात आहे. फासाचा दोर पुष्पमालेप्रमाणे ज्यांनी मानला आणि मरणाचा सोहळा अनुभवला, त्यांच्याबद्दल काय बोलावं ? सोलापूरचा क्रांतिवीर कुर्बान हुसेन कवी कुंजविहारींचा निरोप घेताना हसून म्हणाला होता, 'भेटेन नऊ महिन्यांनी.' कुंजविहारींच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते.

आम्ही मृत्यूला 'कालाय तस्मै नम:।' म्हणतो; पण मृत्यूच अशा धीरोदात्त व्यक्तीला 'वीराय तस्मै नम:।' असं म्हणत असेल. याचा अर्थ मरणाची स्तुतिस्त्रोत्रं गावीत आणि त्याची आकांक्षा मनात धरावी; असा मात्र नाही. पण 'शेवटचा दिस गोड व्हावा' हे तुकारामांचं वचन लक्षात घेतलं पाहिजे. केवळ शेवटचाच नव्हे, तर जीवनातला प्रत्येक दिवस गोड करण्याची धडपड करणं, हे ज्ञानाचं लक्षण आहे.

'जीवेत शरद: शतम्' - शंभर शरद ऋतू आनंदानं जगण्याचा संदेश प्राचीन काळापासून मिळाला आहे. केव्हातरी येणाऱ्या मरणाच्या भयानं आजचं आमचं उत्साहपूर्ण आयुष्य काळवंडून टाकण्याचं कारण नाही. या जीवनाला बिलगून राहण्याचा आनंद भरभरून घ्यायचा आहे. संघर्ष करीत राहण्यातला उन्माद, आनंद हा देखील घेतला पाहिजे. आयुष्याच्या वेलीवरून एखादं पिवळं पान गळून पडलं म्हणून काय झालं; हिरव्या पानांचा उत्सव चालूच राहणार आहे. जगताना मनाची पानं हिरवीगार ठेवणं आपल्याच हातात असतं. जीवनाचं हिरवं गाणं गाताना मरणाची आठवण करण्याचं काहीच कारण नाही.

●●●

# शब्द जैसे कल्लोळ अमृताचे

एकदा एक कामगार पुढारी मजुरांच्या सभेत आवेशाने म्हणाले, ''कॉम्रेड्स, आम्हाला इंडियात रेव्होल्यूशनरी ट्रॅडिशन्स बिल्डअप करायच्या आहेत.'' सभेनं टाळ्यांचा कडकडाट केला; पण पुढाऱ्यांच्या त्या विधानाचा अर्थ कुणालाच कळला नव्हता.

भाषा म्हणजे मनातले भाव आणि विचार व्यक्त करण्याचं एक परिणामकारक साधन. भाषेवरून ती बोलणाऱ्या माणसाची प्रकृती आणि संस्कृती कळते. भगवान बुद्धाची भाषा म्हणजे त्याच्या हृदयातल्या प्रेमाचा आणि शांतीचा आविष्कार असायचा. लोकप्रबोधनासाठी त्यांनी पंडिती भाषेचा उपयोग केला नाही. भगवान महावीरही सामान्य जनतेच्या भाषेतूनच त्यांच्याशी संवाद करीत असत. लोकभाषेतच या महात्म्यांनी आपले विचार प्रकट केल्यामुळे ते लोकमनात रुजून बसले. वामन पंडित आणि मोरोपंत किती जणांना माहीत आहेत ? नामदेव-तुकाराम मात्र साऱ्या महाराष्ट्रानं आपल्या मनाच्या देव्हाऱ्यात जपून ठेवले आहेत. भाषेला व्याकरणापेक्षा अंत:करणाचीच अधिक जरुरी असते. हळुवार भावनेचा सुवास आणि आपुलकीचा स्पर्श घेऊन आलेली अशुद्ध ओवीसुद्धा शुद्ध आनंद देऊ शकते.

नुसत्या मधुर शब्दांना अर्थ नसतो, प्रेमानं दिलेली शिवीदेखील नम्रतेचं नाटक करणाऱ्या मृदू शब्दांपेक्षा अधिक आनंद देते. लोकहितवादी आणि फुले यांच्या शब्दांत काही ठिकाणी अशिष्टता असली तरी ती भाषा अज्ञानावर प्रहार करून लोकमनाला जागविणारी आहे. अंगाई गीत गाऊन कुंभकर्णाची झोप घेणारा समाज जागृत करता येत नाही. अशा वेळी कठोर भाषेचे आसूड ओढावे लागतात. तिच्यामागे असलेला हेतू शुभंकर असला म्हणजे झाले. लोकांची भाषा याचा अर्थ सभ्यतेचं वस्त्रहरण करणारी दुर्गंधी भाषा नव्हे. लोकांच्या सुखदु:खांना स्पर्श करणारी, त्यांना जिव्हाळ्यानं आपलीशी करणारी भाषा हीच खरी लोकभाषा.

आज परिस्थिती बदलली आहे. समाजमनात अनेक विकृती शिरल्यामुळे भाव शुद्ध राहिले नाहीत. हिंसा, बलात्कार, जाळपोळ हे नित्याचं रोगट वातावरण असल्यामुळे लोकभाषाही प्रदूषित होऊ लागली आहे. खरंतर समाज हाच भाषेचा

निर्माता असतो. तिला व्याकरण देणं हे पंडितांचं काम असतं. प्रदूषण वाढलेल्या समाजात भाषेची स्वच्छता सांभाळणं कठीण असतं. संत ज्ञानेश्वरांनी भाषेसंबंधी पाहिलेलं सुंदर स्वप्न आजच्या हिंसक वातावरणात कसं सफल होणार ? ते म्हणतात-

**तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।।**
**शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ।।**

शब्दाशब्दांतून अमृतकल्लोळ तेव्हाच उत्पन्न होतात, जेव्हा माणसाचं मन उदात्त विचारांच्या उंचीवर जाऊ शकतं. जेव्हा जगण्यातच जीव नसतो, तेव्हा भाषेलाही अवकळा आल्याशिवाय राहत नाही.

भाषेला जेव्हा भावनेचा उत्कट स्पर्श होतो तेव्हा साहित्याचा जन्म होतो. भावमय भाषा हीच साहित्याची व्याख्या आहे. शब्द सुंदर किंवा कुरूप नसतात. त्यातून व्यक्त होणारा भाव हाच शब्दाला रूपरंग देऊ शकतो. कित्येक कवींना शब्द लिहिता किंवा वाचता येत नव्हते. पण माणसाच्या मनातले भाव वाचण्याची शक्ती त्यांच्यात होती. म्हणूनच त्यांच्या साध्या शब्दांनाही सारस्वताचं सामर्थ्य लाभलं. अंत:करणात जीवनप्रेमाचं आणि समाजप्रेमाचं अमृत असेल तर प्रकट होणारे शब्द अमृताचे कल्लोळ होतात. जन्मभर फुलं वाटणाऱ्या संताचे हात फुलासारखे कोमलं होतात आणि त्याच्या भाषेला अमृताची गोडी येते. हृदयात प्रेम असेल तर शब्दांत प्रेमसंगीत उत्पन्न व्हावं यात आश्चर्य नाही.

●●●

# मैत्र जीवाचे

'मित्र कसे जोडावेत' या नावाचं एक पुस्तक प्रसिद्ध झालं आहे. मित्र मिळविण्याचे काही मार्ग त्यातून लेखकाने सुचविले आहेत, असं ऐकलं. पुस्तकं वाचून मित्र मिळविता येतील, असं मात्र म्हणता येणार नाही. पोहण्याचं तंत्र कदाचित पोहण्यावरच्या पुस्तकावरून समजून घेता येईल; पण प्रत्यक्ष पाण्यात पडल्याशिवाय पोहण्याची कला कशी साध्य होईल ? मित्र मिळविण्यासाठी आपल्या हृदयातच मैत्रीचा अंकुर उगवला पाहिजे. मैत्रीची भावना जोपर्यंत साकार होत नाही तोपर्यंत एखादा मित्र जोडता येईल, असं वाटत नाही. सत्ताधीशांना आणि श्रीमंतांना बरेच मित्र असतात, असा समज आहे. पण त्या मित्रांची मैत्री माणसापेक्षा सत्ता आणि संपत्तीशीच प्रामुख्याने असते. सत्ता संपली की पाखरं उडून जातात. फळं नसलेल्या झाडांकडे पक्षी फिरकत नाहीत. स्वार्थातून जडलेली मैत्री हे मैत्रीचं एका अर्थानं विडंबन आहे. इमानी कुत्रा आपल्या गरीब धन्यावर मनापासून प्रेम करतो. पण हुषार माणूस लाभाशिवाय मैत्री करत नाही.

**ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती**

हे मैत्रीचं तुकोबांनी सांगितलेलं लक्षण फारच थोड्या मित्रांच्या बाबतीत प्रत्ययाला येतं. खरी मैत्री जात बघत नाही. तिला सत्तेची आणि संपत्तीची उपाधी आकृष्ट करू शकत नाही. ती गुणांवर आणि व्यक्तित्वावर प्रेम करते. दोन वस्तूंना आणि व्यक्तींना जोडणारी ती एक आंतरिक शक्ती असते. 'मैत्री किंवा प्रीती बाह्य उपाधींवर अवलंबून असत नाही,' अशा अर्थाचं एक भवभूतीचं सार्थ वचन आहे. वैभवाच्या काळातली मैत्री दारिद्र्यातही टिकून राहिली, तर ती विशुद्ध समजावी. एका विनोदी लेखकानं म्हटलं होतं, 'रात्री मद्य पिताना झालेली मैत्री माणसं सकाळच्या उजेडात विसरून जातात. काचेच्या प्याल्याप्रमाणे असली मैत्री फुटून जाते. कारण त्या मैत्रीचं मूळ ठिसूळ असतं. पण जुन्या प्रामाणिक मित्राचा स्नेहभाव जुन्या मद्यासारखा मधुर असतो.'

मैत्री आणि मद्य या दोघोंचाही स्वाद घेतलेल्या लेखकाचं हे विधान असावं. पण त्यातलं सत्य मात्र लक्षात घेतलं पाहिजे. आजच्या चंचल आणि चवचाल

राजकारणात कोणाची कुणाकुणाशी मैत्री होईल आणि ती किती दिवस टिकेल, हे सांगता येणार नाही. मित्रत्वाचं फसवं पाणी वरून शांत दिसलं तरी ते केव्हा मैत्रीला तळाशी नेईल, हे कळत नाही. पण एक गोष्ट मात्र खरी की माणसाची श्रीमंती त्यानं मिळविलेल्या मित्रांवरून अधिक चांगली समजते. सुखदु:खांशी समरस होणारे मित्र जगण्याला अर्थ देतात. शत्रूच्या लबाड हास्यापेक्षा मित्राचा प्रामाणिक राग पत्करला. तो रागही अनुरागाचाच आविष्कार असतो. निकोप, निरुपाधिक मैत्रीची उदाहरणे आठवली की मनाला समाधान मिळतं.

सातशे वर्षांपूर्वी चंद्रभागेच्या वाळवंटात ज्ञानेश्वर आणि चोखामेळा हे संत उत्कट प्रेमानं परस्परांना उराउरी भेटत होते. त्या काळातही जातीपातींची क्षुद्र कुंपणं बाजूला सारून हे दोन विठ्ठलभक्त संवाद करीत होते, कीर्तनरंगात बुडून जात होते. भक्तीच्या समान धाग्यानं ते बांधले गेले होते. एक ज्ञानवंत ब्राह्मण होता. दुसरा अशिक्षित, कष्टकरी अस्पृश्य होता. पण दोघांची माणुसकी उंच होती. ईश्वरनिष्ठा अपार होती. त्यांच्या भेटीतून ममतेचा आणि समतेचा प्रवाह महाराष्ट्रात झुळझुळू लागला. त्यांच्या मैत्रीनं सामाजिक क्रांती केली की नाही, हा वाद निरर्थक आहे. पण जेव्हा मैत्री कोणत्याही कृत्रिम भेदाला महत्त्व न देता हृदयातून उचंबळणाऱ्या प्रेमभावनेवर आधारलेली असते, तेव्हा तिचे स्वरूप नितांतसुंदर असते. कोणत्याही क्रांतीच्या मुळाशी माणुसकीचा प्रभाव असेल तरच ती क्रांती चिरायू होते. शास्त्रज्ञानाच्या प्रभावानं प्रगती करीत चाललेल्या आजच्या माणसानं माणुसकीचं आणि मैत्रीचं हे सूत्र हरवणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. जोपर्यंत हे सूत्र बळकट असेल तोपर्यंत माणूस समाधानात राहू शकेल. पण जात, पंथ, धर्म आणि राष्ट्र यांच्या भिंती अभेद्य असल्याने मैत्रीचे मनमोकळे वारे वाहू शकत नाही. विशुद्ध मैत्रीला अटकाव करणाऱ्या बुलंद भिंती पाडल्या पाहिजेत आणि संत ज्ञानेश्वरांच्या अमृतमय शब्दांत म्हटलं पाहिजे, 'भूतां परस्परे पडो। मैत्र जीवाचे।'

●●●

# वीणेच्या तारा

एकदा एक तरुण संन्यासी भगवान बुद्धांचं मार्गदर्शन घेण्यासाठी आला आणि त्यानं बुद्धाला आपली व्यथा सांगितली. 'भन्ते, संन्यास घेण्यापूर्वी मी अनेक सुखांचा आत्यंतिक उपभोग घेतला; पण त्यातून अनेक दुःखे निर्माण झाली. आनंदापेक्षा मला उद्वेगाची अनुभूती अधिक आली. म्हणून मी संन्यास घेतला. आनंदमय जीवनासाठी भोग आणि त्याग हे दोन्ही मार्ग जर अयशस्वी ठरतात, तर मी काय करावं ?' भगवान बुद्धांनी त्या संन्याशाचं निरीक्षण केलं. तो अत्यंत कृश झाला होता. शरीरदंडनामुळे त्याचं स्वाथ्य बिघडलं होतं. भगवान बुद्ध स्मित करून म्हणाले, 'हे साधो, तुम्हाला वीणा-सतारसारखं वाद्य वाजविता येतं का ?'

संन्याशानं होकारार्थी मान हलविली. बुद्धांनी विचारलं, 'वीणेच्या तारा खुंट्या पिळून खूप ताणल्यावर त्यातून मधुर स्वर निघेल काय ? अर्थात नाही. वीणेच्या तारा अगदी सैल सोडल्या तर त्यातून सुस्वर निघतील का ? या दोन्ही कृती आत्यंतिक टोकाच्या आहेत. मधुर संगीतासाठी तारा फार ताणायच्या नाहीत, हे वीणावादकाला समजतं. त्याप्रमाणेच आनंदमय जीवनासाठी भोगालाही मर्यादा आणि त्यागालाही ती असलीच पाहिजे. भोग-त्याग यांचं विचारपूर्वक संतुलन साधावं.'

भगवान बुद्धाचे हे जीवनविषयक विचार अत्यंत तर्कशुद्ध आहेत. बहुसंख्य माणसांचे आचारविचार सूत्र तुटलेल्या पतंगाप्रमाणे कुठेही भरकटत असतात. अतिरेकाच्या सीमेपलीकडे ते जातात आणि त्यातूनच दुःखनिराशेची एक न संपणारी मालिका गुंफली जाते. भोगात सुख आहे, पण त्याचा आस्वाद घेण्यासाठी विचार आणि संयम यांची आवश्यकता असते. सुंदर जीवनासाठी अनुरक्तीप्रमाणेच विरक्तीही हवी. या दोन्ही प्रवृत्तींचा ज्याला समन्वय साधता येत नाही आणि जो केवळ आसक्ती आणि उपभोग यांच्याच दुष्ट वर्तुळात जन्मभर फिरत राहतो, त्याचं जीवन निरर्थक होतं. भोगाच्या भाराखाली ते पिचून जातं. भर्तृहरीनं म्हटलं आहे, 'आम्ही भोग भोगले नाहीत, आम्हालाच भोगांनी भक्ष्य केलं. आमची आशा जीर्ण झाली नाही; आम्हीच जराजीर्ण झालो. काळ निघून गेला नाही, आम्हीच निघून गेलो.' जीवनात उपभोग आणि आनंद यांना महत्त्वाचं स्थान आहे, हे विसरू नये. गाण्याचा सूर,

फुलांचा गंध, प्रेमाचा स्पर्श, ज्ञानाची रुची कशी घ्यावी, ते समजलं पाहिजे. संन्यासातच सुख आहे किंवा उपभोगातच आयुष्य रंगतं, हे दोन्ही एकांगी विचार बाजूला सारण्याची आणि मध्यम मार्ग स्वीकारण्याची विवेचकता ज्यांच्या बुद्धीत असते, ती माणसं आनंदानं जगू शकतात. श्रीकृष्णाच्या जीवनात सारे रस, रंग आणि गंध होते. तो परिपूर्ण मनुष्य होता. श्रीकृष्णाला पूर्णावतारी मानण्याचं हेच प्रमुख कारण आहे. बासरीच्या सुरात जीवनानंद शोधणारा श्रीकृष्ण कुरुक्षेत्रावर सांगितलेल्या गीतेत जीवनाचा अर्थ स्पष्ट करू शकला. त्याच्याजवळ शस्त्रही होतं आणि शास्त्रही होतं. भोगही होता आणि योगही होता. आपल्या जीवनाची वीणा मधुर स्वरांनी झंकारित व्हावी आणि त्या स्वरांतून पाझरणारा आनंद निकोप मनानं घ्यावा यासाठी या तारांना हळुवार मनानं जागृत करावं आणि त्यांचे मधुर झंकार चित्तात साठवून घ्यावेत.

भोगाची लाट आली की माणसं आपला तोल हरवून लाटेबरोबर वाहत जातात. भोगात सुख आहे हे खरं, पण त्यागातही आनंद आहे. त्याग हा देखील सुख भोगाचाच एक प्रकार आहे. हे कितीजणांना समजतं ? बुद्धासारख्या विचारवंताच्या मनातलं जीवनसंगीत सुवर्णमध्यवादी दृष्टीमुळं फुलत होतं. सामान्य माणसाला बुद्ध होता येणार नाही पण त्यानं निर्बुद्ध तरी होऊ नये. बुद्धांच्या मुद्रेवरचं मधुर स्मित हे त्यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचं चिन्ह आहे. माणसानं जगताना भोगाची आणि त्यागाची सीमारेषा समजून घेतली तर जगण्याच्या गाण्याला सूर आणि ताल यांची लय सापडेल.

●●●

# मोह

सोन्याचा हरीण असणं ही एक सर्वस्वी असंभवनीय घटना आहे, हे रामचंद्रासारख्या ज्ञानवंताला कळत नव्हते काय ? पण तरीही तो त्या मायावी कांचनमृगाच्या मागे धनुष्यबाण घेऊन का धावत गेला ? द्यूतक्रीडेत कौरव आपल्याला फसवीत आहेत, म्हणून हे कपटद्यूत सोडून येथून निघून जावं, असं धर्मराजासारख्या बुद्धिमान व्यक्तीला का वाटलं नाही ? असे अनेक प्रश्न कित्येक वेळा मनात उद्भवतात. त्याचं समाधानकारक उत्तर शोधणं कठीण असतं. पण अखेर महनीय व्यक्तीदेखील कधी कधी मोहाचे क्षण जिंकू शकत नाहीत. त्या मोहाची परिणती विनाशात झाल्यावर डोळ्यांवरची झापड नाहीशी होते. बुद्धिमान आणि पराक्रमी माणसांच्या जीवनात दुर्दम्य मोहाचे अनेक क्षण येतात. मन दुबळं असलं, की तो मोहाचा प्रसंग त्यांना पराभूत करू शकतो. माणूस नेहमीच आपल्या मनावर, आशा-आकांक्षांवर नियंत्रण ठेवू शकत नाही. एखादा कांचनमृग त्याच्या आयुष्यात उलथापालथ घडवू शकतो. इतिहासाची पानं चाळताना अशा अनेक चमत्कृतिपूर्ण घटना लक्षात येतात. माणसानं सदैव जागृत राहून मोहाचा प्रतिकार करावा म्हणजे तो सुखशांतीचं जीवन जगू शकेल, असा विचार मांडला जातो.

पण हा उपदेश एकांगी आहे, असं वाटतं. मोहाचा प्रत्येक क्षण आत्यंतिक निग्रहानं परतवून लावण्यामुळे मनुष्य खरोखरीच समाधानी होऊ शकेल काय ? जीवनाला सौंदर्य देण्यात मोह आणि लोभ यांचाही वाटा महत्त्वाचा आहे. सारेच मोह अयोग्य नसतात. काही मोह मनाला आनंद देतात. एखादा प्रेमिक आपल्या प्रेमविषयाच्या मोहात खोलवर जातो. त्या विषयाचं रात्रंदिवस तो चिंतन करतो. हा मोह पराकोटीच्या संयमानं त्यानं दूर सारला, तर त्याच्या जीवनातला प्रेमोन्माद ओसरून जाईल. त्याला आयुष्य नीरस वाटू लागेल. परदेशात अडकून पडलेल्या एका देशभक्ताला प्रश्न विचारला, 'तुझ्या दृष्टीनं सर्वांत सुखाची गोष्ट कोणती ?' तो म्हणाला, 'माझ्या देशाच्या भूमीवर मला पुन्हा राहता यावं. माझ्या देशाचा वारा छातीत भरून घेता यावा. तिथल्या आकाशाची निळाई माझ्या डोळ्यांनी मला आकंठ प्यायला मिळावी. एवढा एकच मोह मला जगवतो आहे.' नानाप्रकारचे मोहाचे सूर

माणसाच्या मनात लहरत असतात. सारेच मोह निषेधार्ह नसतात. एखाद्या विरक्त तपस्व्याप्रमाणे साऱ्या मोहवस्तूंची आणि मोहक कल्पनांची जीवनातून हकालपट्टी करण्यात काहीच अर्थ नाही. वाटेत आलेल्या एखाद्या मोहक क्षणाकडे पाहून स्मित करायला काय हरकत आहे ? जगण्याचाही मोह सर्वांनाच असतो. क्षुद्र कीटकालाही जीवनाच्या मोहातून बाहेर पडावंस वाटत नाही. माणूस तर आपल्या रसिकतेनं, जाणकारीनं जीवनाचा अनेक अंगांनी आस्वाद घेत असतो. जीवनाचे सारे रंग आणि गंध त्याला मोहिनी घालतात. कोणत्या रंगाला भुलायचं आणि कोणता गंध स्वीकारायचा, हे त्यानं तारतम्यानं ठरवायला हवं. काही मोह आयुष्य उद्ध्वस्त करतात, तर काही आयुष्याला सुंदरता देतात.

परमार्थाच्या वाटेनं चाललेल्या साधुसंतांनाही परमेश्वराच्या प्राप्तीचा उत्कट मोह असतोच. संत मीरेला तर कृष्णमोहानं वेढलेलं होतं. कृष्णाच्या बासरीतले सूर तिच्या रक्तात नाचत होते. कृष्णाची तृष्णा हाच तिच्या जीवनाचा स्थायीभाव बनला होता. पंढरीच्या राउळातलं सावळं परब्रह्म लक्षावधी भक्तांना मोह घालतं. मोह देवाचा असो, तत्त्वाचा असो, की कलेचा असो, त्यानं आपल्याला श्रीमंत करावं, एवढंच मागणं आहे.

एक संन्यासी म्हणाला, 'मला कधीच कनक कामिनीचा मोह पडला नाही. सत्तेसाठी मोह मला स्पर्शू शकला नाही. पण अनंत सौंदर्यांनी फुललेली ही विविधरंगी सृष्टी मला क्षणोक्षणी मोहात पाडते. रात्री माथ्यावरचं आकाश चांदण्यांनी लुकलुकू लागतं. वाऱ्याच्या झुळकीबरोबर कुठल्यातरी देवळातून भजन कीर्तनाचे सूर कानावर येतात. पहाट झाली की झाडाझाडांतून पक्ष्यांचा कलरव सुरू होतो. सूर्याचे कोवळे किरण डोळ्यांना गुदगुल्या करतात. ही सृष्टी मला सदैव मोह पाडीत आली आहे. तिचा मोहपाश म्हणजे परमेश्वराचीच कृपा आहे. या मोहातून मला बाहेर पडायचं नाही.'

●●●

# परीक्षा

बारावीच्या परीक्षेत अपयश आलं म्हणून एका मुलीनं स्वत:ला स्नानगृहात पेटवून घेऊन आत्महत्या केल्याची वार्ता वाचनात आली. माझ्या हातातलं वर्तमानपत्र गळून पडलं. परीक्षांचे निकाल लागल्यानंतर अशा दु:खद घटनांच्या वार्ता कानावर येतात. ज्यांच्या आयुष्याला खऱ्या अर्थानं अद्याप सुरुवात झाली नाही त्यांनी अत्यंत निराशेनं आपल्या जीवनाकडे पाठ फिरवावी, हे खरोखरच चमत्कारिक आहे. परीक्षेतल्या अपयशानं ही कोवळी मुलं इतकी का खचून जातात ? यशासाठी अधिक जिद्दीनं प्रयत्न करू, असा आशावादी विचार या मुलांच्या मनात का येत नाही ? यशाचं कौतुक होतं. यशस्वितांचे फोटो वृत्तपत्रांत झळकतात. अपयशाला मात्र तोंड दाखविण्याचा अधिकार नाकारला जातो. त्याचं हसू होतं. हे विलक्षण शल्य हळव्या मनाच्या मुलामुलींना सहन होत नाही. त्यांची मनं एकाएकी अंधारून जातात. प्रकाशाची वाट आता कायमची बंद झाली, हा वैफल्याचा विचार त्यांना गिळून टाकतो. याची जबाबदारी पालकांवर आणि शिक्षकांवरही आहे. परीक्षेसंबंधी एक प्रचंड दडपण मुलांच्या मनावर कळत नकळत पालकमंडळी ठेवतात. स्वत:च्या दृष्टिकोनातून नेहमी विचार करणारे पालक मुलांच्या आत्मविश्वासाचं खच्चीकरण करतात. शिक्षकदेखील परीक्षेच्या यशाला अतिरेकी महत्त्व देऊन अपयशी विद्यार्थ्यांच्या मनावर आघात करतात. एखाद्या विशिष्ट ज्ञानशाखेत प्रवेश मिळविण्याइतके गुण मिळाले नाहीत म्हणजे उत्कर्षाचे सारे दरवाजे आता बंद झाले, आता जीवनात अर्थ उरला नाही, असा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर व्हावा याचा अर्थ पालक आणि शिक्षक अशा दु:खद घटनेला काही अंशी जबाबदार आहेत असंच म्हणावं लागेल. सामान्य परीक्षेपेक्षा आपलं जीवन अधिक मोलाचं आणि सुंदर आहे. ते आपल्या हातांनी चुरगाळून टाकण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही. ही जीवनशक्ती केवळ स्वत:साठी नाही. ती सामाजिक संपत्ती आहे, हा विचार मुलांच्या मनावर कधी उत्कटतेनं बिंबवण्याचा प्रयत्न केला आहे का ?

केवळ परीक्षेतले अपयशच नव्हे, तर कोणत्याही क्षेत्रात अपयश असह्य झाल्यामुळे माणसं वेगवेगळ्या रीतींनी आत्महत्या करतात. जगातल्या सर्वच देशांत

आत्मघाताचं प्रमाण वाढत चाललं आहे. समाजाचं मानसिक संतुलन बिघडल्याचं हे अवलक्षण आहे. अगदी क्षुद्र कारणासाठीही आपलं जीवन नष्ट करणारी विकृत कृती माणसाच्या हातून घडावी हे वस्तुत: लाजिरवाणं आहे. मानसिक आरोग्याची मनुष्य फारशी काळजी घेत नाही. काहीही होवो, जीवनावरची माझी निष्ठा मी विचलित होऊ देणार नाही. मला निर्धारानं जगायचं आहे. जीवनाची वाट काट्याकुट्यांची असली, तरी प्रत्येक पाऊल मी खंबीरपणानं टाकणार आहे, हा जीवनवादी विचार माणसाला जगवू शकतो.

आत्महत्येच्या विचाराची क्षणिक लाट ओसरू द्यावी. पुन्हा जीवनाचं प्रेम रक्ताच्या प्रत्येक बिंदूतून सळसळू लागतं. अंदमानच्या अंधारकोठडीत जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मनातही एकदा आत्महत्येचा विचार प्रबल होऊ लागला, पण त्यांच्या पुरुषार्थी मनानं हा पलायनवादी विचार झटकून टाकला. या तुरुंगात हालअपेष्टा भोगण्यामुळे माझ्या देशाचं स्वातंत्र्य जवळ येणार असेल, तर मी आयुष्यातून हताशपणे उठून जाणं मुळीचं उपयोगाचं नाही, असा विचार त्यांनी केला. त्यांच्या एका काव्यातही हा आशय आलेला आहे. 'अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला। मारिल रिपु जगती असा कवण जन्मला ?॥' हा रसरशीत जीवनवादी विचार नव्या पिढीच्या मनावर बिंबवला पाहिजे.

निसर्गानं आपल्याला दिलेलं जीवन ही एक अलौकिक स्वरूपाची अमूल्य देणगी आहे. जीवनाचं भय वाटावं आणि मृत्यूला जवळ करावं असं वाटणं ही मानसिक दुर्बलता आहे. काही प्रसंग असे असतात की त्यावेळी जीवनाचा मोह सोडून मृत्यूला मिठी मारण्यात एक प्रकारचा महनीय त्याग असतो. उदात्तता असते. भगतसिंगाचं मरण अनेकांना नवजीवन देऊन गेलं. त्याच्या मरणातही जीवनाचा जयघोष होता. आत्महत्येचा विचार करणाऱ्यांनी जीवनाची महती नीट समजून घ्यावी. कोणी काही म्हटलं तरी जीविताचं हिरवं संगीत जपलं पाहिजे.

●●●

# निंदा आणि गुणगान

समाजात गुणग्राहकता फार कमी असते. निष्कारण एखाद्याची निंदानालस्ती करण्यात पुष्कळ जणांना एक प्रकारचा आनंद मिळतो. कोणत्याही श्रेष्ठ व्यक्तीच्या अंगावर निंदेचा चिखल उडवताना दुर्जनांना हर्षाच्या उकळ्या फुटतात. एखाद्या महापुरुषाबद्दल समकालीनांनी निंदेचे, हेटाळणीचे उद्‌गार काढले नाहीत असं उदाहरण इतिहासात तरी सापडत नाही. महनीय व्यक्तींची अकारण अवहेलना करण्यात समाधान मानणं ही एक भयानक मानसिक विकृती आहे. लोक कुणाचीही स्तुती करतात आणि कुणाचंही गुणगान करतात. या बाबतीत लोकांचं मानसशास्त्र नीट समजत नाही. एका अभिजात गायकाबद्दल एक मत्सरी मनुष्य मला सांगत होता, 'अहो, त्याला संगीत कशाशी खातात ते कळायला आणखी काही जन्म घ्यावे लागतील. काही वर्तमानपत्रांना त्यानं हाताशी धरलं आहे. त्यामुळं ती पत्रं त्याची वारेमाप स्तुती करतात. फोटो छापतात. एक-दोन मंत्र्यांच्या ओळखीनं त्यानं पद्‌मश्री पदवी पदरात पाडून घेतली आहे. मी त्याच्या मार्गानं गेलो असतो तर भारताचा संगीतभूषण म्हणून माझा केव्हाच गौरव झाला असता. पण चालायचच, ज्याला धड संगीत कळत नाही त्याच्यावर मूर्ख लोक प्रशंसेचा वर्षाव करताहेत. आम्ही मात्र बसलो आहोत कोपऱ्यात.' आपण कोपऱ्यात पडलो आहोत आणि त्याचा मात्र उदो उदो होत आहे, हीच या सुमार माणसाची पोटदुखी होती. हेच निंदानालस्ती करण्याचं कारण होतं. स्तुती आणि निंदा यांच्या मुळाशी असलीच स्वार्थमूलक कारणं असतात. बाकी आपण महाराष्ट्रातील लोक दुसऱ्याचा गुणगौरव करण्याच्या बाबतीत बरेच कंजूष आहोत. फार फार तर 'ठीक आहे' 'त्यातल्या त्यात बरं आहे' असे माफक शब्द उच्चारतो. तोंड भरून दाद द्यावी असं वाटतच नाही.

मत्सरी लोक दुसऱ्याचे गुण कधीचं मान्य करीत नाहीत. गुणगौरव करणं हे उदार मनाचं लक्षण असतं. पण रसग्रहण करण्याऐवजी कुत्सित वृत्तीनं गुणवंतांची निंदा करणारे लोक अधिक आढळतात. डोळ्यांवर मत्सराची पट्टी बांधल्यावर गुण दिसणं अशक्य आहे. अशांची मनं कृपण असतात. कोणी एखादी चांगली कृती केली, की त्यांच्या अहंकाराला धक्का बसतो. दुसऱ्याचे गुण मान्य करणं म्हणजे

आपण खालच्या पातळीवरचे आहोत हे व्यक्त करण्यासारखं आहे, असं त्यांना वाटतं. शत्रूच्याही गुणांचं आनंदानं वर्णन करणारे निर्मत्सरी लोकदेखील जगात क्वचित असतात. कर्णाच्या शौर्याची धर्मराज प्रशंसा करतो. तेव्हा आश्चर्य आणि आनंद हे दोन्ही भाव मनात येतात. पण दुर्योधनानं धर्मराजाविषयी अशी गुणग्राहकता दाखवल्याचा उल्लेख असलाच तर तो दुर्योधनाच्या नाटकीपणाचा पुरावा म्हणूनच दाखवावा लागेल.

एकदा स्वर्गात देवसभेत इंद्रानं श्रीकृष्णाच्या अलौकिक गुणग्राहकतेची स्तुती केली. श्रीकृष्णाच्या रसज्ञतेचं वर्णन करताना इंद्रानं म्हटलं होतं, 'अणूइतकाही गुण श्रीकृष्णाच्या गुणग्राहक नजरेतून सुटत नाही. दोषापेक्षाही त्याचं गुणांकडे अधिक लक्ष असतं.' सभेतल्या एका मत्सरी देवाला कृष्णाची ही प्रशस्ती सहन झाली नाही. इंद्राच्या या विधानात कितपत तथ्य आहे हे शोधण्यासाठी तो पृथ्वीवर आला. श्रीकृष्ण आपले हजारो सैनिक घेऊन राजधानीकडे निघाला होता. त्या रस्त्यावर एका मेलेल्या कुत्र्याचं सोंग देवानं घेतलं. मृत कुत्र्याच्या सडलेल्या शरीराची भयानक दुर्गंधी पसरली होती. सारं सैन्य नाक मुठीत धरून पळत सुटलं. श्रीकृष्णांनी जवळ उभं राहून त्या मृत कुत्र्याचं निरीक्षण केलं आणि खेदानं तो उदारमनस्क महापुरुष म्हणाला, 'अरेरे, या उमद्या कुत्र्याचा मृत्यू झाला ही वाईट घटना घडली. शरीराची दुर्गंधी येणारच. पण या कुत्र्याचे डोळे किती स्वच्छ आहेत. त्याचे पांढरेशुभ्र दात पाहिल्यावर प्रसन्नता वाटते. कुत्र्याच्या कातडीचा रंगही किती आकर्षक आहे. हे सारं सौंदर्य मृत्यूनं गिळंकृत केलं, ही दुःखद घटना आहे.' श्रीकृष्णाचे हे उद्गार ऐकून त्या देवाला आपण घेतलेल्या कुशंकेबद्दल पश्चात्ताप वाटला. त्यानं प्रकट होऊन क्षमा मागून म्हटलं, 'खरोखरच इतकी विलक्षण गुणग्राहकता स्वर्गलोकातही आढळत नाही. मनुष्यलोकात तुझ्या रूपानं ती नांदत आहे. तुला मी प्रणाम करतो.' ही पुराणकथा असेल. पण गुण आणि गुणवंत यांच्याबद्दल आत्मीयता वाटणं आणि दोन प्रशंसेचे शब्द उच्चारणं हे मानसिक उंचीचं लक्षण आहे. जे सुंदर असेल त्याचं निकोप मनानं रसग्रहण करण्याची शक्ती मिळावी.

●●●

# कोण ब्राह्मण, कोण शूद्र ?

म. ज्योतिबा फुले यांच्या आयुष्यातली एक घटना. आपल्या एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या वरातीत ते चालत होते. वरातीत शेकडो लोक सामील झाले होते. घोड्यावर बसलेल्या नवरदेवाचं वऱ्हाडी मंडळी कौतुक करीत होते. आपल्या मित्राचं लग्न थाटामाटात झालं हा आनंद फुल्यांच्या चेहऱ्यावर होता. पण त्यांच्या आजूबाजूच्या लोकांत आधी हलक्या आवाजात आणि मग मोठ्यानं कुजबुज सुरू झाली. 'आपल्या बरोबर खांद्याला खांदा लावून हा कोण शूद्र ऐटीत चालत आहे ?' अशी विचारणा काही लोक करू लागले. उच्च वर्णीयांच्या या समारंभात एक खालच्या जातीच्या माणूस खुशाल येऊन मिसळतो याला काय म्हणावं ? 'शांतं पापं'. त्या शूद्राला बाहेर काढा. उच्च वर्णीयांच्या बरोबर हा या समारंभात आलाच कसा ? दोन-चार जणांनी फुल्यांना धक्काबुक्की करून बाहेर काढलं. अपमानित झालेले फुले विचार करू लागले. माझ्या मित्राच्या लग्न समारंभात मला प्रवेश नाही ? म्हणे मी शूद्र ! माणसासारखी सगळी माणसं असतात. त्यात नाना प्रकारचे भेद कोणी निर्माण केले ? वरातीत घोड्यासारखा पशू चालतो. त्याच्या स्पर्शानं या उच्च वर्णीयांना विटाळ होत नाही. माझ्यासारखा माणूस मात्र यांच्या पावित्र्याचा भंग करतो. हा काय चमत्कार आहे ? फुल्यांनी घडलेली घटना आपल्या वडिलांना सांगितली. त्यांच्या शब्दांत अपमानाचं दु:ख होतं. राग आणि आवेश होता. वडिलांनी शांतपणानं सारा प्रकार ऐकून घेतला. पूर्वापार परंपरा आपण मोडू नये. आपण आपली पायरी ओलांडू नये. शास्त्रपुराणात सांगितल्याप्रमाणे आपण राहावं. अशाच आशयाचा उपदेश वडिलांनी केला.

कुठली परंपरा आणि कोणती शास्त्रपुराणं ? कोणी लिहिली ही ? धूर्त स्वार्थी लोकांनी आपलं वर्चस्व गाजवण्यासाठी या जातीपातीचं प्रस्थ निर्माण केलेलं दिसतं. मी फक्त माणूस ही जात ओळखतो. 'कोण ब्राह्मण ? आणि कोण शूद्र ?' फुल्यांचं तरुण बंडखोर मन स्वत:ला प्रश्न विचारीत होतं. माणसांवर अन्याय करणारी परंपरा मी मानणार नाही. असल्या अन्यायी रूढी परंपरांचे तुकडे तुकडे केले पाहिजेत. फुल्यांच्या चरित्रातला हा प्रसंग त्यांना बंडाची प्रेरणा देणारा ठरला. जातिव्यवस्थेचे

घातकी परिणाम त्यांनी यापूर्वीही पाहिले असतील. पण आता स्वत:लाच आलेल्या एका जळत्या अनुभवानं त्यांच्या हृदयात तीव्र जाणीवेची ठिणगी पडली. महात्मा गांधींच्या आयुष्यातही असाच एक प्रसंग दक्षिण आफ्रिकेत घडला. पहिल्या वर्गाचं तिकीट जवळ असतानाही आगगाडीच्या डब्यातून मध्यरात्री त्यांना एका स्टेशनावर गोऱ्या कंडक्टरनं 'काला आदमी' म्हणून धक्का मारून बाहेर काढलं होतं. गोरे स्वत:ला उच्च वर्णीय मानीत होते. ते राज्यकर्ते होते. काळे लोक आपले गुलाम आहेत या माजोरी विचारानं गोरे वागत होते. गांधीजींनी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर थंडीत कुडकुडत ती रात्र कशीबशी काढली. बॅरिस्टर गांधींच्या तरुण मनाचा क्षोभ गोऱ्यांच्या साम्राज्यशाहीला किती स्फोटक आहे हे त्यानंतर हळूहळू समजलं. भारतात जातिव्यवस्थेमुळं उच्च आणि हीन, ब्राह्मण आणि शूद्र हा भेदभाव होता. आजही तो पूर्णपणानं शमलेला दिसत नाही. युरोप, अमेरिका आणि आफ्रिका या खंडांतही काळे - गोरे हा भेद आहेच. कातडीच्या रंगावरून उच्च-नीच भाव जोपासणारी माणसं कितपत सुसंस्कृत म्हणायची ? खरं तर कोणत्याही रंगाचा आणि कोणत्याही वंशाचा माणूस हा शंभर टक्के केवळ माणूसच असतो. एवढंही सत्य ज्यांना समजत नाही, त्यांच्या माणूसपणाबद्दल जबरदस्त संशय निर्माण होतो.

केशवसुतांनी 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' असं म्हटलं ते तर्कशुद्ध आहे. जुनाट झालेल्या शास्त्रपुराणांची पानं चघळत बसलेल्या शास्त्री पंडितांच्या बुद्धीला केविलवाणी बुरशी चढली आहे. परंपरेची गाणी शेकडो वर्षे गात बसलेल्या या लोकांच्या बौद्धिक दिवाळखोरीवर अधिक भाष्य करण्याचं कारण नाही. जे जुनं आणि कालबाह्य झालं त्याला आपल्या मरणानं मरू द्या. समता आणि ममता या मूल्यांचा जयघोष करणारी महात्म्यांची वाणी सदैव जपून ठेवली पाहिजे. कारण कुळ, जात आणि वर्ण या साऱ्या भ्रमिष्ट कल्पना आहेत. त्यांचा माणसाच्या प्रतिमेशी आणि पराक्रमाशी काही संबंध नाही. पण हे सत्य कितीही तीव्रतेनं उच्चारलं तरी अजून कित्येकांच्या पचनी पडत नाही. त्याला काय करायचं? ज्याला कळत नाही आणि वळतही नाही त्याला मागे राहू द्या. आपण पुढे चालू या.

●●●

# कविता कुणी लिहावी ?

'उदंड झाली कविता' असं म्हणण्याचा हा काळ आहे. कवी आणि कविता यांची संख्या उत्तरोत्तर फुगत चालली आहे. साहित्याच्या क्षेत्रात कवितांची अतिवृष्टी होत आहे याचा अर्थ प्रतिभावंतांची पैदास वाढली असा करता येईल का ? खरं तर कवितांच्या नावाखाली जो अत्यंत गद्यप्राय, रसहीन आणि अर्थशून्य मजकूर प्रसिद्ध होतो तो वाचल्यावर अशा कवींना राज्यातून हद्दपार करावं असा विचार मनात येतो. प्लेटो नावाच्या तत्त्ववेत्त्यानं आपल्या राज्यातून कवींना बाहेर घालवावं असं त्याच्या ग्रंथातून म्हटलं होतं. कवी हा शब्द गीतेत 'ज्ञानी' या अर्थानं योजलेला आहे. संस्कृतिरक्षणाची जबाबदारी कवींवर एकेकाळी होती. कवींना 'शब्दसृष्टीचे ईश्वर', 'कल्पनेचे कल्पतरू', 'सृष्टीचा अलंकार', 'बोलके चिंतामणी' इत्यादी अनेक विशेषणांनी संत रामदासांनी गौरविलं आहे. परवा एका कविसंमेलनाला गेलो होतो. दोन-चार 'कविता' ऐकल्यावर बरेचसे श्रोते उठले आणि शेजारच्या हॉटेलात चहा घेण्यासाठी धावले. काव्यश्रवणाचा इतका खोल परिणाम होऊ शकतो हे त्या दिवशी मी अनुभवलं.

एकदा एक तरुण कवी आपलं काव्य वाचून दाखवण्यासाठी माझ्याकडं आला. माझ्या कुंडलीतला तो अत्यंत वाईट दिवस होता. मी उसन्या सौजन्यानं कवीच्या भसाड्या स्वरातल्या त्या कविता निरुपायानं ऐकू लागलो. मधूनच 'वाहवा ! छान छान !' असे शब्द यांत्रिकपणे उच्चारीत होतो. माझ्या शाबासकीनं ते कविवर्य फारच चेकाळले. तब्बल अर्धा तास तारस्वरानं आपल्या कविता ते किंचाळत होते. अखेर त्या दिवशी 'प्रकृती बरी नाही' अशी चिठ्ठी पाठवून मी ऑफिसला गेलो नाही. कोणीही उठतो, चार ओळी खरडतो. आणि स्वत:ला 'ज्ञानेश्वर - तुकाराम' समजायला लागतो. सारांश, सध्या मराठी कविता एका दारुण संकटात सापडली आहे.

कविता कशी असावी ? तिचा स्पर्श मनाच्या सर्व पाकळ्यांना उमलवणारा असावा. कवितेतले सूर कवीच्या अंत:करणाच्या नाजुक तारांतून उमटलेले असावेत. डोळ्यांनी म्हणावं 'आम्हांला कवितेचं रूप पाहू द्या. जिभेनं म्हणावं, मला रस चाखू द्या.' कवितेच्या सुगंधाची नाकाला अनुभूती यावी. आणि साऱ्या अंगानं कवितेचे

अंतरंग टिपून घ्यावे. जो कविता जगतो त्यानं कविता लिहावी. कविता लिहिण्याचा अधिकार त्यालाच आहे. ज्यानं कधी निरागस बालकाच्या हास्यावर प्रेम केलं नाही. कुष्ठरोग्याच्या जखमा पाहून ज्याच्या डोळ्यांत अश्रू आले नाहीत, स्तनपान करवीत असलेल्या मातेला पाहून ज्याचं चित्त उदात्त आनंदानं उचंबळून आलं नाही, आकाशाची निळाई पाहून ज्याची दृष्टी कधी सुखावली नाही आणि अन्याय पाहून ज्याचं रक्त कधी उसळलं नाही, त्यानं कवितेशी सलगी करू नये. केशवसुत म्हणाले होते, 'माझ्या हृदयाला तडा गेला आहे त्या वेदनेतून मी गातो.' कुसुमाग्रज म्हणाले, 'माझ्या कविता रुक्ष समिधा आहेत. त्यात ओलावा नाही. पण त्या तुमच्या अंतरातला अग्नी पेटवू शकतील.' आंतर अग्नी पेटवणाऱ्या किंवा शीतल चांदणं उधळणाऱ्या कविता फार कमी निर्माण होतात. कित्येकांच्या कविता 'अग्नये स्वाहा' करण्याच्या योग्यतेच्या असतात. त्या वाचल्या की अंगाची लाहीलाही होते.

कवितेतले शब्द झंकार करीत कानात आणि मनात उतरले पाहिजेत. तिच्यातले भाव आपल्या स्वभावात मिसळले पाहिजेत. कवितेनं काळजाला असा दंश करावा की ती वेदना जन्मभर आनंदानं कुरवाळावी असं आपल्याला वाटलं पाहिजे. एक कवी म्हणाला होता 'मी माझ्या अश्रूंतून जे शिकतो ते माझ्या कवितेतून देत असतो.' बहिणाबाई चौधरी म्हणाल्या, 'जात्यातून पीठ पडतं तसं माझ्या व्हटातून गाणं बाहेर येतं.' काव्याविषयीचा हा काव्यमय सिद्धांत जातिवंत कवीच सांगू शकतात. पोटात गाणं नसेल तर ते ओठांत येत नाही. कवीचं गाणं म्हणजे त्याच्या अंतरात्म्याचा हुंकार असावा लागतो. अशी कविता कधीतरी क्वचित भेटते. शब्द जुळवणारे कधीच कवी होत नाहीत. सृष्टीच्या सुखदु:खांशी सहकंप पावणारं जिवंत मन हे कवितेचं मूलद्रव्य असतं.

'आनंदे भरीन तिन्ही लोक' अशी महत्त्वाकांक्षा असलेले कवी महाकवी होतात. अशा महाकवींची आम्ही वाट पाहत आहोत. त्यांची भेट दुर्मिळ असते हे माहीत असूनही खरे रसिक त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत.

●●●

# निरोप घेताना...

'दीपमाळ' या सदरातून या वर्षात प्रत्येक सप्ताहात मी 'सकाळ'च्या असंख्य वाचकांना भेटत होतो. त्यांच्याशी सुखसंवाद करीत होतो. अनेकविध विषयांवर संवाद करताना मला जो आनंद मिळाला तो मी कधीच विसरू शकणार नाही. यापूर्वीही 'संत सहवास' या स्तंभातून मी दररोज वाचकांशी बोलत होतो. 'सकाळ' हे वृत्तपत्र महाराष्ट्रात समाजातल्या सर्व स्तरांत वाचलं जातं. त्यामुळं अनेक वाचकांची मला पत्रं येत असत. 'दीपमाळ' मधील लेखनाबद्दल जळगावच्या एका वाचकानं मला लिहिलं, 'तुमचे लेखन मी नियमानं वाचतो. प्रत्यक्ष भेटून तुमच्याशी चर्चा करावी असं मला वाटतं. हा लेखक 'आहे कसा आननी' हेही मला पाहायला मिळेल.' प्रत्यक्ष भेटीत त्याची निराशा होऊ नये म्हणून मी त्याला लिहिलं, 'लेखकाची मुद्रा त्याच्या लेखनातूनच दिसते. त्याची गुणवैशिष्ट्यं दोषांसह कळतात, सिंह जसा अरण्यात पाहावा त्याप्रमाणं लेखक - कवी त्याच्या लेखनातच पाहावा. लेखनाबाहेर त्याला पाहिलं तर त्याच्याविषयीचं कुतूहल ओसरून जातं. मला पाहण्याची थोडीफार उत्सुकता तुम्हाला वाटते हेच माझ्या लेखनाचं मी यश मानतो. 'पाहून घेईन' असं तुम्ही जोपर्यंत म्हणत नाही तोपर्यंत माझं लेखन बरं चाललं आहे असं मी म्हणेन.' 'सकाळ'च्या व्यापक प्रसारामुळं बहुसंख्य वाचकांशी मला हितगुज करता आलं. माझ्या मनातल्या आणि समाजजीवनातल्या काही व्यथा-वेदना बोलून दाखवता आल्या. विचारमंथनाला थोडीफार चालना देता आली याचं समाधान फार मोठं आहे.संपादकांनी माझ्या लेखणी-वाणीला गती दिली आणि अनेक वाचकांनीही पत्रं पाठवून, दूरध्वनी करून व प्रत्यक्ष भेटून आपली प्रतिक्रिया कळवली. माणसामधला लेखक वाचकांमुळं जिवंत राहतो यात शंका नाही. वाचक ही संस्था जोपर्यंत अस्तित्वात आहे. तोपर्यंत साहित्याच्या निर्मितीला ओहोटी लागणार नाही. ज्ञानेश्वरांसारखा कवीश्वर वाचकांना जे विनम्र आवाहन करतो ते त्यांच्या निर्मल मनाचं द्योतक आहे. त्यांनी म्हटलं आहे.

**हे सारस्वताचे गोड। तुम्हीचि लाविले जी झाड।**
**तरी अवधानामृते वाड। सिंपौनि कीजे।**

साहित्याचं झाड वाचकांच्या अवधानानं, अनुमोदनानं वाढत जातं. वाचकांच्या प्रतिसादासाठी लेखक उत्सुक असतो. सारं सारस्वत याच ऊर्मीतून उचंबळून आलेलं आहे.

'दीपमाळ'मधील अखेरचा लेख लिहिताना आनंद आणि दु:ख या दोन्ही भावनांची अनुभूती मी घेत आहे. प्रत्येक गोष्टीचा शेवट असाच संमिश्र भावनांचा असतो. हा 'शेवटचा दिस' गोड करून घ्यावा अशी वाचकांना विनंती करतो. प्रत्येक सप्ताहात काय लिहावं, कोणत्या विषयावर लिहावं याचं चिंतन करण्यात एक आगळं समाधान होतं. 'दीपमाळ'मधील अन्य लेखक - लेखिकांचे विचार माझ्या चिंतनाला अधिक गती देत असत हे त्यांचं ऋण मान्य केलंच पाहिजे. लेखनातून आत्माविष्काराला जी संधी मिळते तिच्यावरच कोणताही लहान - मोठा लेखक जगतो. त्याच्या जगण्याला सूर लागतो. सूर लागलेलं गाणं जिवंत असतं. ते कलादृष्ट्या फार उंचीवरचं नसेल. आपल्या अंगभूत उत्साहानं खळखळणारा झरा आणि प्रचंड आवेगानं कोसळणारा धबधबा यांच्या व्यापात आणि परिणामात पुष्कळच अंतर आहे. पण दोघांतही जिवंत गतितत्व आहे. प्रत्येकानं आपल्या मनाप्रमाणं सूर लावावा. मन मोकळं करून गावं. जाणकार रसिकांना ते भावेल की नाही याची चिंता करू नये. सूर सच्चा असेल तर गाणं रंगल्याशिवाय राहत नाही. अधिक काय सांगावं ? काही सामाजिक, काही वाङ्मयीन आणि जीवनविषयक प्रश्नावंर 'दीपमाळ'मधून मी अल्पस्वल्प लिहिलं. तुम्ही का लिहिता असा प्रश्न कोणाही वाचकानं मला विचारला नाही हीच माझी उपलब्धी ! वाचकहो, आता आपला निरोप घेतो. मनाच्या कोपऱ्यात कुठंतरी माझी अस्पष्ट आठवण तुम्हाला राहील हा आत्मविश्वास मला 'सकाळ'नं मिळवून दिला याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

●●●



जीवनचिंतन जेव्हा लालित्यपूर्ण शैलीतून
प्रकट होतं तेव्हा ते रसिक वाचकांच्या
विचारभावनांना आवाहन करतं.
निर्मलकुमार फडकुले या लेखकानं उजळलेल्या
'दीपमाळ' मधील प्रत्येक लेख जीवनावर
भाष्य करतो. या लेखकाच्या लेखनात सामाजिक
जीवनातले अनेकविध विषय आलेले आहेत.
दीपमाळेतला प्रत्येक दीपक प्रकाशकिरण देऊ शकतो.
काही लेख अस्वस्थ करतात. काही जीवनाच्या
खोल अनुभूतीकडं घेऊन जातात. आनंद देतात.
जगण्याचं भान देणारं, वाचलंच पाहिजे असं
हे नवं पुस्तक.

सुविद्या प्रकाशन